पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवचरनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५ अंक २० वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते ३० जून २०२३




# मंदिर लोकशाहीचे, की हिंदू राष्ट्राचे

अँटीमुस्लिम बहुजन
– जयदेव डोळे

संघर्षाच्या राखेतून...
प्राचार्य प्रभाकर बागले

असंविधानिकतेने ‘संविधानिक’ सरकार!
आणि लोकनियुक्त सरकार – संजय पवार

पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ५
अंक २० वा । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते ३० जून २०२३

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट
8888541822

• **जाहिरात विभाग संपर्क**
९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त

• **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय :** मंदिर लोकशाहीचे, की हिंदू राष्ट्राचे – ३ / अँटीमुस्लिम बहुजन – **प्रा. जयदेव डोळे** – ५ / संघर्षाच्या राखेतून... **प्राचार्य प्रभाकर बागले** – ६ / **वारी विशेष लेख :** सोपी विवेकी पायवाट – **श्यामसुंदर महाराज सोन्नर** – ११ / भाकरी तर फिरली, अजून काय फिरणार – **अनंत बागाईतकर** – १४ / **रेशीम आणि किडे :** असंविधानिकतेने 'संविधानिक' सरकार! आणि लोकनियुक्त सरकार – **संजय पवार** – १७ / महिला कुस्तीपटूंची पिळवणूक थांबवा – **प्रा. आनंद मेणसे** – १९ / दलितांच्या हत्येविरूद्ध संघटीत प्रयत्नांची गरज – **बी.व्ही. जोंधळे** – २२ / प्रवेशपरिक्षा की छळ परिक्षा... – **प्रा. दिलीप चव्हाण** – २५ / अजस्त्र मनुष्यबळ : संधी की संकट – **भास्कर नाशिककर** – २८ / निसर्गाचा विध्वंस थांबवा... – **प्रा. एच.एम. देसरडा** – ३१ / **ग्रंथ परिचय :** असहमतीचे रंग : तिसरा डोळा असलेल्या कवीची कविता – **डॉ. सूर्यनारायण रणसुभे** – ३४ / **कोणता भारत :** ३६ – **तात्या विंचू** – शेण खाऊन शेण थुंकणाऱ्यांनी सावित्रीबाईंची केली बदनामी । कोण हा ब्रिजभूषण? ज्याच्यासाठी कायदा शेपूट घालून पहडतोय... / **कविता :** आपल्यातच बुद्ध पाहू या... – **उत्तम कांबळे** । त्या भवनातील गीत पुराणे – **श्रीपाद भालचंद्र जोशी** – ३९

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक चेतन भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# मंदिर लोकशाहीचे, की हिंदू राष्ट्राचे



हिंदू राष्ट्राचे स्वप्न बाळगत त्याकडे एक एक पाऊल टाकणाऱ्या संघप्रणित भाजपने तगडे बहुमत घेऊन केंद्रात सत्तेवर येताच संसदेसाठी नवे भवन उभारण्याचा संकल्प केला होता. युद्ध पातळीवर प्रयत्न करून तो तडीस नेला. इमारतीच्या उद्घाटनासाठी देशाचा घटनात्मकप्रमुख असलेल्या राष्ट्रपतींना न बोलावता पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. आपल्या पंतप्रधानांचे काहींनी मंदिर बांधून त्यांचे अवतारात रुपांतर केले आहे. त्यांच्याच हस्ते उद्घाटन करण्यामागे ही भावनाही असू शकते. देशभरातील विरोधी पक्षांचा विरोध झुगारून पंतप्रधानांच्या हस्ते म्हणजेच मोठ्या कारभाऱ्याच्या हस्ते 'न भूतो न भविष्यति' असा समारंभ पार पाडला. राष्ट्रपतींसह बहुतेक विरोधकांनी सरकारधार्जिण्या टी.व्ही. चॅनेलवर हा सोहळा पाहिला. भाजपकडे भिंततोड बहुमत असल्याने कोणाच्या विरोधाचे काही चालणार नव्हते. सत्ताधाऱ्यांनी त्यांना हवे तसे करून घेतले. सत्तेला चिकटलेल्या आणि रोज जय भीम म्हणत गळा काढणाऱ्यांनीही कोणती प्रतिक्रिया नोंदवली नाही. हिंदुत्ववाद्यांनी एखाद्या महान सणासारखे उद्घाटन साजरे केले. यापुढेही या उद्घाटनाची चर्चा चालू राहील. जुने संसद भवन चांगले असताना एवढ्या मोठ्या खर्चाचे नवे संसद भवन हवे होते काय, इथपासून ते उद्घाटनाचे रुपांतर धर्मसोहळ्यात करणे आवश्यक होते का, इथपर्यंत त्या भरपूर प्रश्नांच्या चर्चा राहतील. प्रश्न आवाज काढतील, प्रसंगी मौनात जातील; पण विरोधी पक्षमुक्त भारत, हिंदू धर्माचा भारत करण्यास निघालेल्यांना काहीच वाटणार नाही. भारतातील सर्वांचा डीएनए सारखाच हा मंत्र ते स्वतः आणि गर्दीने तयार होत असलेल्या साधू-संतांच्या तोंडांनी वदवून घेत राहतील.

आपल्या संसदेने आणि ती बनवणाऱ्या संविधानाने काय दिले, हे सर्वप्रथम समजून घेतले पाहिजे. एक म्हणजे आपली लोकशाही लोकांच्या इच्छेतून आली आहे. इथे कोणताही धर्म, देव, प्रेषित कोणी स्वर्गातला पितापुत्र सार्वभौम नाही, तर लोक आणि त्यांची संसद सार्वभौम आहे. ती धर्म, कर्मकांड, देव आदींच्या सावल्यांपासून मुक्त आहे. निवडून जाणारा प्रत्येकजण देवाधर्माची नव्हे, तर संविधानाची शपथ घेतो. संविधानाने कोणत्याही धर्माचा अनादर केलेला नाही, तर त्याची जागा ठरवून दिली आहे. धर्म घरात आणि मनात संविधान, अशी ती रचना आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले आणि पुढे काही दिवसांतच गुजरातमधील सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराचे निमंत्रण घेऊन काही धर्मवादी राष्ट्रपती आणि पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याकडे गेले. आपली राज्यघटना, संसद, सरकार निधर्मवादी आहे. कोणत्याही धार्मिक कारणात त्याला गुंतवू नये, मीही गुंतणार नाही असे सांगत त्यांनी नम्रपणे निमंत्रण नाकारले. तर राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद जे घटना समितीचे अध्यक्ष होते, यांनी ते भाऊकपणे स्वीकारले. ते कार्यक्रमाला गेले. त्यानंतर ७७ वर्षांनी पूर्णपणे धार्मिक विधीच्या माध्यमातून नव्या संसद इमारतीचे उद्घाटन झाले. ७५ वर्षांत हिंदुत्वाचे पाणी कुठून कुठपर्यंत पोहोचले हे सहज लक्षात येईल. दरम्यानच्या काळात दोन सदस्यांवरचा भाजप दोन-तीनशेच्या घरात गेला. संसदेत साधू-संत निवडून आले. ते त्यांच्या वेशभूषेत वावर करू लागले. केंद्रात मंत्र्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत साधू-साध्वी विराजमान झाले. दुसरीकडे, त्यांच्या धर्मसंसदा तयार झाल्या. कुण्या एका बलदंड पुढाऱ्यासाठी 'पोस्को' कायद्यात बदल करा, असा आग्रह धरत साधूंचे गट दिल्लीवर चाल करून जाण्याची भाषा करू लागले. गेल्या नऊ वर्षांत भारत कुणालाही न दिसणारा आणि स्वयंघोषित महागुरू आणि महासत्ता झाला. अल्पसंख्याकांचे लाड नको म्हणत त्यांच्यासाठी असलेल्या अनेक तरतुदी त्यांनी रद्द केल्या. हज यात्रेत सहभागी होणाऱ्यांवर आणि खर्चावर मर्यादा असेल, काश्मीरविषयीचे कायदे असतील, जात पंचायतींकडे दुर्लक्ष असेल, गायीला राष्ट्रमातेचा दर्जा असेल अशा अनेक गोष्टी असतील. त्या कोणत्याही मागणीशिवाय यशस्वी केल्या जात होत्या. सांस्कृतिक क्रांत्यांसाठी चित्रपट, नाटक, लेखन यांच्या माध्यमातून प्रयत्न होत

होते. जुना इतिहास खोडून नवा बनवला जात होता. या इतिहासाचे नवे नायक अर्थात, हिंदू राष्ट्राचे शिलेदार होते आणि आहेत. गांधी-नेहरूंना खलनायक बनवून गुंडाळण्यात आले. गांधींच्या तर मरणोत्तर हत्या होत राहिल्या आणि त्यांचा खुनी गोडसेचे पुनरुज्जीवन, अवतार घडवला जाऊ लागला. अगदी त्याचे मंदिर उभारण्याचा प्रयत्न होऊ लागला. राज्यघटना अस्पृश्याने लिहिली, असा प्रचार सुरू झाला आणि संविधान नको स्मृती पाहिजे, असा आग्रह धरू पाहणाऱ्या टोळ्या तयार झाल्या. राज्यघटनेची जाळपोळ आणि ती बनवणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची मोडतोड झाली. अल्पसंख्याकांना दाबून टाकण्याचा आणि नव्या राष्ट्रवादाचा जयघोष रोज सुरू आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आपण नव्या संसदेत प्रवेश करणार आहोत. धर्मनिरपेक्षतेचे मंदिर मानल्या जाणाऱ्या जागी आता आपल्याला यज्ञाच्या खुणा दिसतील, स्वर्गातील देवाकडे जाणारा यज्ञाचा धूर तेथे कुठे तरी घुटमळत असेल, वेदमंत्र घुमत असेल आणि राजदंडाची म्हणजे सेंगोलची सावलीही दिसत असेल. चला अध्यात्माकडे असे सांगणारे सुविचार दिसतील. भगव्याचा सुगंध दरवळत असेल. जणू काही हिंदुत्ववाद्यांच्या स्वप्नातील हिंदू राष्ट्राचे मंदिर उगवले आहे आणि धर्मनिरपेक्षतेच्या, लोकशाहीच्या मंदिराला अवकळा आली आहे. धर्माच्या, धर्माधिष्ठित राष्ट्राच्या सावल्या लांब-लांब आणि लोकशाही, संविधान आणि भारतीय लोक असे छातीवर हात ठेऊन सांगणाऱ्यांच्या सावल्या छोट्या-छोट्या होत जाताना दिसतील. कालाय तस्मै नमः किंवा संभवामि युगे युगे म्हणून या गोष्टीकडे पाहून चालणार नाही, तर संविधान की स्मृती, धर्म की विकास, मंदिर की सामान्यांना अन्न-पाणी असे जे प्रश्न उभे आहेत त्यापैकी एक बाजू आपल्याला पकडावी लागणार आहे. २०२४ साल त्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

संसदेच्या उद्घाटनासाठी दक्षिण भारतात भाजपला सतत पराभूत करणाऱ्या तामिळनाडूतून सेंगल म्हणजे राजदंड मागवण्यात आला. खरे तर, राजदंडाची गरज लोकशाहीत नव्हे तर राजेशाहीत असते. परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सत्ता सोपवताना राजदंड वापरला जातो. अशा परंपरेत सत्ता एकाच घराण्यात चालत असते. जशी ती चोल घराण्यात दीर्घकाळ चालत आली होती. प्रचंड मोठे म्हणजे छत्तीस लाख चौरस किलोमीटरमध्ये हे साम्राज्य पसरले होते. युद्ध केल्याशिवाय असे साम्राज्य तयार होत नाही. इ.स.पूर्व २७३ ते इ.स. १२७९ इतका दीर्घकाळ चोलांच्या साम्राज्याच होता. आजच्या श्रीलंका, ब्रह्मदेश, बांगला, मलेशिया, इंडोनेशिया आदींपर्यंत या साम्राज्याचा भूगोल होता. गंमत म्हणजे, आजचे हिंदूराष्ट्रवादी बऱ्यापैकी हा भूगोल मानतात. १९४७ ला जन्माला आलेल्या स्वातंत्र्याचा भूगोल त्यांना मान्य नाही. १५ ऑगस्ट १९४७ ला पुण्यात शनिवारवाड्यावर झालेल्या हिंदुत्ववाद्यांच्या सभेत गोडसेच्या अध्यक्षतेखाली तो नाकारला होता. अर्थात, हा इतिहासही उद्याच्या पाठ्यपुस्तकात आल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. भारताच्या राजकीय इतिहासातील एक वैभवाचा आणि भारताने जग जिंकण्याचा केलेला प्रयत्न असे मानणारा एक वर्ग आहे. राजदंडाचीही परंपरा स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनी संसदेत नेण्यात आली. लोकशाहीत सत्तेचे हस्तांतर कुणी कुणाला राजदंड देऊन करत नाही, तर लोकशाहीचा आत्मा असलेले लोक त्यांना हवे तसे सत्तांतर घडवत असतात. घडवत आलेले आहेत. लोक सार्वभौम असतात, हे पुन्हापुन्हा सांगायला नको. राष्ट्र कोणत्याही धर्मावरचे असो, एका अर्थाने ते भेदावरच उभे असते. धर्म भेद तयार करतो. त्यात त्याची सुरक्षितता असते. धर्माच्या आज्ञेनुसार राजा सत्तेवर येतो असे मानण्याचाही प्रघात असतो. सत्ता राजाची असली तरी डोळे धर्माचे असतात, असेही मानले जाते. आधुनिक लोकशाहीत अशी जीर्ण मते कोणी मान्य करणार नाही. पण आपल्याकडे अशी मते पद्धतशीरपणे लादण्याचा प्रयत्न होतो आहे. गेल्या काही वर्षांत माणसाऐवजी अन्य प्रतीके चालवली जात आहेत. त्यावरच वाद घडवले जात आहेत. माणसापेक्षा मंदिर मोठे, माणसापेक्षा महाआरती मोठी, माणसापेक्षा व्रतवैकल्ये मोठी, माणसापेक्षा भगवी वस्त्रे मोठी आणि आता संसदेपेक्षा हिंदूराष्ट्राचे मंदिर मोठे, धर्मसंसद महत्त्वाची असा प्रकार चालू आहे. यालाच विचारांच्या भाषेत प्रतिक्रांती म्हटले जाते.

साम्राज्यवादी चोळाचे स्मरण करण्याऐवजी स्वतःच्या हिमतीतून आणि सामान्य माणसाच्या सहभागातून स्वराज्य निर्माण करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेतले असते, लोकशाही, समता आणि बंधुतेच्या प्रेरणा बनलेल्या सम्राट अशोकांचे नाव घेतले असते, राष्ट्रपिता म. गांधी, नेहरू, आंबेडकर यांचे नाव घेतले असते तर? पण तसे होणार नव्हते. या सर्वांमुळे हिंदू राष्ट्र जन्माला येणार नाही, तर ते रोखले जाण्याची शक्यता अधिक आहे. जग आणि समाज बदलणाऱ्यांच्या परंपरा मारक ठरतात. एवढेच नव्हे, तर उत्क्रांतवादाचा सिद्धांत सांगणारा डार्विनही मारक ठरतो. स्वाभाविकच इतिहासातला राजदंड लोकशाहीत आणण्याचा प्रयत्न होतो. असा राजदंड जो नेहरूंनी वस्तूसंग्रहालयात ठेवायला सांगितले होते, तो आता कारभाऱ्याने कपाळावर टेकवला. जणू काही सत्तेचे तेच पुन्हा अधिकारी होणार आहेत.

राजदंड तसा तर भारतात अनेक ठिकाणी उपलब्ध झाला असता. पण तामिळनाडूतच का, असाही प्रश्न तयार होतो. त्याचे उत्तर थेट कोणी सांगत नसले तरी भाजपच्या ते राजनितीतही आहे. तामिळनाडूतील जनतेने भाजपला तिळमात्र स्थान दिलेले नाही. राजदंड वापरून ते मिळविता येते का, हाही एक हेतू असू शकतो. तामिळनाडू चोळ राजासाठीच प्रसिद्ध नाही, तर त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या तिरूवल्लुवर या महाकविंचाही वारसा घेता आला असता. सम्राट अशोकांचा घेता आला असता. पण त्याऐवजी शैवपंथीय हिंदू चोळांचा तो घेण्यात आला. हे सहजासहजी घडले नाही, तर ते घडवले गेले आहे. मुळात लोकशाहीमूल्यांना कोणता राजदंड चालत नाही, तर लोकभावना आणि स्वतंत्र लोक हेच राजदंड असतात. हे सारे हिंदुत्ववाद्यांना ठाऊक आहे. पण मुळात त्यांना हिंदू राष्ट्राकडे जायचे असल्याने ही सारी प्रतीके ते वापरत असतात. धर्माधिष्ठित राष्ट्रात धर्म प्रमुख असतात, लोकशाही नव्हे. स्मृती-पुराणे प्रमुख असतात, संविधान नव्हे. जातव्यवस्था प्रमुख असते, बंधूता नव्हे. खरंच आपण हिंदू राष्ट्राकडे जाणार असू, तर या सर्व गोष्टींचा विचार करायला हवा. त्यांनी कुठे जायचे ठरवले आहे. तुम्ही कुठे जायचे हे ठरवा.

# अँटीमुस्लिम बहुजन



प्रा. जयदेव डोळे

**१९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन झाला. हिंदू राष्ट्र स्थापन करण्यासाठी कटिबद्ध झालेले त्यांचे विचार अचानक मुसलमान, ख्रिश्चन, कम्युनिस्ट यांना शत्रू मानतात आणि हा देश फक्त हिंदूंचाच आहे असे बजावू लागतात. या प्रचाराला त्या काळी फार लोक भुलले नाहीत. कारण ब्राह्मणेतर चळवळ जोमात होती. राज्यघटना आणि स्वातंत्र्य यामुळे यापुढे अशा चळवळींची गरज उरली नाही; परंतु हिंदू राष्ट्रवादी ब्राह्मणी पुनरुज्जीवनवादी टपून बसले होते. २०१४ साली त्यांनी संधी मिळवली. ब्राह्मणांचा सारा रोष व रोख त्यांनी मुसलमान, ख्रिश्चन, डावे यांच्याकडे वळवला. ब्राह्मणांच्या आहारी गेलेल्या बहुजनांना त्यांनी फितवले. त्याचीच परिणती कोल्हापुरातल्या 'औरंगजेब' कारस्थानात झालीय.**

महाराष्ट्र पेटवला जातोय. उगाचच नाही. पेटून उठणारी माणसे जिथे जोवर असतात, तोवर पेटवणारे असतात. राजकारण हे क्षेत्र असे आहे, जिथे पेटवणारे जास्त असतात. खूप पूर्वी भांडवलदार नावाची एक अदृश्य, अमूर्त अन् अगाध व्यक्ती किंवा व्यक्तीचा समुदाय कामगारांत व कष्टकऱ्यांत चीड उत्पन्न करायचा. कामगार पुढारी शोषणाचे प्रकार समजावून सांगत, कामगारांचे अधिकार उलगडून दाखवत तेव्हा हे श्रमिक पेटायचे आणि संप, सत्याग्रह, धरणे, मोर्चे किंवा कामबंद आंदोलन करायचे. आपला अनुभव कोणी हुशार नेत्याने तो कसा पिळवणुकीत व अन्यायात जमा होतो हे सांगितले, की कामगार आधी जागृत व्हायचे आणि नंतर त्वेषाने काही कृती करायचे. हिंसा कधी क्वचित व्हायची. पण ती कारखान्याबाहेर अथवा समाजात पसरत नसे.

आता मुसलमान ही एक अशी व्यक्ती आणि व्यक्तीचा समुदाय बनली आहे, जिच्याविषयी काहीबाही सांगून माथी भडकवली जातात. शोषण, पिळवणूक, अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार, फसवणूक असा कोणताही आरोप त्याच्यावर न केला जाता अत्यंत मामुली व अतर्क्य कारणांवरून मुसलमानांवर सारा राग काढला जातोय. ज्याच्यावर सध्या राग आलाय तो मुसलमान १७०७ साली म्हणजे तीनशे वर्षांपूर्वी मेलेलाय. त्याची राजवट किंवा त्याचे वंशज असे कहीही शिल्लक राहिलेले नाहीय. तरीही त्याच्यावर आगपाखड करून डोकी फिरवली जात आहेत. कोणाची डोकी? कोण आहेत ते?

**...तरीही औरंगजेब कोणाला पेटवून गेला?**

औरंगजेब गुजरातमध्ये दाहोद या गावी जन्मला आणि मेला अहमदनगरमध्ये. त्याची कबर खुलताबाद येथे आहे. या सम्राटाने छत्रपती संभाजी राजेंचा छळ करून त्यांचा जीव घेतला म्हणून आपल्याला त्याचा राग येतो. अशा औरंगजेबाची तसबीर आज अचानक कोणाला आवडू लागली अन् कोणाला चीड आणू लागली म्हणून कोल्हापूर, आष्टी आदी गावे भडकली. दंगलीसारखी स्थिती त्यामुळे निर्माण झाली. तीनशे वर्षे झाली, ना औरंगजेब कधी कौतुकाचा विषय झाला, ना कधी संतापाचा. झाले गेले इतिहासजमा



झाले सगळे. संभाजी महाराजांविषयी हिंदुत्ववादी नेत्यांनी व इतिहासकारांनी जी बदनामी करून ठेवली होती, तीही मधल्या काळात नाहीशी झाली. बहुजन समाजातल्या तरुण व नव्या दमाच्या इतिहासकारांनी संशोधन करून संभाजी राजेंचा इतिहास ठाकठीक केला. त्यांच्या नावाने महाराष्ट्रात संघटना, संस्था चालतात. तरीही औरंगजेब कोणाला पेटवून गेला? ज्या गावात अजूनही संभाजी राजे असे नाव असलेली व्यक्ती आहे, त्या गावातच का? जे गाव छत्रपती शाहू महाराजांच्या प्रभावामुळे कधीही हिंदू-मुस्लिम तणावाखाली गेले नव्हते, त्याचे ताळतंत्र का बरे हलले?

उघड आहे. शाहू महाराजांचा पुरोगामी, परिवर्तनवादी वारसा त्यांना मानणाऱ्या बहुजनांकरवीच उद्ध्वस्त करायचा डाव यशस्वी झालाय. ज्या महाराजांनी कधीही मुसलमान, इस्लाम वा पैगंबर आदींबद्दल वाईट चिंतिले नव्हते, त्यांच्या गावी मुद्दाम मुसलमानांविरुद्ध कसले निमित्त काढून हिंसक झालेले लोक रस्त्यावर उतरले. महाराज आर्य समाजाचे अनुयायी होते. जातिप्रथा व मूर्तिपूजा न मानणारा; पण वेदांवर विश्वास ठेवणारा हा एक पंथ. पण शाहू महाराजांनी जो इतरांवर थोपवला नाही. महाराजांनी मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी कोल्हापुरात बोर्डिंग बांधून दिले (उर्वरित पान २४ वर...)

# संघर्षाच्या राखेतून....



प्राचार्य
प्रभाकर बागले

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा काळ आठवला, की दोन चित्रं डोळ्यासमोर येतात. एक म्हणजे दलित-वंचितांची गरिबी आणि अज्ञान, त्यांच्या मनोविश्वाला ते डोळस असून प्रकाशाची जाणीव नसणं, स्वत:च्या श्रमशक्ती नियतीच्या स्वाधीन करणं. हे एक चित्र - अज्ञानाचं; पण निदान या अज्ञानाच्या कोऱ्या पाटीवर काहीतरी लिहिता येतं. प्रागतिक होण्याचे काही संकेत तिथं दिसू शकतात. या काळातलं दुसरं चित्र असं, की हिंदू समाजातील पुरोहित वर्गाच्या सामूहिक जाणिवा जात नावाच्या संज्ञेनं काळवंडून गेल्या होत्या. या वर्गाचं अनुकरण इतरही करत होते. धर्मशास्त्राचं पालन ही त्यांची नियती होती आणि नियतीत स्वतंत्र विचाराला स्थान नसतं. तो थांबला की अज्ञानाचा प्रदेश लागतो. म्हणजे या दोन्ही चित्रांत अज्ञान हा एक सामान्य घटक आहे. हा घटक दोन्ही चित्रांना अभिन्न करणारा आहे. या दोन प्रकारच्या अज्ञानांमध्ये बाबासाहेबांना ज्ञानाची पणती घेऊन उभं राहणं हाच एक पर्याय होता. या पर्यायाला ते कसे सामोरे गेले, या मध्यवर्ती सूत्राविषयी थोडा ऊहापोह व्हावा हा एक मानस.**

या लेखाची सुरुवात आधुनिक काळातील जगप्रसिद्ध इंग्रजी वाक्यापासून करतो. All animals are equal but some animals are more equal than others. जॉर्ज ऑरवेलनं - - animal farm - - नावाची कादंबरी लिहिली त्यातील हे वाक्य आहे. हे वाक्य विषमतेच्या संकल्पनेच्या प्रदीर्घ इतिहासावर प्रकाश टाकणारं आहे. १९२५ च्या नंतर तर या संकल्पनेच्या आक्रमकतेची तीव्रता वाढतच गेली. कमी सिद्धांत, श्रुती-स्मृतीचं पाठबळ, श्रेणीयुक्त सामाजिक रचना, कर्मकांडाचा प्रभाव आदी घटक हिंदू धर्मातील पुरोहितशाहीच्या पथ्यावर पडले आणि हिंदूंच्या जातीय जाणिवाने सामाजिक, सांस्कृतिक जीवन विघटित केलं. माणसाला माणूस म्हणून जगणं कठीण केलं.

अशा समाजाला दलित-वंचितांची आठवण होईल का? त्यांच्या सुखदु:खात सामील होण्याची कल्पना तरी सवर्णाला स्पर्शून जाईल का? ही कल्पनाही मला स्पर्शून जात नसेल, तर मीही प्राणीसदृश्य पातळीवरचं जीवन जगत नाही का? अशी मला कोणी जाणीव करून दिली तर मला चालेल का? माझं मन मला स्वस्थ बसू देईल का? बसू देणार नाही. कारण ती माझ्या मनाला झालेली जखम असते आणि तिला कधीही सॉप्टिक होत नसतं.

**...त्यांच्या ज्ञानपिपासेला सीमा नव्हती**

असा एक आजन्म ओल्या जखमा वाहणारा, संघर्षाच्या राखेतून ज्ञानाच्या दिशेनं झेप घेणारा एक फिनिक्स जन्माला आला, त्याचं नाव बाबासाहेब आंबेडकर. त्यांनी जे परिवर्तन घडवून आणलं त्याला फळ आलं. शिक्षणाचा प्रसार झाला. अनेक महाविद्यालयं, विद्यापीठं निघाली. दलित-वंचितांमधली मंडळी विभागप्रमुख म्हणून काम करताहेत, रावसाहेब कसबेंसारखे विचारवंत प्रेरणास्थान होताहेत. हजारो मुलं शिक्षण घेताहेत, प्रगतीपथावर आहेत. कम्युनिकेशन गॅप



कमी होताना दिसत आहे. पण याचा अर्थ सगळं आलबेल आहे असं नाही. हे म्हणण्याचं कारण केवळ कम्युनिकेशनच्या पातळीवर आपण जगत राहिलो, तर आपल्या वागण्यात उपरेपण येण्याची शक्यता असते. मनाची आणि मेंदूची वाढ या पातळीवर होत नसते. त्यांना ज्ञानात्मक संवेदन लागतं आणि यासंदर्भात रामजींची आठवण होते. ते पोटाला चिमटा देऊन, बाबासाहेबांसाठी पुस्तकं आणायचे. कधी शेक्सपिअरची तर कधी टागोरांची. आज आपली आर्थिक क्षमता वाढली आहे. पालक म्हणून आज आपण आपल्या पाल्यासाठी - त्यांच्या अवांतर वाचनासाठी पुस्तकं आणतो का? वाचनाची गोडी लागेल असं वातावरण तयार करतो का? आंध्रमधील जॉन पिटा नावाच्या एका खेड्यात 'आंबेडकर नॉलेज सेंटर' आहे. ज्ञान जिज्ञासेचं विकसित रूप तिथं पाहायला मिळतं. किती विद्यार्थ्यांनी ते पाहिलं? किती शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सहली तिकडे नेल्या? नुसतं

बाबासाहेबांना ज्ञानसूर्य म्हणून चालेल का? त्यांच्या नावानं असं एखादं नवं सेंटर निघणं गौरवशाली नाही का? त्यांच्या ज्ञानपिपासेला सीमा नव्हती.

उदा. ते B.A. M.A. झाले. कोलंबिया विद्यापीठातून पीएच. डी. झाले. M.Sc. झाले लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून, बॅरिस्टर ॲट लॉ केलं. B.Sc. हस्तगत केली, १३-९-२०१५ला कोलंबिया विद्यापीठानं No.1 स्कॉलर ऑफ द वर्ल्ड म्हणून घोषित केलं. या विद्यापीठांचा एखादा कोर्स करायचा तर किमान एक वर्ष लागतं. बाबासाहेब कोलंबियात ३ वर्षे होते. मुख्य शिक्षण घेत असतानाच त्यांनी किती कोर्सेस केले ते नजरेखालून घालण्यासारखं आहे. इकॉनॉमिक्स १२, इतिहासात ६, समाजशास्त्रात ६, तत्त्वज्ञानात ५, मानववंशशास्त्रात ४, राज्यशास्त्रात ३, फ्रेंच आणि जर्मनमध्ये १-१, त्यांचं एकंदर ९ भाषांवर प्रभुत्व होतं. रोज ते १८ तास अभ्यास करायचे. त्यांचा ग्रंथसंग्रह ५०,००० चा होता. ते व्हायोलिन वाजवत. पेंटिंग करत. पण...

**कोणाच्या तरी त्यागावरच कर्तृत्वाचं अलौकिकपण आकार घेत असतं**

कोलंबिया आणि लंडन ही नावं ऐकली, की रमाईची आठवण होणं स्वाभाविक आहे. ४ मुलांचा बालपणीच झालेला मृत्यू आणि त्याचं शब्दातीत दुःख, गरिबी पाचविला पुजलेली, अशा परिस्थितीत संसाराचा गाडा ओढणं त्यांना किती कठीण गेलं असेल? पावाच्या तुकड्यावर त्यांनी रात्र-रात्र काढलेली आहे. रात्री १० च्या नंतर त्या शेण गोळा करायला जायच्या; नंतर थापणं, त्यानंतर झोप. एक दिवस त्यांना कळलं, की वसतिगृहातील मुलं दोन दिवसांपासून उपाशी आहेत. त्यांनी लगेच अंगावरचं सोन्याचं किडूकमिडूक काढलं, थोडे पैसे होते तेही दिले. अशा अडचणी बाबासाहेबांना त्यांनी कळू दिल्या नाहीत. त्या कळल्या असत्या तर त्यांचं चित्त विचलित झालं असतं, वाचनात खंड पडला असता इतकं त्या बाबासाहेबांना जपत होत्या. मुकाटपणे दुःख सहन करत होत्या. त्या जेव्हा गेल्या तेव्हा बाबासाहेबांनी स्वतःला घरात कोंडून घेतलं. जणू ते लग्नानंतरच्या आठवणींना चिंब करत होते.

जगाचा नियमच असा दिसतो, की कोणाच्या तरी त्यागावरच कर्तृत्वाचं अलौकिकपण आकार घेत असतं. U.N.O. सारख्या जगातील शिखरस्त संस्थेमध्ये बाबासाहेबांची १२५ वी जयंती 'नॉलेज डे' म्हणून जेव्हा साजरी होते, तेव्हा रमाईचं mute presence तो सोहळा पाहत असेल असं वाटू लागतं.

**बाबासाहेबांची त्रिसूत्री आजही तेवढीच आशयघन**

विषमता आणि अस्पृश्यता यांनी निर्माण केलेला वेदनानुभव बाबासाहेबांसाठी नवीन नव्हता. पण तो कोणाच्याही वाट्याला येऊ नये असं त्यांना वाटत होतं. दलितांना त्यांच्या सुप्तशक्तीचं भान यावं, त्यांचा आत्मविश्वास वाढावा, स्वतःच्या नजरेनं वास्तवाकडे पाहता यावं, बरोबरीच्या नात्यानं राहता यावं, नवं काही करण्याची ऊर्मी अनुभवता यावी म्हणून त्यांनी एक त्रिसूत्री त्यांच्यासमोर ठेवली. (Educate, Agitate, Organise) ती आजही तेवढीच आशयघन आहे. वर्तमानसंदर्भात आपण तिच्याकडे कसं पाहतो त्यावर अवलंबून आहे. आज सामाजिक क्षेत्रात जी स्थितिशीलता दिसते ती अस्वस्थ करणारी आहे. सामाजिक हा शब्द मी व्यापक अर्थानं वापरला आहे. यापैकी शैक्षणिक घटक घेतला तर आज काय दिसतं? अनुदानित महाविद्यालयं ओस पडलीत. दलित-वंचित विद्यार्थ्यांना सवलती आहेत. पण शिक्षणाचा खेळखंडोबा झाल्याचं त्यांच्याही लक्षात आलं आहे, पण तेही गप्प आहेत. दर्जेदार शिक्षणासाठी चळवळीची गरज आहे. त्यासाठी संघटित होणार की नाही? नेतृत्वापर्यंत जाऊन हे सांगणार की नाही, हे शिक्षण बेकारी वाढवणारं आहे, नेत्यांना सांगा की बाबासाहेबांनी एज्युकेटेड आणि इंटलेक्चुअल असा भेद का केला? (शिक्षित आणि बुद्धिजीवी) कारण बुद्धिजीवी हा तर्कशुद्ध विचार करणारा असतो. सामाजिक जीवनाचं आधुनिकीकरण करण्याची त्याच्यामध्ये धमक असते. समाजवास्तवातील अंतर्विरोधांना सामोरं जाण्याची क्षमता असते. सर्जक शक्ती असते. बुद्धिजीवी खळखळून वाहणाऱ्या नदीसारखा असतो, तर शिक्षित तळ्यातल्या पाण्यासारखा. तुम्ही तुमच्या नेतृत्वाला हे पटवून द्या आणि I.I.T. सारख्या संस्था काढल्याशिवाय आपली प्रगती होणार नाही. याचा अर्थ असा, की बाबासाहेबांच्या या त्रिसूत्रीचा विचार वर्तमान परिस्थितीच्या संदर्भात झाला पाहिजे. 'आंबेडकर नॉलेज सेंटर'च्या धर्तीवर त्याचा विचार झाला पाहिजे. त्यासाठी महाराष्ट्रात मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र अशा चार विभागांत १-१ सेंटर हवं. प्रत्येक विभागातील दलित नेत्यांनी हे काम अग्रक्रमानं हाती घेतलं पाहिजे. आजवर आमचा मेंदू माहितीपर्यंत पोचला. आम्हाला ज्ञानाचा आनंद कधी घेता आला नाही. ज्ञानप्रक्रियेत गुंतल्याशिवाय जातीय जाणिवा कमी होणार नाहीत. या जाणिवांच्या विरोधात बाबासाहेबांनी ३०-३० वर्षे संघर्ष केला. या त्रिसूत्रीला त्यांनी स्वतः प्रत्यक्षात आणून समाजाला प्रेरित केलं. त्यांनी संविधानात्मक आंदोलनावरचा विश्वास कधी कमी होऊ दिला नाही. ही त्यांची तळमळ विसरून कसं चालेल?

वर उल्लेखिलेल्या त्रयीसोबत अजून एक त्रयी आहे, जी त्यांच्या (Being) अस्तित्वाचा भाग झालेली दिसते. ती म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुभाव वा भाईचारा. १८ व्या शतकाच्या शेवटी फ्रान्समध्ये जी क्रांती झाली, तीमधून ही त्रयी जन्माला आली. हे केवळ शब्द नाहीत, तर ते मानवी मूल्यभावाच्या अनंत क्षमता असणारे शब्द आहेत. भारतीय राज्यघटनेत ते समाविष्ट आहेत. भारतात विभिन्न जाती-जमातींचे लोक राहत आहेत. माणूस म्हणून जगण्याचा प्रत्येकाचा हक्क आहे. हा हक्क बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचं प्राणभूत तत्त्व आहे. या तत्त्वाचा अनेक अंगांनी ते विचार करू शकत होते. ते अर्थशास्त्रज्ञ होते, राज्यशास्त्राचे अभ्यासक होते, मानववंशशास्त्रज्ञ होते, समाजसुधारक होते. तत्त्वज्ञ, ज्ञानमीमांसक, शिक्षणशास्त्रज्ञ, राज्यघटनेचे शिल्पकार होते आणि कायदा व न्यायमंत्री, बॅरिस्टर होते. भारतीय जीवनातील अनेक क्षेत्रांत त्यांनी ठोस स्वरूपाचं कार्य केलं, नवा विचार दिला, नवा दृष्टिकोन दिला. नव्या विचाराला नेहमीच विरोध होत असतो. विविध ज्ञानांच्या ज्या पातळ्यांवरून ते प्रश्नाकडे पाहत होते तो आवाका इतरांकडे असेल असं नाही. त्याचप्रमाणं ते दलित बांधवांच्या समस्यांकडे पाहत होते तो ॲंगल इतरांकडे असेलच असं नाही. उदा. घेता येईल. बाबासाहेबांचं जातीचं आकलन त्यांनी भोगलेल्या वेदनांचा आणि दलित बांधवांच्या तशाच

अनुभवाचा परिपाक म्हणून झालेलं होतं. म. गांधींचा Caste Consciousness त्यांच्या धर्मविषयक श्रद्धेनं संस्कारित झाला होता. राजकीय अन्याय्य दहशतीपेक्षा सामाजिक अन्याय्य दहशत किती भयानक असू शकते हे ती अनुभवलेला माणूसच सांगू शकतो. सुदैवानं दलित समाजाला ज्ञानाची प्रगल्भता असणारं नेतृत्व लाभलं. त्यांच्यामधला कार्यकर्ता विवेकी लढवय्या होता.

**अनुभवक्रिया ही कालमानात घडत असते**

Annihilation of Caste मध्ये बाबासाहेब जात-पात-तोडक मंडळाच्या एका सदस्याला एक प्रश्न विचारतात. तुम्ही जात नको म्हणता तर तुमचं समाजाविषयीचं स्वप्नं सांगाल का? आणि तुम्ही मला विचाराल, तर मी म्हणेल की माझ्या समाजाचं अधिष्ठान स्वातंत्र्य, समता आणि भाईचारा या त्रिसूत्रीत सापडेल. शिवाय त्यामध्ये एक लवचिक सहजता असेल, त्यात अनेक वाहिन्या असतील, ज्यातून जागतिक स्वरूपाच्या बदलाविषयी माहिती येत राहील आणि आपला समाज नेमका कुठं आहे ते कळेल. आपल्या अनेकांगी कुतूहलाचं संप्रेषण तीत होत राहील असा विश्वास देणारा तो समाज असेल. मानवी संबंधांना कुठेही तडा जाणार नाही असा तो असेल आणि त्याचबरोबर व्यक्तीच्या प्रतिष्ठेकडे आदरभावाने तो पाहणारा असेल. एका लढवय्याचं हे स्वप्न आहे. पण हा लढवय्या एक मोठा विचारवंत आहे. त्याला Consciousness of Kind ही संकल्पना नव समाजनिर्मितीच्या संरचनेत असावी असं वाटतं. कारण त्याशिवाय एकजिनसीपण त्यात येणार नाही. या एकजिनसीपणाचा गाभा म्हणजे व्यक्तीव्यक्तीमधली आंतरक्रिया आणि त्यांच्यामधली सहअनुभूती. आंतरक्रिया आणि सहअनुभूती हे दोन शब्द अनुभवक्रियेशी निगडित आहेत आणि अनुभवक्रिया ही कालमानात घडत असते आणि या प्रक्रियेत ज्ञानाची निर्मिती होत असते.

**व्यक्ती-समष्टीला एकवटून पाहण्यासाठी द्रष्टेपण आवश्यक असतं**

बाबासाहेबांचं एक वैशिष्ट्य असं, की ते कालप्रवाह आणि ज्ञान यांच्या अनुबंधाकडे नव्यानं पाहतात. कालप्रवाहात ज्ञानाची परिमाणं दिसू लागतात आणि त्या ज्ञानाच्या आधारे कालप्रवाहाचं आकलन अधिक वस्तुनिष्ठपणे करता येतं. त्यांचं हे ज्ञानात्मक संवेदन त्यांनी खास करून विश्लेषणासाठी वापरलं. मग ते विश्लेषण प्राप्त परिस्थितीचं असो की घटनांचं, राष्ट्रवादाचं असो की लोकशाहीचं, धर्माचं असो की जातीचं किंवा त्यांनी अर्जित केलेल्या ज्ञानाचंही असू शकतं. हे शेवटचं विश्लेषण त्यांच्या द्रष्टेपणाला अधोरेखित करणारं आहे. कारण व्यक्ती-समष्टीला एकवटून पाहण्यासाठी द्रष्टेपण आवश्यक असतं.

व्यक्तीच्या अंतरंगात शिरून तिच्या भावविचाराचं आकलन करणं एकवेळ सोपं जाईल. पण समष्टीच्या Psycheचं समूह जाणिवाचं आकलन करणं सोपं नसतं. कारण समष्टीच्या सायकीत वा मनात शिरणंच मुळात सोपं नसतं. बाबासाहेबांच्या वाट्याला सवर्णाचं समूहमन आणि दलित वंचितांचं समूहमन आलं होतं. या ऐतिहासिक द्वंद्वात ते सापडले होते. पण त्यांचं चिंतनशील मन यातून मार्ग काढण्याचा विचार करतच होतं. दलितांच्या समूहमनात जातीय जाणिवांच्या विरोधी लढण्याची प्रेरणा रुजवायची होती आणि सवर्णाच्या समूहमनात Consciousness of Kind रुजवायचा होता असं दिसतं. म्हणजे त्यांच्या Caste Consciousness मध्ये परिवर्तन घडवून आणायचं होतं. म्हणून तर ते रात्रंदिवस लढत होते हे निश्चित. 'कास्ट कॉन्शसनेस' आणि 'कॉन्शसनेस ऑफ काइंड' हे विरोधाभासी शब्द जाणीवपूर्वक मी एकत्र आणले, एवढंच.

**...या द्रव्यांना वैश्विकता प्राप्त झालेली असते**

गिडिंग्ज नावाच्या विचारवंतानं 'कॉन्शसनेस ऑफ काइंड' या संकल्पनेचा विस्तार केला. ही मूळ कल्पना ॲडम स्मिथची आहे. त्यांच्या मते या संकल्पनेत नैतिक सहअनुभूतीची परिमाणं असतात.

## बाबासाहेबांना दांभिक परिवर्तनावर विश्वास नव्हता

बाबासाहेबांनी अनेक चळवळींचं नेतृत्व केलं. महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश, दक्षिण भारतातील Self-Respect Movement, दलित बुद्धिस्ट मुव्हमेंट आदी चळवळी महत्त्वाच्या ठरल्या. हे सगळे लढे माणसामधलं मनुष्यत्व अधोरेखित करण्यासाठी होते. वर्ण समाजवास्तवातील अंतर्विरोध चव्हाट्यावर आणण्यासाठी होते. हिंदू धर्मातील श्रुती-स्मृती, शास्त्रांना आव्हान देण्यासाठी होते. हिंदू धर्मातील जातीय जाणिवांमुळं समाजाची विघटन प्रक्रिया कधी थांबलीच नाही, हे ते आपल्या लिखाणातून आणि वक्तव्यातून ३०-३० वर्षे सांगत राहिले. बाबासाहेबांचा Anti-Caste-Consciousness फार चिवट असावा. मला तर असं वाटतं, की या संज्ञेला समजून घ्यायचं असेल तर वडाच्या झाडाची प्रतिमा डोळ्यासमोर आणावी. वडाच्या झाडाची मुळं जमिनीत खोलवर जात असतात, तशी या संज्ञेची मुळं त्यांच्या नेणिवेच्याही आत गेली असावी. कारण बाबासाहेब सतत आपले सगळे समाज जात्यतीत व्हावेत या प्रयत्नात होते. पण समजा उद्या त्यांच्या संज्ञेला जाग आली आणि तिला वाटलं, की जमिनीच्या पृष्ठभागावर काय चाललं आहे, ते पाहून यावं तर तिला काय दिसेल? वडाच्या पारंब्या डोलताहेत. पण प्रत्येक पारंबी ही Caste-Conscious दिसते आहे. हे आपलं आजचं नग्न वास्तव आहे. आज त्याची रूपं बदलली आहेत. अतिशय तलम आणि सूक्ष्म रूपात ती अस्तित्वात आहेत. आज सुशिक्षितांमधले हुंडा मागत नाहीत. ते वधूपक्षाला एवढंच सांगतात, की आमच्या लौकिकाला शोभेल असं करा. बाबासाहेबांना अशा प्रकारच्या दांभिक परिवर्तनावर विश्वास नव्हता.

ते म्हणतात, हिंदूंच्या जातीय जाणिवा इतक्या टोकदार आहेत, की त्यांच्या लेखी समाज म्हणजे जात आणि जात म्हणजे समाज, 'मी आहे म्हणजे जात आहे आणि जात आहे म्हणून मी आहे' I think therefore I am याचं अध:पतीत रूप वरील विधानात सापडतं.

## ही एक अभूतपूर्व आणि गौरवशाली घटना

समतेचा इतका सूक्ष्म विचार करणारे बाबासाहेब एक ज्ञानसाधक म्हणून, आपल्या कल्पक बुद्धीनं भविष्यासाठी एक स्वप्न स्वतःत वागवत असावेत. त्यांना स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या मूल्य त्रयीचं विस्तारित रूप भारतीयसंदर्भात राज्यघटनेत प्रतिबिंबित व्हावं असं ते स्वप्नं होतं. ते लिखित रूपात आलं. ही एक अभूतपूर्व आणि गौरवशाली घटना आहे. अभूतपूर्व यासाठी की त्यांनी गरिबी सोसली, अपप्रवृत्तीनं केलेला अपमान गिळला. पण याची पुसटशी लकेरही घटनेत दिसत नाही. अशी विशुद्ध वस्तुनिष्ठ दृष्टी त्यांनी आपल्याला दिली आणि त्याचबरोबर ज्ञान आणि अनुभव यांच्या नात्याकडे कसं पाहावं हे त्यांनी त्यांच्या कृतीतून दाखवलं. कारण या दोहोंमधील नात्याला एक तात्त्विक अंग असतं. ते असं, की एक अनुभवनिर्मित ज्ञान असतं, तर दुसरा ज्ञाननिर्मित अनुभव असतो.

गिडिंग्जच्या मते एकजिनसी समाजाच्या निर्मितीसाठी ती उपकारक ठरते. याचा उल्लेख आधीच केलेला आहे. या संकल्पनेत आंतरिक आणि बाह्य अस्तित्वाचं भान अभिप्रेत आहे आणि तात्त्विक अंगानं तिच्याकडे पाहिलं, तर आत्मचिंतन आणि संवेदनात्मक अनुभव हे शब्द आशयघन वाटू लागतात. बाबासाहेबांसारख्या ज्ञानमीमांसकाला ही संकल्पना अभिप्रेतच असणार. कारण ज्ञान हे मनाच्या मशागतीसाठी आवश्यक असतं. तेव्हा अस्तित्वाला अर्थ प्राप्त होत असतो असं त्यांचं ठाम मत आहे. तरच नवसमाजनिर्मितीचं स्वप्न साकार होत असते. पण त्यासाठी कास्ट कॉन्शसनेसला मुळासकट फेकता आलं पाहिजे. पण ते त्यांना कठीण होत गेलं. मग त्यांनी मानववंशशास्त्राच्या अंगानं त्याचा विचार करायला सुरुवात केली. युंग या मनोविश्लेषकाचं वैचारिक साहित्य वाचत असताना Hell नरक हा शब्द पुनःपुन्हा येत गेला. युंग म्हणतात, की जगातील जवळपास सर्व धर्मात हा शब्द येतो. स्वर्ग हा विरुद्ध अर्थी शब्दही येतो. पण नरक या शब्दाला असलेली नकारात्मकता माणसाला भयावह वाटत आलेली आहे आणि नरक हा शब्द माणसाच्या सामूहिक नेणिवेत (Collective Unconscious) रुतलेला आहे, असं युंग यांचं प्रतिपादन आहे. या सामूहिक नेणिवेबाबत दोन शब्द. आपल्या बोलण्यात ईश्वर, जन्म-मृत्यू, आत्मा, स्वर्ग-नरक, सत्य-असत्य, अनुभव-प्रचिती आदी शब्दांचा, नैसर्गिक घटकांचा वापर करत आलेले आहोत. या सामूहिक नेणिवेतील द्रव्ये वंशपरंपरेनं मिळालेल्या मेंदूच्या रचनेत वारशाने आलेली असतात. या द्रव्यांना वैश्विकता प्राप्त झालेली असते. प्रतिमेच्या रूपात ही द्रव्ये आपल्यापर्यंत येत असतात. आदिम जमातीच्या गीतांमधून या प्रतिमा आविष्कृत झालेल्या आहेत.

हे थोडं स्पष्टीकरण यासाठी केलं, की 'कास्ट कॉन्शसनेस' हा आपल्या सामूहिक नेणिवेचा भाग झाला आहे. जणू ती एक आदिप्रतिमाच आहे. बाबासाहेब या प्रतिमेशी लढत होते. स्वर्ग-नरक, पाप-पुण्य या प्रतिमांचं पुरोहितशाही भांडवल करत होती. सामान्य माणसानं 'नरका'चा धसका घेतलेला असतो. अशा अनेक अज्ञानजन्य प्रथा तो पाळत असतो. बाबासाहेबांना या समूहमनाच्या विविध पातळ्यांवर जाऊन कधी फुंकर घालून, तर कधी त्या मनातील स्वत्वाला जागं करून कार्य करावं लागत होतं आणि याच समूहमनाला ते चळवळीत खेचत होते. चळवळ म्हटल्यानंतर संघर्ष करावाच लागतो. पण चळवळीला जर नैतिक अधिष्ठान असेल, तर चळवळ जनतेच्या स्मरणात राहत असते. महाडचा सत्याग्रह (१९२७) हा सामाजिक जीवनात समता प्रस्थापित करण्यासाठी होता. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली २,५०० सत्याग्रही चवदार तळ्याभोवती होते. सवर्णांनी स्पृश्य-अस्पृश्य या भेदाला सार्वकालिक असं रूप दिलं होतं. हा समाज सार्वजनिक स्थळं आणि वस्तूंना जणू अस्पृश्यता पाळायला लावत होता. सत्याग्रहींनी आपल्या ओंजळींनी त्या तळ्याला 'स्पृश्य' केलं आणि एक क्रांतिकारी क्षण अनुभवला. जातीय जाणिवांनी निर्माण केलेल्या विषमतापूर्ण संकेतांना त्यांनी झुगारलं आणि समता ही स्वयंसिद्ध असते, aximatic असते. तो आमचा हक्क आहे. या हक्काला पुरावा देण्याची गरज नसते. उलट या हक्काला generic केलं पाहिजे म्हणजे तिला वैश्विक पातळीवर नेण्याची गरज आहे. बाबासाहेबांनी ती U.N.O. पर्यंत नेली. पण त्याहीपेक्षा ती आमच्या स्वभावाच्या, आमच्या सवयीचा भाग झाली पाहिजे, असं त्यांना वाटत होतं. समता या संकल्पनेचा स्वभाव तिच्या आंतरिकतेत आणि स्वयंपूर्णतेत आहे हे त्यांनी ओळखलं होतं. म्हणून तिला संकल्पनेच्या पातळीवरून प्रत्यक्षाच्या पातळीवर आणले पाहिजे, भावलं पाहिजे, अन्न खाल्ल्यावर ते रक्ताच्या रूपात जसं शरीरभर पसरतं तसं या संकल्पनेनं शरीरभर पसरलं पाहिजे, सवयीच्या रूपात ती अस्तित्वात आली पाहिजे. (not on conceptual level; but on habitual level)

**म्हणून त्यांनी बौद्धधर्म स्वीकारला**

या दोन्ही घटकांच्या आंतरक्रियेतून हाती असलेल्या विषयातील नवी परिमाणं दिसू लागतात, काही पर्याय लक्षात येतात. त्या पर्यायांचा वेध घेणं म्हणजे सत्याच्या जवळ जाणं असतं. सत्य हे सगळ्यांनाच खुणावत असतं. साहित्यिक आपल्या कल्पनाशील वास्तवाच्या आविष्कारातून सत्याला जवळ करण्याचा प्रयत्न करतो आणि वैज्ञानिक आपल्या कल्पनेच्या समर्थनार्थ प्रयोगाचा-अनुभवाचा उपयोग करून सत्याचा पडताळा घेत असतो आणि त्याचवेळेस तो त्याच्या प्रयोगाचा संकल्पनेच्या अंगानंही विचार करत असतो. कारण सत्य आणि संकल्पना यांच्यामधलं नातं मैत्रीचं असावं असं दिसतं. म्हणजे प्रयोगानुभव आणि संकल्पना यांच्या अंतर्विरोधी संबंधांतून जी जाणीव निर्माण होते, ती वस्तू-व्यक्ती-विश्वाच्या आकलनाला उन्नत रूप देत असते. याला Scientific Empiricism वा शास्त्रशुद्ध अनुभवात्मकता म्हणतात. बाबासाहेबांनी या संकल्पनेचा खोलवर विचार केलेला दिसतो. ते जेव्हा धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक वास्तवाला समजून घ्यायचा विचार करतात त्याचवेळी ते त्यांच्या समकालीन जीवनाच्या मुख्य धारेत उभे असतात आणि ती धारा त्यांना बदलते स्पर्शानुभव देत असते आणि त्यांचं आकलन अस्थिर ठेवत असते. अशावेळी त्यांना Scientific Empiricism ही संकल्पना उपयोगाची ठरते. हे त्यांचं ज्ञानात्मक संवेदन त्यांना

परिस्थितीच्या आकलनासाठी दिशा देत असतं. हे संवेदन त्यांचा श्वास झालं होतं. हे संवेदन कधीही संकुचित विचार करत नसतं. विशिष्टसंदर्भात बंदिस्त असलेल्या अनुभवाच्या पलीकडे जाणारं असतं. याचं अचूक भान त्यांच्या संवेदनेतून दिसतं. म्हणून त्यांना वाटत असावं, की जगण्यातली मजा आणि जगण्यातला गौरव यशाच्या सातत्यात नाही. तो अपयशातून वर येण्यात आहे. त्यांच्या संघर्षातून आकार घेणारं ज्ञान त्यांना व्हिजनरी स्वरूपाचा अनुभव देणारं असावं. त्याशिवाय विचार मौलिक होत नाही हे जरी खरं असलं तरी 'व्हिजनरी' हा शब्द आंबेडकरी विचारानं संस्कारित झालेला असतो, हे त्यांच्यासंदर्भात लक्षात ठेवलं पाहिजे. कारण हा शब्द तिबेटन भिक्षूंच्या विशुद्ध भानाशी (Pure Awareness) निगडित होण्याची शक्यता असते. बाबासाहेबांच्या व्हिजनमध्ये समाजनिष्ठ मौलिकता असणार हे ओघानंच येतं. कुटुंब असो वा समाज, तो नातेसंबंधांवर टिकत असतो आणि या संबंधांमध्ये जिव्हाळा असला तर तो अन्य समाजांशी बांधला जातो आणि विस्तारतो. यासंदर्भात बाबासाहेब कार्लाईल या नामवंत लेखकाचा उल्लेख करतात. त्याच्या मते, समाजाची खरी ताकद त्यामध्ये सुरू असणाऱ्या संपर्क बिंदूंवर अवलंबून असते. हे संबंध अर्थपूर्ण असले की तो समाज विकसनशील राहतो. त्या समाजामधल्या लहान-मोठ्या घटकांना स्वतःच्या क्षमता अजमावता येतात. त्या अजमावण्यासाठी संधी लागते, वस्तू लागतात, माणसं हवी असतात. असं परस्परांवर अवलंबून राहण्यातून समाजाचं नैतिक संवेदन पिळदार होत असतं आणि ते लवचिकही राहत असतं. समाजामध्ये चालणाऱ्या अशा प्रकारच्या प्रक्रियेला कार्लाईल जी प्रतिमा वापरतो ती अफलातून वाटते. Organic Filaments (जैव तंतू) हे लवचिक तंतू/धागे समाजाला विघटित करणाऱ्या घटकांना पुन्हा एकत्र बांधत असतात. बाबासाहेबांच्या काळात अनेक विघटनकारी घटक समाजात कार्यरत होते. म्हणून ते समाजाचा कॉन्शसनेस उन्नत करण्याच्या कार्याला अग्रक्रम देत होते. शोषणविरहीत समानतेचा विचार करणारा समाज त्यांना हवा होता. पण अशा समाजाच्या अस्तित्वाचे संकेत त्यांना मिळत नव्हते. म्हणून त्यांचं मन पर्यायी धर्माच्या दिशेनं जात होतं. १९३५ पासून हा विचार त्यांच्या मनात घोळत होता. विविध धर्म त्यांनी अभ्यासले होते. ईश्वर, आत्मा, प्रेषित, कर्मवाद, पुनर्जन्म, चिरंतन आदी घटक त्यांच्या चिंतनात येत होते. मात्र माणूस हा घटक बेदखल होता आणि तोच त्यांच्या चिंतनाचा प्राण होता. त्याचं स्वातंत्र्य, त्याची प्रतिष्ठा त्यांना महत्त्वाची वाटत होती. पण ही मूल्ये स्वतंत्रपणे विकसित होत नसतात. मानवी नात्यातील सहविचारात, सहसंघर्षात, सहव्यवहारात ती उजळून निघत असतात. म्हणजे ती कधीच समाजनिरपेक्ष नसतात. बुद्धविचारातील या गणजीवी समाजानं बाबासाहेबांना विचार करायला लावलं. व्यक्ति-समष्टीचं अद्वैत त्यांना गणजीवी समाजपद्धतीत दिसलं. बुद्धाच्या अनित्य'ता' या विचारसरणीचा ते संकल्पनेच्या पातळीवर विचार करू लागले. ईश्वर-आत्मा-प्रेषित-मुक्त माणूसच स्वतःला स्वतंत्रपणे आविष्कृत करू शकतो, समूहाच्या सर्जक शक्तीला आवाहन करू शकतो आणि यातूनच समाजजन्य कल्पकशक्ती (Sociological Imagination) निर्माण होण्याची शक्यता असते. हे सगळं बाबासाहेबांना पटत गेलं,



म्हणून त्यांनी बौद्धधर्म स्वीकारला. त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या त्रयीला बुद्धाच्या 'योग्य मार्ग' (Right Path) आणि 'करुणा' (Compassion) या दोन मूल्यांशी संवादी केलं. आपल्या लेखणीतून-वाणीतून समाजातील विसंवादाला संवादी करत गेले आणि वाचकांना सूचित केलं की "The whole universe is a system of relations,' सबंध विश्व हे नात्यांची एक व्यवस्था असते. (विचारमंथन - या स. रा. गाडगीळ यांच्या पुस्तकातील पान क्रमांक १३४ वरील 'बुद्धचरित'मधील हे वाक्य आहे.) या विचाराच्या अंगानं विश्वाकडे पाहिलं पाहिजे.

बाबासाहेबांच्या 'नवयानातील' घटकांकडे आजच्यासंदर्भात सर्वांनीच विचार केला पाहिजे. त्यांनी आपल्याला ज्या दोन त्रिसूत्री दिल्या त्या मूलगामी आहेतच. पण त्यांना बाबासाहेबांच्या काळाचा संदर्भ आहे. ५०-६० वर्षांत त्यांच्यात खूप बदल झाले, जागतिकीकरण झालं, इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी जगात क्रांती घडवून आणली. एका क्षणात आपण कोणत्याही देशाशी संपर्क साधू शकतो. एका बटनात हे सामर्थ्य एकवटलेलं आहे. तुम्ही ते ऑन केलं की हजारो मैल दूर असलेल्या नातेवाईकांशी बोलू शकता, त्याला पाहू शकता. सगळे व्यवहार करू शकता. माणसाला सशरीर कुठं जायचं काम नाही. अनंत संपर्क बिंदू तुमच्या दिमतीला आहेत. पण हे बिंदू आकाशातल्या ताऱ्यासारखे आहेत. त्यांचं कुटुंब होत नसतं. सशरीर सहवासातून, सहविचारातून, सहभागातून कुटुंब अस्तित्वात येत असतं. याला कार्लाईल Organic Filament म्हणतो.

म्हणून २१व्या शतकाच्यासंदर्भात नव्यानं विचार करण्याची वेळ आहे. ई-मीडियाला कोणी रोखू शकत नाही. हे माध्यम माणसाला खेचून नेणारं आहे. विचार करायला वेळ देणारं नाही. म्हणून एखादी नवी त्रिसूत्री असायला हवी असं वाटणं स्वाभाविक आहे. हा विचार प्रत्येकालाच करावा लागणार आहे. माध्यमाचा वेग लक्षात घेता Rethinking, Reconstructing, Reconciling - पुनर्विचार, पुनर्रचना, पुनर्जुळणी या तीन प्रक्रियांचं सातत्य टिकलं तरच आपल्या अस्तित्वाला अर्थ येईल असं वाटतं. •••

**(लेखक ज्येष्ठ समीक्षक आहेत.)**

# सोपी विवेकी पायवाट



श्यामसुंदर
महाराज सोन्नर

**यज्ञासारख्या अत्यंत कठीण आणि खर्चिक साधनेला वारकरी संप्रदायाने नामसाधनेचा सोपा पर्याय दिला. नाम साधनेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी बहुतेक संतांनी हरिपाठ लिहिला. त्यातील संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचा हरिपाठ तर वारकऱ्यांनी रोज म्हटला पाहिजे, असा अलिखित नियमच झाला. नित्यनेमाने गायल्या जाणाऱ्या या हरिपाठात ज्ञानेश्वर महाराज यांनी स्पष्ट शब्दांत यज्ञ करून कुणालाही सिद्धी प्राप्त होत नाही, उलट अहंकार होतो असे सांगून एका अर्थाने समाजाला यज्ञापासून दूर राहण्याचा सल्ला दिला.**

**या रे नाचू प्रेमानंदे ।**
**विठ्ठल नामाचिया छंदे ।**

अशी साद वारकऱ्यांनी एकमेकांना घातली आहे. मग विचारांचा जागर मांडत किचकट कर्मकांडांना अलगद बाजूला सारून विवेकाच्या वाटेवर निरंतर चालण्याची दिशा दाखविली जात आहे. संत परंपरेपूर्वी समाज किचकट कर्मकांडांमध्ये रुतला होता. त्या दलदलीत तो अधिकाधिक रुतत जाईल अशी ग्रंथरचना केली जात होती. रामदेवराय यांचा प्रधान हेमाद्रीपंत याने चातुर्वर्ग्ण चिंतामणी हा लिहिलेला ग्रंथ हा त्या कटाचाच भाग होता. या ग्रंथात हजारो कर्मकांडांचा तपशील देऊन त्याचे आचरण करण्याचा धाक निर्माण केला होता. त्याच सुमारास संत चळवळ उदयास आली आणि त्यांनी किचकट कर्मकांडांना सोप्या नामसाधनेचा पर्याय दिला.

संतांच्या प्रबोधन चळवळीपूर्वी पुण्याची लालूच आणि पापाचा धाक दाखवून समाजाचे शोषण केले जात होते. पुण्य मिळविण्यासाठी आणि पाप घालविण्यासाठी किचकट कर्मकांडे सांगितली होती. म्हणजे ज्यांच्याकडे आर्थिक बळ आहे त्यांनी यज्ञ करावा, ज्यांच्याकडे आर्थिक बळ नाही पण शारीरिक बळ आहे त्यांनी तपश्चर्या करावी. ज्याच्याकडे आर्थिक किंवा शारीरिक बळ नसेल त्यांनी तीर्थयात्रा करावी. यज्ञ हे अत्यंत खर्चिक आणि किचकट पुण्य मिळविण्याचे साधन होते. त्यात हत्तीच्या सोंडेएवढी तुपाची अखंड धार, पशूंचे बळी, दुर्मिळ वृक्षांच्या लाकडाच्या समिधा द्याव्या लागत होत्या.

यज्ञासारख्या अत्यंत कठीण आणि खर्चिक साधनेला वारकरी संप्रदायाने नामसाधनेचा सोपा पर्याय दिला. नाम साधनेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी बहुतेक संतांनी हरिपाठ लिहिला. त्यातील संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांचा हरिपाठ तर वारकऱ्यांनी रोज म्हटला पाहिजे, असा अलिखित नियमच झाला. नित्यनेमाने गायल्या जाणाऱ्या या हरिपाठात ज्ञानेश्वर महाराज यांनी स्पष्ट शब्दांत यज्ञ करून कुणालाही सिद्धी प्राप्त होत नाही, उलट अहंकार होतो असे सांगून एका अर्थाने समाजाला यज्ञापासून दूर राहण्याचा सल्ला दिला. माऊली म्हणतात–

**योग याग विधी येणे नोहे सिद्धी ।**



**वायाची उपाधी दंभ धर्म ।**

योग म्हणजे यज्ञ यासारख्या विधी समाजाच्या हिताच्या नाहीत, असे सांगून यज्ञ संस्कृतीपासून दूर राहण्याचाच जणू सल्ला दिलेला आहे. यज्ञ करायचा नाही, मग पुण्य कसे मिळणार, असा लोकांना प्रश्न पडू नये म्हणून महाराजांनी हरिपाठाची टॅगलाईनच लिहिली –

**हरी म्हणा हरी मुखे म्हणा ।**
**पुण्याची गणना कोण करी ।**

म्हणजे यज्ञासारखे किचकट कर्मकांड बाजूला सारून नुसतं देवाचं नाव घेतलं तरी इतके पुण्य मिळेल, की त्याचे मोजमापही करता येणार नाही. म्हणजे यज्ञयागासारख्या कर्मकांडांना टाळून भगवंताचे फक्त नाम घेण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला.

लोकांच्या मनात प्रश्न निर्माण होईल, की पुण्य मिळाले पण मोक्ष कसा मिळेल? याचे उत्तर तुकाराम महाराज देतात –

**मुखी नाम हाती मोक्ष ।**
**ऐसी साक्ष बहुतांची ।**

म्हणजे मोक्ष मिळण्यासाठीसुद्धा यज्ञासारख्या किचकट विधीमध्ये अडकण्याची गरज नाही. फक्त नामाचा उच्चार करा मोक्ष मिळेल, असा विश्वास दिला. पुण्य मिळविण्याचा मार्ग मिळाला, मोक्ष

मिळविण्याचा मार्ग मिळाला. पण आम्ही संसारी माणसे आहोत. आमच्याकडून काही पाप झाले असेल, तर ते जाळण्यासाठी तरी यज्ञाचा मार्ग स्वीकारावा, असा विचार लोकांच्या मनात येऊ शकतो म्हणून पुढे हरिपाठामध्येच ज्ञानेश्वर महाराज लिहितात–

**हरी उच्चारणी अनंत पाप राशी ।**
**जातील लयाशी क्षणमात्रे ।**

भगवंताचे नाम घेतले तर पापाच्या राशी लयाला जातील, असा विश्वास भक्तांना दिला. सामान्य लोकांच्या मनात कायम पापाची भीती दाखवून समाजाचे शोषण करणारी यंत्रणा सतत कार्यरत असते. ते कदाचित प्रश्न निर्माण करतील, की ज्ञानेश्वर महाराज पापाच्या राशी जळतील,असे म्हणाले आहेत. पण तुमचे पाप हे डोंगराएवढे आहे. त्यामुळे ते जर जाळायचे असेल, तर यज्ञच करावा लागेल. त्याला संत सेना महाराज यांनी उत्तर दिले आहे. महाराज लिहितात–

**घेता नाम विठोबाचे ।**
**पर्वत जळती पापाचे ।**

पण त्याही पुढे प्रश्न निर्माण केला जाऊ शकतो, की या जन्मातलं पाप जळालं पण मागच्या जन्मातील पापाच्या नाशासाठी तरी यज्ञ करावा का? तुकाराम महाराज मागच्याच नव्हे तर अनंत जन्मातील पापे जाळण्यासाठी सोपे साधन सांगतात...

**नाम संकीर्तन साधन पै सोपे ।**
**जळतील पापे जन्मांतरीचे ।**

पुण्य मिळाले. पाप जळाले. पण देव कसा भेटेल? याचे उत्तरही तुकाराम महाराज यांनी दिले आहे–

**ठाईच बैसोनी करा एक चित्त**
**आवडी अनंत आळवावा**
**न लगती सायास जावे वनांतरा**
**सुखे येतो घरा नारायण**

म्हणजे पुण्य मिळवून देण्याचे अमिष दाखवून, पाप जाळण्याची आशा लावून यज्ञयागादी कर्मकांडांत अडकवून समाजाचे शोषण केले जात होते. त्याला भगवंताच्या नामाचा सोपा पर्याय वारकरी संतांनी दिला. पण काही लोकांची अपेक्षा असते आम्हाला यज्ञाचेच पुण्य पाहिजे. तेव्हा संत सांगतात–

**राम म्हणता वाटचाली ।**
**यज्ञ पाऊला पाऊली ।।**

पंढरीची वारी ही भगवंताच्या नामाचा गजर करीत चालत असल्यामुळे आपल्या प्रत्येक पावलावर यज्ञ होत आहे, असे समाधान वारकऱ्याला मिळते.

संत परंपरेतील या विवेकाच्या जागराला अधिक चालना देण्याचे काम स्त्री संतांनी केले. संत परंपरेत मोठ्या प्रमाणात महिला सामील झाल्याचे आपल्याला पहायला मिळतात. या महिला संत ज्या परिस्थितीतून आल्या आणि उत्तुंग काम केले, त्याचा नुसता विचार केला तरी थक्क होऊन जायला होतं. आता संत जनाबाईचेच पहा ना! जनाबाईंचे कूळ कोणतं? त्यांचे आई-वडील श्रीमंत होते काय? तर नाही. जनाबाई ही आई-वडिलांशिवाय पोरकी झालेली आणि संत नामदेव महाराजांचे वडील दामाजी यांच्या घरी वाढलेली एक अनाथ मुलगी होती. शेवटपर्यंत ङ्गनामयाची दासीफ म्हणून ती दामाजी यांच्या घरीच राहिली. एका धुणीभांडी करणाऱ्या दासी महिलेला संतपदी विराजमान करण्याचे औदार्य दाखविणारं जर कोण असेल तर ती संत परंपरा आहे. दुसऱ्या आमच्या सोयराबाई. तत्कालीन समाज व्यवस्थेनुसार त्या अस्पृश्य समाजात जन्माला आलेल्या. त्यामुळे त्यांना गावकुसाबाहेर रहावे लागत होते. त्या संत चोखामेळा यांच्या पत्नी होत्या. त्यावेळच्या समाज व्यवस्थेप्रमाणे चोखामेळा यांना गावात वावरायला बंदी होती. मंदिरात जायची बंदी होती. तरीही त्या संत होऊ शकल्या. एखाद्या वेळी गावात राहून धुणीभांडी आणि दळणकांडण करणारीबद्दल मनात आपुलकी निर्माण होईल, गावकुसाबाहेर राहणारीबद्दल आपुलकी निर्माण होईल. पण महिलांचा एक घटक असा आहे, ज्याबद्दल समाजाला कधीच उघडपणे आपलेपणा वाटणार नाही. तो घटक म्हणजे वेश्या! अशा समाजातून तिरस्कणीय असलेल्या वेश्येची मुलगी कान्होपात्रा संतपदी पोहोचते, ही खरी क्रांती म्हणावी लागेल.

संत मुक्ताबाई, संत बहिणाबाई पाठक या उच्च कुळात जन्माला आल्या असल्या, तरी दोघींनाही तत्कालीन विषमतावादी समाजव्यवस्थेचा खूप त्रास सहन करावा लागला. तरीही सर्व परिस्थितीवर मात करून त्या संत चळवळीत सहभागी झाल्या. तिथे मात्र त्यांना समानतेचा अधिकार देण्याचे काम संत परंपरेने केलेले आहे. स्त्रियांना ज्यावेळी संधी मिळते तेव्हा त्या आपलं कर्तृत्व सिद्ध करून दाखवतात. संत परंपरेतील या महिला संतांना दिलेल्या समतेमुळे त्यांनी उत्तुंग कार्य केल्याचे दिसते. अर्थात, त्यांना तत्कालीन समाजातील विषमतावादी प्रवृत्तीकडून प्रचंड त्रास झाला तरी त्या विरोधाला धीराने सामोरे जात संतांचा समतावादी, विवेकवादी डोळस विचार पुढे घेऊन जाण्यासाठी धीराने पावले टाकलेली दिसतात.

त्यातील वानगीदाखल काही उदाहरणे पाहू. जनाबाईचे वारकरी संप्रदायावर फार मोठे उपकार आहेत. ज्ञानेश्वर महाराज, निवृत्तीनाथ महाराज, सोपानकाका, मुक्ताई यांनी एका वर्षामध्ये समाधी घेतलेली. संत गोरोबा कुंभार आणि संत सावता महाराज यांचे वयपरत्वे निधन झालेले. नामदेव महाराज हे संतांचा समतेचा विचार घेऊन देशभ्रमण करायला निघालेले. त्यांनी त्यांचा मोठा कालखंड पंजाबमध्ये व्यतीत केला. नामदेव महाराज पंजाबमध्ये असताना पंढरपूरच्या वाळवंटातील वारकऱ्यांना सांभाळण्याचं काम जर कोणी केलं असेल तर ते संत जनाबाईंनी केलेलं आहे. आपणा सर्वांना माहीत आहे, की एखादी स्त्री अशा प्रकारचे जर काम करू लागली तर ते पुरुषसत्ताक परंपरेला सहजासहजी सहन होत नाही. जनाबाई धीराने वारकरी परंपरा वाढविण्याचे काम, कीर्तन, भजन, अभंग रचनांच्या माध्यमातून करत होत्या. एक स्त्री वारकऱ्यांचे नेतृत्व करते आहे, हे पुरुषसत्ताक व्यवस्थेला सहन होण्यासारखे नव्हते. पण जनाबाई यांचं काम इतकं नेक होतं, की त्यावर काही आक्षेपही घेता येत नव्हता. स्त्रीच्या कर्तृत्वावर जेव्हा आक्षेप घेता येत नाही, तेव्हा तिला कमी लेखण्यासाठी तिच्या राहणीमानावर बोट ठेऊन चारित्र्याबाबत संशय निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

जनाबाईंच्या बाबतीत तेच झाले. जनाबाईला बदनाम करण्यासाठी काही लोक म्हणू लागले, काय ही जनाबाई बाजारात

जाते, डोक्यावरून पदर घेत नाही, तिला पदराचं भान नाही. अशा लोकांना जनाबाईंनी थेट सांगितलं, केवळ पदर सांभाळण्याची नाही तर वारकरी संप्रदाय सांभाळण्याची जबाबदारी माझ्यावर नामदेव महाराज यांनी सोपवली आहे. ती जबाबदारी मला अधिक महत्त्वाची वाटते. म्हणून या पुढे तर मी डोक्यावरचा पदर खांद्यांवर टाकून भरल्या बाजारातून जाईल.....

**डोईचा पदर आला खांद्यावरी ।**
**भरल्या बाजारी जाईल मी ।।**

अशी थेट भूमिका संत जनाबाईंनी घेतली. जेव्हा राहणीमानावर शंका घेऊन जनाबाईला नामोहरम करता येत नाही असे लक्षात आले, तेव्हा तिच्या व्यक्त होण्याच्या स्वातंत्र्यावर घाला घालण्याचा प्रयत्न केला गेला. तुला अभंग लिहिण्याचा, कीर्तन करण्याचा अधिकार नाही, असे सांगून तिच्या प्रबोधन चळवळीलाच थांबविण्याचे कारस्थान रचले गेले. एवढा विरोध पाहून एखादी लेचीपेची स्त्री सरळ सगळं सोडून घरात बसली असती. पण जनाबाईंची भूमिका इतकी तकलाद् नव्हती. त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या आणि त्या व्यस्थेला ठणकावून सांगितले–

**हातामध्ये टाळ खांद्यावरी वीणा ।**
**आता मज मना कोण करी ।।**

अरे! मी भजनासाठी हातामध्ये टाळ घेतलेला आहे, कीर्तनासाठी खांद्यावर वीणा घेतलेली आहे. मला मनाई करणारे तुम्ही कोण आहात? तत्कालीन स्त्रियांना कमी लेखणाऱ्या व्यवस्थेविरोधात लढा देत असतानाच इतर स्त्रियांमध्ये आत्मभान जागृत करताना जनाबाई म्हणतात–

**स्त्रीजन्म म्हणुनी न व्हावे उदास ।**
**साधु संत ऐसे केले जनी ।।**

पंढरपूरच्या वाळवंटात उभ्या राहिलेल्या संत परंपरेने महिलांना पुरुषांच्या बरोबरीचा अधिकार दिला, ही केवढी क्रांती होती? महिला संतांना वारकरी संप्रदायात बरोबरीचा अधिकार मिळाल्यानंतर या महिलांनी जे विचार मांडले ते अत्यंत धाडसी होते. महिलांच्या मासिक पाळीबद्दल आजही पवित्र-अपवित्र अशा संकल्पना मांडल्या जातात. पण सातशे वर्षापूर्वी संत सोयराबाई यांनी स्त्रियांच्या या विटाळाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाने तत्कालीन धर्ममार्तंडांना निरुत्तर केले होते. विटाळाबद्दल त्या लिहितात–

**देहासी विटाळ म्हणती सकळ ।**
**आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध ।।**
**देहिंचा विटाळ देहीच जन्मला ।**
**सोवळा तो झाला कवण धर्म ।।**
**विटाळा वाचोनी उत्पत्तीचे स्थान ।**
**कोण देह निर्माण नाही जगी ।।**

विटाळच उत्पतीचं स्थान असून तो नसेल तर देहाची उत्पत्तीच होऊ शकत नाही, हा त्यांनी उपस्थित केलेला मुद्दा सोयराबाई किती विज्ञानवादी होत्या, हे सिद्ध करतो. त्यांचे हे धाडसी विचार आजही विचार करायला लावणारे आहेत.

मुक्ताबाई, बहिणाबाई, कान्होपात्रा, निर्मळा यांनी अभंगातून मांडलेले विचार आजही तितकेच टवटवीत आहेत. मुक्ताबाईचे तर वारकरी संप्रदायावर खूप मोठे उपकार आहेत. मुक्ताबाई नसत्या तर ज्ञानेश्वरीच लिहून होऊ शकली नसती.

आळंदीतील कर्मटांनी ज्ञानेश्वर महाराज यांचा छळ केला. त्यांनी भिक्षा मागून आणलेले पीठ हिसकावून मातीत मिसळले. तेव्हा उद्विग्न होऊन ज्ञानेश्वर महाराज आपल्या झोपडीची ताटी लावून बसले. केवळ संन्याशाची मुलं म्हणून विषमतावादी क्रूर व्यवस्थेकडून होणारा छळ सहन न होऊन ज्ञानेश्वर महाराज यांनी या जगाशी कायमचा संबंध संपवून टाकण्याचा निर्धार करून झोपडीची ताटी बंद केली होती. तेव्हा मुक्ताबाई यांनी ज्ञानेश्वर महाराज यांची समजूत काढली. ही समजूत काढण्यासाठी मुक्ताबाई यांनी जे ताटीचे अभंग लिहिले, त्यात खऱ्या संतांची लक्षणे सांगितलेली आहेत. ज्ञानेश्वर महाराज यांना मुक्ताबाई सांगतात–

**विश्व रागे झाले वन्ही ।**
**संत सुखे व्हावे पाणी ।।**
**शब्द शस्त्रे झाला खेद ।**
**संती मानावा उपदेश ।।**

संपूर्ण विश्व रागाने आगीसारखे तप्त झाले असेल तर संतांनी पाण्यासारखे शीतल झाले पाहिजे. कठोर शब्दांमुळे मनाला खेद होत असतील तर संतांनी तो उपदेश समजावा, अशी समजूत घालून दया क्षमा ज्याच्या अंगात आहे, त्यालाच संत म्हणावे असे मुक्ताबाई म्हणतात. संत कुणाला म्हणावे हे सांगत असतानाच संत कुणाला म्हणू नये हे सांगताना मुक्ताबाई लिहितात–

**वरी भगवा झाला नामे ।**
**अंतरी वश केला कामे ।।**
**त्याशी म्हणू नये साधू ।**
**जगी विटंबना बाधू ।।**

केवळ नावाला भगवे कपडे घातले असतील आणि अंतःकरणात कामाने वश केलेला असेल तर त्याला साधू म्हणू नये, असेही मुक्ताबाई सांगतात.

आपण सुख सागर होऊन बोधाने जगाला निववावे, असे सांगून ज्ञानेश्वर महाराज यांना–

**ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।** अशी साद घालतात. लहानग्या मुक्ताबाईने विवेक जागा केल्याने ज्ञानेश्वर महाराजांनी झोपडीचा दरवाजा उघडला. पुढे समाजात अखंड ज्ञानगंगा प्रवाहीत राहील अशी भावार्थदीपिका अर्थात ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी आणि हरिपाठ ही साहित्यरचना केली.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या शिष्या संत बहिणाबाई शिवरकर यांनी तर–

**संत कृपा झाली ।**
**इमारत फळा आली ।।**

या अभंगाद्वारे वारकरी संप्रदायाचे डॉक्युमेंट करून ठेवलेले आहे. केवळ स्त्रिया म्हणून महिलांना जी दुय्यम वागणूक दिली जात होती, ती दूर करून संत चळवळीने त्यांना बरोबरीचे स्थान दिले. पंढरीच्या वारीत ही स्त्री-पुरुष समतेची पताका अधिकच डौलाने फडकताना दिसते. •••

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार, कवी व कीर्तनकार आहेत.)**

# भाकरी तर फिरली, अजून काय फिरणार



अनंत बागाईतकर

**शरद पवार यांनी जाहीर केलेले बदल हे मुख्यतः राष्ट्रीय स्वरुपाचे आहेत. कार्यकारी अध्यक्ष हे प्रदेश पातळीवर नेमले जात नाहीत. त्यामुळे सुप्रिया सुळे काय किंवा प्रफुल्ल पटेल काय, यांची नेमणूक मुख्यतः पक्षाच्या राष्ट्रीय राजकारणाशी निगडित राहील हे स्पष्ट आहे. अर्थात, ही घोषणा करताना पवार यांनी सुप्रिया सुळे यांच्याकडे महाराष्ट्र, हरियाणा व पंजाब या तीन राज्यांची जबाबदारी दिली आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे. महाराष्ट्राची जबाबदारी अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांच्याकडे राहीलच; परंतु पक्षाचे सर्वेसर्वा या नात्याने शरद पवारांची त्यावर देखरेख ही राहणारच आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील बहुचर्चित आणि प्रतीक्षा असलेले बदल झाले. हे बदल अपेक्षितच होते. या नव्या बदलांमध्ये खासदार सुप्रिया सुळे आणि खासदार प्रफुल्ल पटेल या दोघांना कार्यकारी अध्यक्ष करण्यात आले आहे. या बदलात अजित पवार यांच्याबद्दल कोणतीच घोषणा करण्यात आली नाही. त्यामुळे लगेचच या बदलांचे अर्थ आपापल्या परीने लावण्याचे काम सुरू झाले आहे. त्या चर्चेचा राष्ट्रवादी काँग्रेसला फायदाच होईल. कारण जेवढा काळ हे अर्थ-अन्वयार्थ लावण्याचे काम सुरू राहील तेवढा काळ हा पक्ष प्रसिद्धीच्या झोतात राहील. एक चर्चेतला पक्ष म्हणून त्याचे महत्त्व राहील. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास त्यात तथ्यही आहे. कारण वर्तमान राजकीय परिस्थितीत चलती असलेला पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसकडे पाहिले जाते. भाजपची संघटनात्मक आणि साधनसंपत्तीची ताकद अमाप आहे; परंतु महाराष्ट्रातील भाजप हा उधारउसनवारीवर चालणारा पक्ष आहे. मूळचे रा.स्व. संघ व भाजप पठडीतले नेते पिछाडीवर गेल्याचे चित्र आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना(मूळ) यांच्यातून सत्तेच्या अभिलाषेने गेलेल्या नेत्यांनी महाराष्ट्रातील भाजपवर ताबा मिळविला आहे. त्यामुळेच या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्रात तुलनेने सुसंघटित व बळकट असल्याचे दिसून येते. अलीकडच्या काळातील स्थानिक पातळीवर झालेल्या विविध निवडणुकांमध्ये या पक्षाने आपले अस्तित्व दाखवून दिले आहे. याचे श्रेय पक्षाचे सर्वोच्च नेते शरद पवार यांना जसे जाते त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या पातळीवर ते अजित पवार यांनाही जाते. गेल्या काही काळात त्यांनी केलेली पक्षबांधणी, मंत्रीपदावर राहून राज्यकारभारावर टाकलेली छाप व विशेषतः धडाडीने काम करणारे मंत्री म्हणून निर्माण केलेली प्रतिमा त्यांना लाभकारक ठरताना दिसत आहे.







**भाजपकडील राजकीय नेतृत्वाचा दुष्काळ कधी संपणार!**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी २ मे २०२३ रोजी त्यांच्या आत्मकथेच्या सुधारित व अद्ययावत करण्यात आलेल्या आत्मकथेच्या निमित्ताने अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन नवीन नेतृत्वाकडे पक्षाची जबाबदारी सोपविण्याचे सूतोवाच केले होते. हा निर्णय पक्षाला अनपेक्षित होता. त्यामुळे त्यानंतर त्यांना घाईत आणि किमान आगामी लोकसभा निवडणुकीपर्यंत असा काही निर्णय करू नये, असे पक्षाच्या वतीने एकमताने सांगण्यात आले. त्यानुसार त्यांनी राजीनामा मागे घेतला. पण पुढच्या पिढीकडे नेतृत्व सोपविण्याच्या दृष्टीने काही निर्णय करण्यासाठी प्रमुख नेत्यांची समिती किंवा गट नेमला. अजित पवारही त्यात सहभागी होते. या गटाने दोन कार्यकारी अध्यक्षांच्या नेमणुकीचा प्रस्ताव केला व पवार यांनी त्यानुसार घोषणा केली. अजित पवार हे या निर्णयप्रक्रियेत सहभागी होते हे येथे नमूद करणे आवश्यक आहे. त्यामुळे ते या निर्णयाने नाराज आहेत काय, त्यांना डावलण्यात आले आहे काय वगैरे वगैरे चर्चांना उधाण येणे अपेक्षितच आहे. भाजपने तर अजित पवारांवर अन्याय झाल्याचा गळाच काढला आहे. स्वतःकडे सक्षम नेतृत्वाचा अभाव असल्याने महाराष्ट्रातील भाजप हा सतत गळ लावून बसलेले राजकीय पक्ष झालेला आहे. कधी एखादा विरोधी पक्षातला आमदार, खासदार किंवा नेता नाराज होतो आणि कधी आपण त्याला आपल्या गळाला लावतो अशा तयारीत भाजपची मंडळी बसलेली असतात. त्यांच्याकडील हा राजकीय नेतृत्वाचा दुष्काळ आणि दिवाळखोरी कधी संपणार आहे हे त्यांनाच माहीत. त्यामुळे या बदलांनंतर पहिला

गळा काढण्याचा मान भाजपनेच मिळविला.

**ही जबाबदारी लहानसहान आणि किरकोळही नाही**

अजित पवार यांना डावलले काय किंवा त्यांना एखादे पद का दिले नाही, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. या ठिकाणी सर्वप्रथम एक गोष्ट ध्यानात घ्यावी लागेल, की अजित पवार हे महाराष्ट्र विधानसभेतील मान्यताप्राप्त विरोधी पक्षनेते आहेत. याला शॅडो चीफ मिनिस्टर असेही म्हटले जाते. मतितार्थ हा, की अजित पवार हे राज्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची एक प्रमुख जबाबदारी सांभाळत आहेत. ते पूर्णपणे पदविहीन आहेत असे नाही. त्यामुळे त्यांना या नव्या रचनेत कोणतेच स्थान दिले गेले नाही असा निष्कर्ष काढणे उचित ठरणार नाही. महाराष्ट्रातला सर्वात मोठा विरोधी पक्ष म्हणून सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. त्याचे नेतेपद अजित पवार यांच्याकडे आहे. केवळ राष्ट्रवादी काँग्रेसच नव्हे, तर विधानसभेत आणि बाहेरही ते महाराष्ट्र विकास आघाडी (मविआ)चे नेते म्हणून ओळखले जातात. त्यामुळे एक प्रकारे संपूर्ण राज्याची जबाबदारीच त्यांच्याकडे असल्यासारखी आहे. ही जबाबदारी लहानसहान नाही आणि किरकोळही नाही. ती अर्धवेळही नाही तर पूर्णकालिक आहे. त्या नात्याने संपूर्ण राज्याचे दौरे ते करीत असतात. थोडक्यात, महाराष्ट्रात एक पूर्णवेळेची जबाबदारी पार पाडत असलेल्या अजित पवार यांना आणखी एखाद्या पदाची आवश्यकता भासेल अशी स्थिती नाही.

**अजितदादांचा महाराष्ट्रातील राजकारणातच अधिक रस**

शरद पवार यांनी जाहीर केलेले बदल हे मुख्यतः राष्ट्रीय स्वरुपाचे आहेत. कार्यकारी अध्यक्ष हे प्रदेश पातळीवर नेमले जात नाहीत. त्यामुळे सुप्रिया सुळे काय किंवा प्रफुल्ल पटेल काय यांची नेमणूक मुख्यतः पक्षाच्या राष्ट्रीय राजकारणाशी निगडित राहील हे स्पष्ट आहे. अर्थात, ही घोषणा करताना पवार यांनी सुप्रिया सुळे यांच्याकडे महाराष्ट्र, हरियाणा व पंजाब या तीन राज्यांची जबाबदारी दिली आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे. महाराष्ट्राची जबाबदारी अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांच्याकडे राहीलच; परंतु पक्षाचे सर्वे सर्वा या नात्याने शरद पवारांची त्यावर देखरेख ही राहणारच आहे. महाराष्ट्र हा या पक्षाचा बालेकिल्ला किंवा मुख्य बलस्थान असल्याने या राज्याची सूत्रे पूर्णत्वाने आपल्याच ताब्यात कशी राहतील हे निश्चित करणारी ही नियुक्ती आहे. याचा दुसरा अर्थ असाही आहे, की महाराष्ट्राच्या राजकारणाची सूत्रे शरद पवार यांच्याकडेच राहणार आहेत. नायकपदाचा चेहरा अजित पवार हे असतील आणि रणमैदानात त्यांचीच भूमिका प्रमुख राहील. सुप्रिया सुळे यांची भूमिका त्यांना पूरक व सहाय्यभूत अशीच राहणार आहे. त्यामुळे अजित पवार हेच राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्रातील केंद्रबिंदू राहतील हे स्पष्ट आहे. महाराष्ट्रात आपल्याला प्रमुख भूमिका बजावायची आहे हे अजित पवार यांच्या लक्षात आलेले आहे आणि त्यामुळेच त्यांनी अलीकडच्या काळात आपली कार्यशैली बदलण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. पूर्वी अजित पवार हे नुसते आक्रमकता दाखवायचे; परंतु आता त्यांनी आक्रमकता कुठे दाखवायची आणि कुठे नाही याचे भान राखायला सुरुवात केली आहे. भाषणात किंवा कुठेही बोलताना जीभ घसरणार नाही याची पुरेपूर खबरदारी घेताना ते



आढळतात. पत्रकारांबरोबरच्या वार्तालापात ते संयम बाळगूनच उत्तरे देतात. विधानसभेत शिंदे-फडणवीस सरकारच्या विरोधात अजित पवार हे आक्रमक भूमिका घेत नसल्याची तक्रार मध्यंतरी केली गेली होती; परंतु राजकारणातील प्रदीर्घ अनुभव आणि टक्केटोणपे खाऊन अजित पवार पुरेसे स्थिरावलेले राजकारणी झालेले आहेत. त्यामुळे विनाकारण आक्रस्ताळेपणा करण्याकडे त्यांचा कल नाही. त्याचप्रमाणे विरोधासाठी विरोध करायचा नाही आणि प्रतिस्पर्ध्यांनी काही चांगले काम केल्यास त्याची दखल घेण्याची राजकीय प्रगल्भता अजित पवार यांनी त्यांच्या काकांप्रमाणे अंगी बाणविल्याचे आढळून येते. त्यामुळेच राष्ट्रवादीतर्फे मुख्यमंत्रीपदासाठीचा आगामी चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाणे स्वाभाविक किंवा नैसर्गिक आहे. खुद्द अजित पवार यांना राष्ट्रीय राजकारणात फारसा रस नसल्याचे त्यांनी अनेकवेळेस स्पष्ट केले आहे. १९९० च्या दशकाच्या सुरुवातीस शरद पवार संरक्षणमंत्री झाले; परंतु नरसिंह राव यांनी त्यांना महाराष्ट्रात मुख्यमंत्री म्हणून जाण्यास सांगितल्याने त्या काळात अजित पवार यांनी बारामतीचे लोकसभेत प्रतिनिधित्व केले. मात्र त्यांना लोकसभेपेक्षा महाराष्ट्रातील राजकारणातच अधिक रस असल्याचे त्यांनी त्याहीवेळी स्पष्ट केले होते आणि त्या भूमिकेवर ते आजही ठाम आहेत. त्यामुळेच या नव्या रचनेत त्यांच्यावर काहीतरी फार मोठा अन्याय झाल्याची जी चर्चा चवीने सुरू करण्यात आली आहे, त्यात तथ्य नाही.

**त्याबद्दल त्यांना पुरस्कारही मिळाले आहेत**

सुप्रिया सुळे यांना महाराष्ट्राप्रमाणेच पंजाब व हरियाणा या दोन राज्यांची जबाबदारी देण्यात आलेली आहे. सुप्रिया सुळे यांनी त्यांच्या सक्रिय राजकारणाचा प्रारंभ राष्ट्रीय पातळीवरूनच केला आहे हे प्रथम लक्षात घ्यावे लागेल. लोकसभेतील त्या एक लोकप्रिय सदस्य म्हणून ओळखल्या जातात. सर्व पक्षांमधील खासदारांशी त्यांचे उत्तम संबंध आहेत. लोकप्रतिनिधी म्हणूनही लोकसभेतील त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. त्यांना त्याबद्दल पुरस्कारही मिळाले आहेत. पंजाब किंवा हरियाणात राष्ट्रवादी काँग्रेसचे अस्तित्व फार मोठे नाही. त्यामुळे त्यांना या दोन राज्यांमध्ये संघटनात्मक बांधणी किंवा पक्षविस्तार याबाबत फार मोठी अशी जबाबदारी नसेल. मात्र

या दोन राज्यांपेक्षा लोकसभेतील विरोधी पक्षांच्या सभापटल समन्वय व व्यवस्थापनात त्यांना भाग घेण्याच्या दृष्टीने या पदाचा उपयोग होऊ शकेल. लोकसभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे पाच सदस्य आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षांचे संख्याबळ लक्षात घेता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पाच सदस्य हे महत्त्वाचे ठरतात. सुप्रिया सुळे यांच्याप्रमाणेच इतरही खासदारांची सभागृहातील कामगिरी चांगली आहे. त्यामुळे लोकसभेतील गटनेत्या म्हणून त्यांच्याकडे आधीच जबाबदारी असताना पक्षाचे कार्यकारी अध्यक्षपदही आता मिळाल्याने त्यांच्या सदस्यत्वाला वजन प्राप्त झाल्यासारखे होईल.

**दोघेही राष्ट्रीय राजकारणातील भिडू**

प्रफुल्ल पटेल हे राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते म्हणून ओळखले जातात. ते राज्यसभेचे सदस्य आहेत. शरद पवार अद्याप राज्यसभेचे सदस्य आहेत आणि नेतेही आहेत. त्यामुळे विरोधी पक्षांच्या बैठकांना ते स्वतः हजर राहत असतात; परंतु गेल्या काही काळापासूनच त्यांनी ही जबाबदारीही प्रफुल्ल पटेल आणि काही प्रमाणात सुप्रिया सुळे यांच्याकडे सोपविलेली होती. आता औपचारिक पद प्राप्त झाल्याने पटेल यांच्या विरोधी पक्षांच्या बैठकांमधील सहभागाला अधिक अधिमान्यता प्राप्त झाल्यासारखे होईल. त्यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे काही प्रमाणात अस्तित्व असलेली गोवा व गुजरात यांसारखी राज्ये आहेत. याखेरीज मध्य प्रदेश, झारखंड व राजस्थान या राज्यांचीही जबाबदारी त्यांना देण्यात आली आहे. अलीकडच्या काळातच निवडणूक आयोगाने काही राजकीय पक्षांना असलेला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा काढून घेतला. हा दर्जा संबंधित पक्षाचे विविध राज्यांत असलेले अस्तित्व आणि निवडणुकांमध्ये मिळालेल्या मतांची विशिष्ट टक्केवारी, विधानसभांमध्ये जिंकलेल्या जागा यांवर आधारित असतो. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा पुन्हा मिळवायचा असेल, तर ज्या राज्यांमध्ये त्यांचे अस्तित्व काही प्रमाणात आहे तेथे मजबूत करून अन्य राज्यांतही पक्षविस्तार करावा लागेल. त्यादृष्टीने प्रफुल्ल पटेल यांच्याकडील राज्ये महत्त्वाची आहेत. तेथे या पक्षाच्या वाढ व विस्ताराला वाव आहे. पटेल हे राष्ट्रवादी काँग्रेसचे मोठे नेते आहेत. सुरुवातीपासून ते शरद पवार यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. दिल्लीत शरद पवार यांच्याबरोबर ते सर्वत्र असतात. त्याचप्रमाणे विरोधी पक्षांच्या राष्ट्रीय पातळीवरील आघाडीच्या दृष्टीनेही त्यांची पवार यांना मदत होत असते. पटेल यांची बड्या राजकीय नेत्यांमध्ये तसेच बड्या उद्योगपतींमध्येदेखील ऊठबस असते. ते गुजराती आहेत व स्वतः उद्योगपती आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपचे बहुतेक नेते त्यांना ओळखतात. तसेच काँग्रेसच्या नेतृत्वाबरोबरही त्यांचे चांगले संबंध आहेत. त्यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या दिल्लीतील किंवा राष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीनेच शरद पवार यांनी केलेल्या या नेमणुकांकडे पहावे लागेल. सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल हे दोघेही राष्ट्रीय राजकारणातील भिडू आहेत आणि पवार यांना त्यांच्या बरोबरीने त्यांना राष्ट्रीय राजकारणासाठी तयार करायचे आहे. त्यासाठीच सुप्रिया सुळे यांच्याकडे कार्यकारी अध्यक्षपद देऊन त्यांना एक अधिकृत व औपचारिक असा राजकीय दर्जा त्यांनी दिलेला आहे.

या बाबी लक्षात घेता अजित पवार यांचे पक्षातील महत्त्व कमी झालेले नाही, हे लक्षात येऊ शकते. अजित पवार यांच्यासाठी महाराष्ट्राचा राजकीय आखाडा मोकळा ठेवण्यात आलेला आहे. ते सक्षम राजकीय नेते असल्याने आणि मुख्यमंत्री होण्याची आकांक्षा असल्याने त्यांनी त्या दिशेने तयारी सुरू केलेलीच आहे. त्यांचे महाराष्ट्रव्यापी दौरे, संघटनात्मक बांधणीवर दिला जाणारा भर याद्वारे ते त्यांचे नेतृत्व निर्णायक प्रकारे प्रस्थापित करू इच्छित आहेत, हे निर्विवाद आहे.

**भाजपमध्येही राजकीय अस्वस्थता**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अनेक अनुभवी नेते आहेत, त्यांची राजकीय ज्येष्ठता मोठी आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमधील आगामी व संभाव्य फेरबदलात सध्या महाराष्ट्राच्या पातळीवर काम करीत असलेल्या नेत्यांना लोकसभेत पाठविण्याच्या दृष्टीने म्हणजेच लोकसभा निवडणुकीसाठी तयार करण्याचे प्रयत्न शरद पवार यांच्यातर्फे केले जातील असे समजते. यामध्ये छगन भुजबळ, रामराजे निंबाळकर यांच्यासारख्यांचा समावेश असू शकतो. अर्थात, पश्चिम महाराष्ट्राच्या बालेकिल्ल्यात राष्ट्रवादी काँग्रेसला किती जागा लढविण्यासाठी मिळतात यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतील. जिंकलेल्या जागांचा निकष असेल तर रायगड, बारामती, शिरूर, सातारा या जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला हमखासपणे येतील. कोल्हापूरमधून हसन मुश्रीफ यांना लोकसभेसाठी लढविले जाऊ शकते. सोलापूर, माढा, इचलकरंजी, अहमदनगर, जळगाव, जालना, बीड, उस्मानाबाद, परभणी मतदारसंघ हे शरद पवार यांच्या जिव्हाळ्याचे राहिले आहेत. महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती वळण घेताना दिसत आहे. भाजपला शिंदे-फडणवीस यांच्या चेहऱ्यांच्या आधारे निवडणुकीला सामोरे जाणे अवघड वाटू लागले आहे. स्थानिक पातळ्यांवरील निवडणुकांत भाजपला अपेक्षित यश मिळालेले नाही. त्यातही महाविकास आघाडीतील काँग्रेस व शिवसेना (उद्धव ठाकरे) यांच्या तुलनेत राष्ट्रवादी काँग्रेसकडे संघटनात्मक बळ, ताकद अधिक आहे आणि पक्षही तुलनेने संघटित असल्याचे चित्र आहे. कर्नाटकातील पराभवानंतर भाजपमध्येदेखील चलबिचल आहे आणि निवडणुका सोप्या नाहीत आणि नेहमीचे भावनिक मुद्दे उपस्थित करून मते मिळत नसल्याचे कर्नाटकात सिद्ध झाल्याने भाजपमध्येही राजकीय अस्वस्थता आहे. ही परिस्थिती विरोधी पक्षांना अनुकूल आहे. महाराष्ट्रातील राजकीय गद्दारी मतदारांना फारशी पसंत पडलेली नसल्याचे अलीकडच्या निवडणुकांच्या निकालांवरून स्पष्ट झालेले असल्याने या परिस्थितीचा फायदा राष्ट्रवादी काँग्रेस घेणार हे स्पष्ट आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत शरद पवार पक्षसंघटनेच्या दृष्टीने कोणते निर्णय करतात यावर बरेच काही अवलंबून राहील. पवारांची भाकरी फिरविण्याची गोष्ट अलीकडे फारच प्रचलित झालेली आहे आणि वृत्तपत्रेही त्याच भाषेत बोलू लागली आहेत. राष्ट्रीय पातळीवर त्यांनी भाकरी फिरवली आहे असे म्हणता येणार नाही; परंतु फेरबदलांची सुरुवात तीही पवारांच्या सावधचित्त शैलीतली आहे. महाराष्ट्रात काय बदल होतात, ते पाहण्याची उत्सुकता व प्रतीक्षा सर्वांनाच आहे. •••

**(लेखक राजकीय अभ्यासक आहेत.)**

# असंविधानिकतेने 'संविधानिक' सरकार! आणि लोकनियुक्त सरकार



संजय पवार

**मल्लिकार्जून खरगे पक्षाध्यक्ष झाल्यावर हिमाचलनंतरची काँग्रेसची ही दुसरी घरवापसी. त्यात कर्नाटक ही खरगेंची जन्म व कर्मभूमी. त्यांनी उमेदवार निवड, प्रचार, प्रसार याचे कसोशीने नियंत्रण केले. त्यांच्या 'विषा'वरील विधानाचा विषप्रयोग भाजपने करून पाहिला. पण खरगेंनी जालिम उतारा देत विजयपश्चात सरकार स्थापनेतील तिढा गांधी कुटुंबाला आवश्यक तितकाच सहभाग घेऊ देत स्वत:च त्यातून मार्ग काढला. खरगेंचे हे गृहराज्यातील पक्षांतर्गत यश त्यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदात आणखी एका यशाचा तुरा खोवून गेले.**

संपूर्ण देशातील राजकीय पक्ष, नेते, कार्यकर्ते, विश्लेषक, माध्यमे आणि सर्वात शेवटी या सर्वांच्या उपस्थितीने निर्माण होणाऱ्या कल्लोळात आपसूक खेचला जाणारा सर्ववर्गीय, जातीय, धर्मीय मतदारनामक 'राजा'.

या सर्वांना या महिन्यात दोन गोष्टींची पराकोटीची उत्सुकता होती. पैकी पहिली महाराष्ट्रात ९ महिन्यांपूर्वी घडलेल्या वा घडवलेल्या सत्तांतराबाबत सर्वोच्च न्यायालयात दाखल खटल्याचा निकाल काय लागतो आणि दुसरी कर्नाटक विधानसभेसाठी मतदार कुणाला कौल देतात? दक्षिण भारतात भाजपहाती असलेलं हे एकमेव राज्य भाजपं राखतं, का विरोधक ते खेचून घेतात यावर ओपिनियन/एक्झिट पोल ते सट्टाबाजार सर्वत्र उत्सुकता होती.

कर्नाटकात १० मेला मतदान होतं. ११ मेला महाराष्ट्र सत्तांतरावरचा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला, तर १३ मेला कर्नाटक विधानसभा निवडणुकांचा निकाल लागला. चार दिवसांत देशभरातली उत्सुकता संपली आणि सुरू झाले चर्वितचर्वण. आव्हाने, आवाहने, विश्लेषणे, अनुमान, सूतावरून स्वर्गाप्रमाणे या दोन घटनांचे पार २०२४ पर्यंत काय परिणाम होतील, यावर माध्यमांच्या गिरण्या दळण कांडण्यात लागल्या.

महाराष्ट्राचा निकाल हा खून झालाय हे दिसतंय; पण खुन्यांना शिक्षा आम्ही देऊ शकत नाही. ती जबाबदारी ज्यांची आहे त्यांच्याकडे देऊ. यात ज्यांनी खून केला तेच शिक्षाही सुनावणार आहेत! या निकालाचा अर्थ लावायला आणखी वीस खटले चालवावे लागतील. थोडक्यात, असंविधानिक सरकार संविधानिक अधिकारांच्या टेकूवरच टिकले. आता ते जाणार, पडणार वगैरे नाही. ते कार्यकाळ पुरा करेल वा सहा महिने आधीच मतदारांचा कौल घेईल लोकसभेसोबत.

कर्नाटकात येणार येणार अशी जी अंदाजपंचेगिरी चालली होती, ती अपेक्षेपेक्षा जास्त खरी ठरवत काँग्रेस पूर्ण बहुमतात आणखी भर घालत सत्तेत आली. भाजपचे नाकासहित अनेक अवयव कापले



गेले, असा दारूण पराभव झाला. गेल्या नऊ वर्षांतला हा सर्वात मोठा दणका व दक्षिणेतून पूर्ण हद्दपारी वाट्याला आली.

दरम्यान, महाराष्ट्रात जातीय तेढ वाढविण्याचे काम जोरात सुरू केलेले आहे. मोदी पराभव विसरून ऑस्ट्रेलियातील भारतीयांकडून मोदी-मोदीचा गजर ऐकत त्यांचे चीरपरिचित भाषण करून वाहव्वा मिळवताहेत. दरम्यान, २०१६ साली जन्माला घातलेल्या दोन हजाराच्या नोटेचे प्रायोप्रवेशाने देहदान करण्याचा निर्णय घेतलाय रिझर्व्ह बँकेने. ३० सप्टेंबरपर्यंत लोकांनी

नोटा परत कराव्यात. त्यानंतर मृत्यूपश्चात आत्मा उरतो तशा त्या नोटा चलनात असतील!

तर आता पुन्हा प्रमुख दोन घटनांवर येऊ या. महाराष्ट्रातले सत्तांतर हे सर्वोच्च न्यायालयाने चुकीचे ठरवले. राज्यपालांची प्रत्येकच कृती चुकीचीच होती. विधिमंडळातील आमदार म्हणजे पक्ष नव्हे आणि प्रतोद पक्षच निवडू शकतो, त्यामुळे शिंदे गटाने निवडलेले प्रतोद बेकायदा! पण पक्ष कोणता हे आम्ही सांगत असलो तरी त्यावर शिक्कामोर्तब निवडणूक आयोग करेल!

आमदार अपात्रतेचा पक्षांतरबंदी कायद्याखालचा निर्णय सात न्यायमूर्तींच्या खंडाकडे सोपविला गेला, तर पहिल्या १६ जणांनी केलेल्या बंडाबाबत विधानसभा अध्यक्षांनी निर्णय लवकरात लवकर घ्यावा. पण आपल्याच निकालात राज्यपालांच्या ज्या कृती बेकायदेशीर म्हटल्यात त्यातीलच एक कृती विधानसभा अध्यक्ष निवड, प्रतोद निवड ही आहे. तरीही राज्यपाल, प्रतोद, विधानसभा अध्यक्ष, निवडणूक आयोग हे सर्व संविधानिक स्वायत्तता असणारे घटक असल्याने त्यांच्या अधिकारावर संविधानिक नियमाने न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही. थोडक्यात, आम्ही ताशेरे मारू शकतो पण शिक्षा करू शकत नाही, असा शब्दांचा संविधानिक, असंविधानिक असा गुंता करत सर्वोच्च न्यायालयाने एक न दिलेला निकाल दिला!

भाजपने आपल्या कुप्रसिद्ध छद्मी हास्यमुखावर विलसत न्यायालयाने आमचे सरकार संविधानिक असल्याचा निर्वाळा दिलाय असे धडधडीत अर्धसत्य शिंदेंना सोबत घेऊन पत्रकार परिषदेत जाहीर केले. ताशेरे दुर्लक्षून ताशे बडवून घेतले. आता स्वत:च पक्ष बदलत राजकीय कारकीर्द सर्वपक्षीय करून सध्या भाजपात विलसित झालेले गृहस्थच विधानसभा अध्यक्ष आहेत. ते रामशास्त्रीबाण्याने कर्तव्य पार पाडतील अशी भाबडी आशा आता सर्वसामान्य जनतेलाही नाही. हा खरं तर नैतिक पराभवच. पण आपद्धर्म नि शाश्वतधर्म अशी सोयीने धोतरं बदलणारा भाजप आता नैतिक, अनैतिकतेच्या गप्पासुद्धा मारायच्या पलिकडे पोहचलाय.

पण मतदारांना सर्वोच्च न्यायालयाने अलिखित निर्णय दिलाय व आमचे हात कायद्याने बांधलेत; पण मताधिकाराचे बळ तुमच्याच हाती आहे व सोयीच्या, असंविधानिक, अनैतिक राजकारणाचा अंत तुम्हीच मतपेटीतून करू शकता, असा संदेशही दिलाय. बघू या मतदार काय निकाल देतात!

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर सस्मित भाजपला कर्नाटकच्या निकालांनी घाम फोडलाय. मतदार काय करू शकतात किंवा मतदार असंही करू शकतात हे दिसल्याने भाजपच्या धोतरांची पितांबरे झालीत. परिणामी आता महाराष्ट्रात हिंदू-मुस्लिम तणाव जितका वाढवता येईल तेवढा वाढवत ठेवायचा अजेंडा स्वच्छ दिसतोय. कर्नाटकात हा धर्मांध प्रयोग सपशेल फसूनही भाजप या विस्तवाला बाजूला करायला तयार नाही. काही महिन्यांत मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगढच्या निवडणुका आहेत. कर्नाटकने भाजपचे पेकाट मोडून काँग्रेसला बळ दिलंय. मात्र भाजप एका पराभवाने नामोहरम होणारा पक्ष नाही. लोकसभेचं लक्ष्य ठेवताना कर्नाटकासह प.बंगाल, बिहार, हिमाचल प्रदेश, पंजाब, दिल्ली येथे वापरलेले धर्मांधतेचं कार्ड ते पुन्हापुन्हा वापरणार. हे विष ते आता काय व किती विखारी पद्धतीने पसरवतात हेच पाहण्यासारखे राहील. पक्षीय स्वार्थापुढे लाखो निरपराध लोकांचे रक्त सांडायला हा पक्ष मागेपुढे पहाणार नाही. गुजरात प्रयोगशाळेचा उन्मादी अभिमान बाळगतच त्यांची रणनिती मुजोरीने देशभर राबविली जातेय. कर्नाटकच्या जनतेने घालून दिलेला धडा गिरविण्याची वेळ आता उर्वरित भारतावर आलीय. भाजपविरोधी पक्षीयांनी समंजस एकजूट दाखविली तर आणि तरच या देशातील लोकशाही व संविधानिक ढाचा शाबूत राहील.

कर्नाटकची सत्ता हाती ठेवण्यासाठी सत्तेत असल्यापासून ते मतदानाच्या दिवसापर्यंत भाजप व परिवाराने जो काय उच्छाद मांडला होता, त्यास प्रचार, प्रसार, स्पर्धा न म्हणता सत्तालालसा या एकाच शब्दात त्याचे वर्णन करता येईल.

सत्तेत असताना हिजाब, हलालवरून वातावरण पेटवण्यात आले. आजवरच्या देशाच्या इतिहासात संविधानिक पद्धतीने सत्तेवर आलेलं सरकार प्रसंगी पक्षनिती, धोरण बाजूला ठेऊन समन्वयाचा, कायदा-सुव्यवस्था राखण्याचा प्रयत्न करताना दिसत असतं; परंतु भाजपचे केंद्र व राज्यस्तरावरील सरकारं अशा ध्रुवीकरणाला अधिकृतपणे खतपाणी घालताना दिसतात. मंत्रीच काय, मुख्यमंत्रीही अशा असंविधानिक कृतीत सामील होतात. तत्कालीन मुख्यमंत्री बोम्मई यांनी काहीही कारण नसताना महाराष्ट्रातील दोन-अडीचशे गावांवर हक्क सांगितला. गावातील काहींना चिथावणी दिली. याला प्रतिकार होताच मराठी नेत्यांना कर्नाटकात प्रवेशबंदी केली! खुद्द मुख्यमंत्री असा बालिशपणा करत असताना खास मऱ्हाठी आक्रमकपणा न दाखवता महाराष्ट्राच्या युती सरकारचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री दिल्ली दरबारी शहा साहेबांकडे धावले. मग हेडमास्तरांच्या केबिनमध्ये पालकासमक्ष विद्यार्थ्यांना दम द्यावा तसा शाळकरी समझोता झाला व डबल इंजिनवाल्या दोन राज्यांतील सरकारे नुस्त्या धुरांच्या रेषा काढत परतली आपापल्या राज्यात.

निवडणुका जाहीर झाल्यावर तर शिरस्त्याप्रमाणे शिंग मोडून वासरात खेळण्यासाठी पंतप्रधान केंद्रीय मंत्रिमंडळ परिवारातील सर्व आघाड्यांसह ठाण मांडून होते. सभा, मिरवणुका, पुष्पवष्टी याचे अप्रुप शीर्षस्थ नेतृत्वाला आता आठ वर्षांनीही तेवढंच आहे!

याच दरम्यान पाहणी अहवाल प्रसिद्ध होऊ लागले आणि भाजप चवताळल्यासारखी झाली. बजरंग दलाने आगळिकी वाढवल्या, तर त्यांच्याप्रमाणेच वर्तन असलेल्या पीआयएफवरही प्रसंगी बंदी घालू या काँग्रेसी निर्धारास निर्णय समजून व तोही बजरंग दल या संघटनेवर नाही, तर खुद्द हनुमान तथा बजरंगबलीवरच बंदी घातली होSSS म्हणत भाजपसह परिवाराचे माकडचाळे सुरू झाले. यात देशाच्या पंतप्रधानांचाही संयम सुटला व त्यांनी ईव्हीएम बटण दाबताच जय बजरंगबली अशी घोषणा द्या, असे आवाहनच मतदारांना केले! याशिवाय प्रचाराची मुदत संपल्यावरही त्यांनी एक संदेश प्रसारित केला आणि निवडणूक आयोगाचं

(उर्वरित पान ३३ वर...)

# महिला कुस्तीपटूंची पिळवणूक थांबवा



प्रा. आनंद मेणसे

**कर्नाटकात विधानसभेच्या निवडणुकांसाठी अमित शाह आणि नरेंद्र मोदी कर्नाटकात ठाण मांडून बसले होते. इतर कोणत्याही प्रश्नाकडे लक्ष देण्याची त्यांची तयारी नव्हती. त्याच काळात मणिपूरमध्ये दंगल भडकली होती, जी तात्काळ शमविणे आवश्यक होते. पण तिकडेही या दोघांचे दुर्लक्षच झाले. मणिपूर अद्याप शांत झालेले नाही आणि महिला कुस्तीपटूंचे आंदोलनही संपलेले नाही.**

आमच्यावर अन्याय झाला आहे. तो दूर व्हावा, आम्हाला न्याय मिळावा, ज्याने आमच्यावर अन्याय केला आहे त्याला कायद्यातील तरतुदीनुसार शासन व्हावे, या मागणीसाठी देशातील महिला कुस्तीपटूंनी दिल्लीत आंदोलन केले. हे आंदोलन अजून सुरूच आहे. न्याय मिळेपर्यंत आम्ही आमचे आंदोलन सुरूच ठेऊ, असे या महिला कुस्तीपटूंचे म्हणणे आहे. राजधानी दिल्लीने आजवर अनेक आंदोलने पाहिली. पण देशातील महिला कुस्तीपटू आंदोलन करताना पहिल्यांदाच पाहिल्या. या आंदोलकांमध्ये आहेत साक्षी मलिक, विनेश फोगाट, बबिता फोगाट, सारिका मोर, सोनम माळ आणि यांना पाठिंबा देणाऱ्यांमध्ये आहेत रवी दहिया आणि बजरंग पुनिया. हे कुस्तीपटू जागतिक दर्जाचे असून त्यांनी ऑलिम्पिक, राष्ट्रकूल, आशियाई आणि जागतिक कुस्ती स्पर्धेत अनेक पदके मिळविलेली आहेत. पुढील वर्षी सन २०२४ साली पॅरिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत भाग घेऊन पदके जिंकण्याची तयारी हे खेळाडू करीत होते आणि जानेवारी २०२३ मध्ये त्यांना आंदोलन करणे भाग पडले.




**...पण यातले काहीच घडले नाही**

भारतीय कुस्ती संघाचे अध्यक्ष खा. बृजभूषण शरण सिंग हे महिला कुस्तीपटूंचे लैंगिक शोषण करतात. आपणही या लैंगिक शोषणाच्या बळी आहोत. लहान मुलीही यांच्या अत्याचाराला बळी पडल्या आहेत. त्यांना त्या पदावरून हटविण्यात यावे. जबाबदार व्यक्तीची नेमणूक करण्यात यावी. तसेच बृजभूषण शरण सिंग यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी या आंदोलक महिला कुस्तीपटूंनी केली आहे. जानेवारी २३ मध्ये यांनी प्रथम आंदोलन छेडले. त्यांची अपेक्षा अशी होती, की 'बेटी बचाव बेटी पढाओ' अशी घोषणा करणारे सरकार आपणाला न्याय देईल. पण तसे घडलेले नाही. क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी जगप्रसिद्ध मुष्टीयोद्ध्या मेरी कोम यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमल्याची घोषणा केली. त्यावेळी आंदोलकांनी अशी मागणी केली की, या समितीमध्ये आंदोलकांचा एक प्रतिनिधी असावा. पण यातले काहीच घडले नाही. या समितीने आपला अहवाल दिला. पण तो जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे आंदोलकांना पुन्हा आंदोलन सुरू करण्यावाचून दुसरा पर्याय उरला नाही.

**'पोक्सो' कायद्यांतर्गत तक्रार दाखल**

दि. १६ एप्रिलपासून त्यांनी दिल्लीतील जंतरमंतर येथे धरणे सत्याग्रहास सुरुवात केली. त्यांना पाठिंबा देण्यासाठी कुस्ती क्षेत्रातील त्यांचे मित्र सहकारी तेथे दाखल झाले. हे आंदोलक सकाळ-संध्याकाळ नियमितपणे व्यायाम करीत आणि यामध्ये त्यांनी कोणतीही कसूर ठेवली नाही. आपणाला पुढे ऑलिम्पिक स्पर्धा जिंकायच्या आहेत, याचा त्यांना अजिबात विसर पडलेला दिसला नाही. सच्चा खेळाडू कसा असावा याचा एक आदर्श त्यांनी समाजापुढे ठेवला आहे. त्यांनी जेव्हा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांना यश आले नाही. पोलीस सरकारच्या दबावाखाली असल्याचे त्यांना जाणवले. आता पुढे जाणे भाग होते. म्हणून त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने पोलिसांना तक्रार नोंदवून घ्या, असा आदेश दिला. त्यानंतर पोलिसांनी या महिला कुस्तीपटूंच्या तक्रारी नोंदवून घेतल्या आहेत. यातील एक तक्रार ही 'पोक्सो' कायद्यांतर्गत दाखल करून घेण्यात आली आहे. ही तक्रार दाखल होताच संशयित आरोपीस तात्काळ अटक करण्याचा अधिकार पोलिसांना आहे. पण पोलिसांनी खासदार बृजभूषण शरण सिंग यांना अटक केली नाही. अटक करण्याची त्यांची तयारी दिसली नाही. त्यामुळे आंदोलन पुढे सुरू ठेवणे त्यांना क्रमप्राप्त होते. त्यामुळे

त्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने आपले आंदोलन सुरू ठेवले. जागतिक दर्जाचे क्रीडापटू आंदोलन करीत आहेत म्हटल्यावर त्यांना पाठिंबा देण्यासाठी विविध क्रीडा संघटना, महिला संघटना जंतरमंतरवर येऊ लागले. अगदी सुरूवातीपासून आंदोलकांनी अशी भूमिका घेतली, की आमच्या या आंदोलनाचे राजकारण होऊ नये. त्यानुसार पाठिंबा देणाऱ्यांनीही पाठिंबा देताना काळजी घेतली. आंदोलन सुरू राहिले. एप्रिल महिना संपला, मे महिना सुरू झाला. दिल्लीतील हवामान तापू लागले आणि महिला आंदोलक कुस्तीपटूंचे आंदोलनही गतिमान होऊ लागले.

**आधी आंदोलन मागे घ्या नंतर चर्चा करू**

आंदोलकांची साधी अपेक्षा होती, की क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी पुढाकार घेऊन हे प्रकरण मिटवावे म्हणजे आम्हाला आमच्या व्यायामशाळेत जाऊन सरावाला सुरुवात करता येईल. पण तसे काही घडण्याची लक्षणे दिसेनात. भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनच्या अध्यक्षा पी.टी. उषा यांच्या नेतृत्त्वाखाली पुन्हा समिती स्थापन करण्याचा निर्णय झाला. पण पी.टी. उषा यांची भूमिका आंदोलकांना मान्य झाली नाही. पी.टी. उषा असे म्हणाल्या, की आधी आंदोलन मागे घ्या नंतर चर्चा करू. आंदोलकांनी त्यांची ही मागणी थेट नाकारली आणि आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. याच काळात कर्नाटकात विधानसभेसाठी निवडणुका होणार होत्या. अमित शाह आणि नरेंद्र मोदी कर्नाटकात ठाण मांडून बसले होते. इतर कोणत्याही प्रश्नाकडे लक्ष देण्याची त्यांची तयारी नव्हती. त्याच काळात मणिपूरमध्ये दंगल भडकली होती, जी तात्काळ शमविणे आवश्यक होते. पण तिकडेही या दोघांचे दुर्लक्षच झाले. मणिपूर अद्याप शांत झालेले नाही आणि महिला कुस्तीपटूंचे आंदोलनही संपलेले नाही.

**...अशा अविर्भावात ते वावरत होते**

एकीकडे महिला कुस्तीपटू आंदोलन करीत असतानाच तिकडे बृजभूषण शरण सिंग मात्र आपल्या मतदारसंघात आणि लखनऊ परिसरात आपण कसे निष्पाप आहोत आणि आपण कुस्तीची कशी सेवा केली आह, हे सांगत फिरत होते. आपणाला कोणीही हात लावू शकणार नाही, अशा अविर्भावात ते वावरत होते. यावरून ते अमित शहा, नरेंद्र मोदी त्याचबरोबर योगी आदित्यनाथ यांच्या कसे जवळचे आहेत हे स्पष्ट होते. एकदा तर त्यांनी अशी घोषणा केली, की अयोध्येतील महंतांचा त्यांना पाठिंबा असून ते अयोध्येत मेळावा घेऊन आपणाला पाठिंबा देणार आहेत. लोकशाही मार्गाने चाललेले आंदोलन मोडून काढण्यासाठी महंत आणि साधूंचा उपयोग करून घेता येतो, हे त्यांनी दाखवून दिले आहे. म्हणजे पुढे एखादे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी महंत आणि साधूंचा उपयोग करून घेतला गेला तर ते आश्चर्य वाटायला नको.

**हे अत्यंत आक्षेपार्ह होते!**

दि. १० मे रोजी कर्नाटकात निवडणूक झाली. १३ मे रोजी निकाल जाहीर झाला. या निवडणुकीत भाजपचा दारूण पराभव झाला. आता तरी मोदी आणि शहा आपल्या आंदोलनाकडे लक्ष देतील असे आंदोलकांना वाटले होते. पण तसे काहीच झाले नाही. ही मंडळी सेंट्रल व्हिस्टा या संसदेच्या नव्या इमारतीच्या उद्घाटन सोहळ्यात गुंतली. दि. २८ मे हा दिवस त्यांनी या कार्यासाठी निश्चित केला. २८ मे ही वि. दा. सावरकरांची पुण्यतिथी. हा दिवस त्यांनी अतिशय योजनाबद्ध पद्धतीने निवडला, हे वेगळे सांगायला नको. सेंट्रल व्हिस्टाच्या उद्घाटनाच्या दिवशी आपण आपला आवाज बुलंद करायचा असा निश्चय करून आंदोलकांनी सेंट्रल व्हिस्टावर मोर्चाने जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन सादर करायचा निर्णय घेतला. हातामध्ये राष्ट्रध्वज घेऊन या महिला आपल्या समर्थक खेळाडूंसमवेत निघाल्या असता त्यांना वाटेतच रोखण्यात आले. तेथे त्यांच्याबरोबर पोलीस ज्या पद्धतीने वागले ते संपूर्ण जगाने पाहिले आहे. कायदा असे सांगतो, की महिला आंदोलकांना जर अटक करायचे असेल तर त्यासाठी महिला पोलिसांना बोलावून घ्यावे लागते. पुरूष पोलीस महिलांना अटक करू शकत नाहीत. त्यांना हातही लावू शकत नाहीत. पण येथे मात्र पुरूष पोलीस आंदोलक महिलांना हातापायाला धरून फरफटत नेताना दिसले. त्यांनी चक्क या महिलांना पोलिसांच्या गाडीत कोंबले. हे अत्यंत आक्षेपार्ह होते. जागतिक दर्जाच्या खेळाडूंच्या हातापायाला किंवा कोणत्याही अवयवाला जर इजा झाली तर त्यांची पुढील कारकीर्द धोक्यात येऊ शकते. त्यांचे खेळणे थांबू शकते. त्यामुळे खेळाडू स्वतःला खूप जपतात. युरोप, अमेरिकेत तर त्यांना इतके जपले जाते, की त्यांचा प्रचंड रकमेचा विमा उतरविलेला असतो. आपणाकडे मात्र असे काहीच दिसत नाही. पोलिसांनी आंदोलक महिला कुस्तीपटूबरोबर जो व्यवहार केला तो अत्यंत आक्षेपार्ह आणि बेजबाबदार होता, हे ध्यानात घ्यावयास हवे. पुढील काळात असे घडू नये याची काळजीही घेतली जावी.

**धरणे सत्याग्रह करून पैलवान तसेच महिला कार्यकर्त्यांचा आंदोलकांना पाठिंबा**

अपेक्षा अशी होती, की देशभरातील नावाजलेले खेळाडू या प्रकारानंतर तरी या आंदोलकांच्या पाठीशी उभे राहतील. पण फार कमी संख्येने खेळाडू त्यांच्या पाठीशी उभे राहिले. यामध्ये खास उल्लेख करता येईल तो क्रिकेटपटू कपिल देव यांचा. त्यांनी पुढाकार घेऊन सन १९८३ साली विश्वचषक जिंकणाऱ्या क्रिकेट संघाच्या वतीने पाठिंबा जाहीर केला. अभिनव बिंद्रा, नीरज चोप्रा, अनिल कुंबळे या काही मोजक्या खेळाडूंनी आपला पाठिंबा जाहीर केला. अपेक्षा अशी होती, की भारतरत्न सचिन तेंडूलकर आंदोलकांना पाठिंबा देतील. पण तसे झाले नाही. मात्र, गावोगावी कार्यकर्त्यांनी, लेखकांनी, पत्रकारांनी, क्रीडा संघटनांनी आपल्या परीने सभा घेऊन आंदोलकांना पाठिंबा दिला. कुस्तीची पंढरी समजल्या जाणाऱ्या कोल्हापूर शहरात हिंद केसरी दीनानाथ सिंह आणि महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर यांच्या नेतृत्त्वाखाली पैलवान तसेच महिला कार्यकर्त्यांनी धरणे सत्याग्रह करून आंदोलकांना पाठिंबा दिला.

**हा खेळाडूंच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार**

दि. २८ रोजी या कुस्तीपटूंना अटक करण्यात आली. त्यांच्यावर खटलेही दाखल करण्यात आले. त्याचवेळी पोलिसांनी आणखी एक कृती केली. जी निषेधार्थ आहे. ती म्हणजे पोलिसांनी जंतरमंतरवरील खेळाडूंनी उभा केलेला तंबू उखडून काढला व फेकून दिला. त्यांचे सर्व साहित्य जप्त केले. तुम्ही पुन्हा इकडे फिरकायचे नाही, असा सज्जड दम त्यांना भरला. यावरून पोलिसांनी कशी दहशत निर्माण

करत आंदोलन चिरडले, याची कल्पना येऊ शकते. एका बाजूने हा प्रकार सुरू असताना दुसऱ्या बाजूने या आंदोलनाची बदनामी करण्याची मोहीम सरकारच्या समर्थकांनी चालविली. आंदोलक महिलाच कशा भ्रष्ट आहेत हे सांगण्यास ही मंडळी अजिबात कचरली नाही. जो अनुभव देशाला शेतकरी आंदोलनाच्या काळात आला तसाच अनुभव यावेळीही आला. नोंद घेण्यासारखी आणि खेद व्यक्त करण्यासारखी गोष्ट म्हणजे, दि. २८ मे रोजी ज्यावेळी पोलीस आंदोलकांना अटक करत होते त्यावेळी सेंट्रल व्हिस्टामध्ये चाललेल्या सोहळ्यात बृजभूषण शरण सिंग मोठ्या दिमाखात वावरत होते. हा खेळाडूंच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार होता.

या सर्व प्रकारामुळे खेळाडू व्यथित झाले नसले तरच नवल. आता पुढे काय हा त्यांच्यासमोर प्रश्न होता. अशा वेळी खचून न जाता त्यांनी आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार केला व आपण कसे जिगरबाज आहोत हे दाखवून दिले. त्यांनी असा निर्धार केला, की आता थेट हरिद्वारला जायचे आणि हरी की पौडी येथे आपणाला मिळालेली सर्व पदके गंगार्पण करायची. जेथे भाविक आपल्या नातेवाईकांच्या अस्थी विसर्जित करतात, तेथे खेळाडूंनी आपली पदके विसर्जित करण्याचा निर्णय घ्यावा याला काय म्हणायचे. देशाच्या इतिहासातील ही एक अत्यंत दुःखद घटना म्हणता येईल. नियोजित कार्यक्रमानुसार सर्व खेळाडू तेथे जमले. त्याचवेळी शेतकरी नेते दिनेश टिकैत (राकेश टिकैत यांचे बंधू) यांनी हस्तक्षेप करत ती सर्व पदके आपल्याकडे घेतली. आम्ही आता हे आंदोलन पुढे चालवू. आम्हाला थोडा अवधी द्या, असे म्हणत आंदोलकांची समजूत घातल्यामुळे पदकांचे विसर्जन टळले. खेळाडू माघारी परतले. शेतकऱ्यांनी ९ जून ही आंदोलनाची तारीख जाहीर केली व त्याआधी हे आंदोलन मिटवावे असे आवाहन सरकारला केले.

**आम्ही लढवय्ये आहोत. माघार घेणार नाही**

यानंतर ज्या घडामोडी झाल्या त्यामध्ये आंदोलक क्रीडापटूंनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. त्यांच्या कानावर सर्व काही घातले. त्यांनी न्याय देण्याचे आश्वासन दिले. पण अद्याप काहीही घडलेले नाही. खरे तर यापूर्वीच अमित शाह यांनी यामध्ये हस्तक्षेप केला असता तर बरे झाले असते. पण त्यांनी तसे करणे का टाळले हे त्यांचे त्यांनाच माहीत. तांत्रिक कारणास्तव नोकरीत असलेल्या आंदोलक क्रीडापटूंना कामावर परतणे भाग पडले. रेल्वे विभागात काम करणारे खेळाडू कामावर रूजू झाले आहेत, अन्यथा त्यांना नोकरी गमाविण्याची भीती होती. नोकरीत राहून आम्ही आंदोलन करत राहू, असे त्यांनी म्हटले आहे. जागतिक स्तरावर स्पर्धा जिंकणाऱ्या खेळाडूंना भारत सरकारतर्फे सार्वजनिक उद्योगात सामावून घेतले जाते, जेणेकरून त्यांना कायमस्वरूपी नोकरी मिळेल व नोकरी करत ते नवोदित खेळाडूंना मार्गदर्शन करू शकतील. ही एक चांगली प्रथा आहे. यामुळे क्रीडापटूंना आर्थिक स्थैर्य लाभते. पण सरकारने आता सर्व सार्वजनिक उद्योगांचे खासगीकरण करण्याचा निर्णय घेतल्यामुळे पुढील काळात या खेळाडूंना कोण सामावून घेणार, हासुद्धा एक महत्त्वाचा मुद्दा आहे, जो या निमित्ताने विचारात घ्यावयास हवा. क्रीडापटू नोकरीत रूजू झाल्यानंतर पुन्हा त्यांच्या विरोधकांनी आंदोलन संपल्याचा प्रचार सुरू केला. त्याला उत्तर



देताना आंदोलक क्रीडापटूंनी म्हटले आहे, की आम्ही आंदोलन मागे घेतलेले नाही. न्याय मिळेपर्यंत आम्ही लढत राहू. आम्ही लढवय्ये आहोत. माघार घेणार नाही.

या आंदोलनाचे पुढे काय होणार, हे येणारा काळ ठरवेल. पण या आंदोलनाकडे पाहताना काही गोष्टी ध्यानात येतात. पहिली म्हणजे महिलांकडे पाहण्याचा सरकारचा दृष्टिकोन. महिलांनी तक्रारच करायची नसते. अन्याय झाला असेल तर तो निमूटपणे सहन करायचा असतो. हा मनुवादी दृष्टिकोन स्पष्ट झाला आहे. देशाची सर्वंकष सत्ता जर या लोकांच्या हातात एकवटली तर हे लोक महिलांना आपल्या राज्यात कसे वागवतील, याची एक झलक या आंदोलानाच्या स्वरूपात देशाला पाहता आली आहे. ही मंडळी भारताच्या राज्यघटनेचा आदर करणारी नाही. उलट तिरस्कार करणारी असून यांना आज मनुस्मृतीवर आधारित समाजरचना निर्माण करायची आहे. असे दिसून येते, अन्यथा यांनी आंदोलक महिलांच्या तक्रारींची नोंद घेतली असती. तक्रारीची नोंद घेऊन तक्रार निवारण करण्यासाठी प्रयत्न केले असते. पण तसे काहीही झाले नाही. याचे क्रीडा क्षेत्रावर गंभीर परिणाम होऊ शकतात. महिला खेळाडूंचे जर लैंगिक शोषण होणार असेल तर पालक आपल्या मुलींना क्रीडा क्षेत्रात पाठवणार नाहीत. अलीकडेच तर महिला खेळाडू वेगवेगळ्या क्षेत्रांत चमकू लागल्या आहेत. कुस्ती, ज्युडो, कराटे, मुष्टीयुद्ध, वजन उचलणे हे क्षेत्र पूर्वी केवळ पुरूषांसाठी असायचे. कारण या क्रीडा प्रकारात जी अंगमेहनत घ्यावी लागते आणि शारीरिक क्षमता संपादन करावी लागते ती महिला करू शकतील काय, असा एक प्रश्न होता. पण महिलांनी या क्षेत्रातही आपण मागे नाही, पुरूषांच्या बरोबरीने आम्ही शारिरीक क्षमता मिळवू शकतो हे दाखवून दिले आहे. जागतिक पातळीवर त्या पदके मिळवत आहेत. अशावेळी त्यांना गरज आहे ती सुरक्षेची, प्रोत्साहनाची, मार्गदर्शनाची, सन्मानाची. पण यातले काहीच जर होणार नसेल तर महिला क्रीडा क्षेत्राकडे कशा आकर्षित होतील. आज हे क्रीडा क्षेत्रात घडत आहे. उद्या ते इतर अनेक क्षेत्रांतून घडू लागेल आणि मग एकेक क्षेत्रातून महिलांना दूर फेकले जाईल. इतके दूर, की त्या पुन्हा घराच्या उंबरठ्याच्या आत लोटल्या जातील. हे होऊ नये असे ज्यांना वाटते त्यांनी आता संघटितपणे अशा प्रकारांना विरोध करण्याची नितांत गरज आहे. •••

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

# दलितांच्या हत्येविरुद्ध संघटीत प्रयत्नांची गरज



बी.व्ही. जोंधळे

**एक काळ होता, मराठवाड्यात दलित समाजावर कुठेही अत्याचार झाले तर गांधीवादी कार्यकर्ते तिथे धाऊन जायचे. पुरोगामी मंडळी चौकशी करायची. अन्याय-अत्याचाराचा निषेध करायची. पण ना आज कुणी प्रामाणिक गांधीवादी शिल्लक आहेत, ना सामाजिक परिवर्तनाच्या पुरोगामी चळवळी शाबूत आहेत. बाकी सर्व राजकारण्यांचा जीव सत्तेत रमत आहे. अशा राजकीय नि सामाजिक माहोलात अक्षय भालेरावची हत्या उपेक्षेने जर दुर्लक्षिली जात असेल, तर आश्चर्य ते कोणते?**

मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा सध्या अमृतमहोत्सव सुरू आहे. म्हणजे निजामाच्या हैदराबाद संस्थानातून मराठवाडा मुक्त झाल्याला आता ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. मराठवाडा मुक्तीचा अमृतमहोत्सव साजरा करायला निघालेले स्वातंत्र्यसैनिकांचे वारसदार, विचारवंत, साहित्यिक, लेखक, कवी, समीक्षक हे सारेजण झाडून माध्यमातून अशी ओरड करीत आहेत, की मराठवाडा मुक्तीचा एकीकडे अमृतमहोत्सव सुरू असताना, दुसरीकडे शासन मात्र मराठवाड्याकडे दुर्लक्ष करीत आहे. म्हणून आता साहित्यिकांनाच मराठवाड्याच्या विकासासाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे. चांगली गोष्ट आहे. पण मराठवाड्याच्या विकासाच्या बाता करताना या अमृतमहोत्सवी मराठवाड्यात दलितांचे स्थान काय आहे, यावर बोलायला मात्र कुणीच तयार नाही. मराठवाड्याच्या विकासाच्या गोष्टी करायला निघालेले विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक हेसुद्धा सांगायला तयार नाहीत, की खरोखरच साधू-संतांचा म्हणविणाऱ्या या मराठवाड्यात आपण दलित समाजाला बंधुभावाची वागणूक देतो काय? त्यांचा विकास वगैरे तर सोडा; पण किमान त्यांना माणुसकीची वागणूक न देता त्यांच्यावर अन्याय-अत्याचार, जुलूम करीत नाही काय? अमृतमहोत्सवी मराठवाड्यात दलितांच्या निर्दयपणे हत्या करीत नाही काय? राजरोसपणे त्यांचे मुडदे पाडत नाही काय? यावर बोलायला कुणी तयारच नाही. म्हणजे असे, की निजामाच्या हैदराबाद संस्थानात तर दलित समाजावर अत्याचार हे होतच होते. पण हैदराबाद संस्थानातील मराठवाडा निजामाच्या जोखडातून मुक्त होऊन आता ७५ वर्षे उलटून गेल्यावरही स्वातंत्र्यात मराठवाड्यातील दलितांवरील अत्याचार मात्र थांबले नाहीत. मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाल्यावरसुद्धा गेल्या ७५ वर्षांत दलित समाजावरील अत्याचारात खंड पडलेला नसून दिवसेंदिवस दलित अत्याचारात वाढ मात्र होत आहे. खेडोपाडीचा दलित समाज जीव मुठीत घेऊन छळ, अन्याय, अत्याचार सोसत आहे. पण याची ना कुणाला खंत आहे, ना खेद आहे. तरीही आपण ७५ वर्षीय मराठवाडा मुक्तीचे ढोल-नगारे जोरजोरात बडवित आहोत. दलितहिताकडे साफ दुर्लक्ष करून आमच्यावर शासन अन्याय करीत आहे, असे चौपदरी गळे काढीत आहोत. आता हे सारे आठवण्याचे कारण म्हणजे नांदेड जिल्ह्यातील बोंढार गावी दलित युवक अक्षय भालेराव याची झालेली निर्घृण हत्या होय.



**बाबासाहेबांची जयंती साजरी करणे हा गुन्हा ठरतो काय?**

का झाला अक्षय भालेरावचा खून? असा कोणता गंभीर गुन्हा त्याने केला होता, की त्याला या जगातूनच संपविण्यात आले? तर त्याचा गुन्हा एवढाच होता, की यंदा त्याने गावात पुढाकार घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी केली होती! बाबासाहेबांची जयंती साजरी करणे हा गुन्हा ठरतो काय? भीमजयंतीचा कार्यक्रम घेण्यासाठी त्याने शासकीय परवानगी घेतली नव्हती काय? तर तशी परवानगीसुद्धा त्याने घेतली होती. त्याने बेकायदा ना भीमजयंतीची गावातून मिरवणूक काढली, ना कुठला भीमजयंतीचा कार्यक्रम घेतला. सर्व काही रितीला आणि नियमांना धरूनच भीमजयंती साजरी झाली होती. तरीही अक्षयची हत्या व्हावी? का? का बरे? तर आमच्या गावात समाजव्यवस्थेने अस्पृश्य ठरविलेल्या एका नेत्याची जयंती धूमधडाक्यात साजरी होते म्हणजे हा आपला घोर अपमान आहे, अशी जातीय मानसिकता बाळगून अक्षयला निर्दय मारहाण करून संपविण्यात आले. बातम्या हेच सांगत आहेत आणि त्या दलित नेत्यांनी बोंढार गावास भेट दिली त्यांचेही असेच म्हणणे आहे. म्हणजे पुन्हा तेच. तुम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव विद्यापीठास मागता काय?

मग तुम्हाला धडा हा शिकविलाच पाहिजे. या जातीय मानसिकतेने जसे खेडोपाडी दलित समाजावर अत्याचार करण्यात आले. त्याच मानसिकतेने भीमजयंती साजरी करणाऱ्या अक्षयला कायमचे संपविले गेले. मराठवाड्याच्या तथाकथित अस्मितेच्या नावाखाली नामांतरास विरोध करून दलित समाजावर खेडोपाडी नृशंस अत्याचार करणाऱ्यांना दलितांची अस्मिता मात्र मान्य नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही दलित-वंचितांची अस्मिता आहे. तो त्यांचा श्वास आहे. तो त्यांचा स्वाभिमान आहे. तेव्हा अक्षयने आपल्या समाजबांधवांसह भीमजयंती साजरी केली तर त्याची अस्मिता का मान्य होऊ नये? भीमजयंती साजरी केल्यामुळे कुणाचे काय नुकसान झाले? कुणाचा काय तोटा होतो? पण नाही. दलित चक्क स्वाभिमानाच्या गोष्टी करतात, गावात डोके झुकवून वावरण्याऐवजी डोके वर करून फिरतात, म्हणजे किती घोर अपमान? किती हा अक्षम्य गुन्हा? मग त्यांना धडा शिकविलाच पाहिजे. पायरीने वागायला सांगितलेच पाहिजे, या असुरी, रानटी, जंगली जातीय मानसिकतेने त्याला संपविले.

**या कुजबुजीत नवे ते काय आहे?**

अक्षय भालेरावच्या निर्घृण हत्येनंतर आता अशीही कुजबूज कानी येऊ लागली आहे, की अक्षय आणि त्याचा भाऊ हे गावात गुंडगिरी करीत होते, गावाला त्रास देत होते. आता या कुजबुजीत नवे ते काय आहे? नामांतर आंदोलनात शहीद झालेल्या जनार्दन मवाडे, पोचिराम कांबळे यांनाही खलनायकच ठरविण्यात आले होते ना? म्हणजे जो कुणी दलितहिताची भाषा करेल, दलितांची अस्मिता जागी करेल, अन्याय-अत्याचाराविरुद्ध आवाज उठवेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जयजयकार करेल त्याला एक तर बऱ्या बोलाने पायरी सांभाळून वाग असे सांगावयाचे आणि तो जर ऐकत नसेल, तर त्याला धडा शिकवायचा आणि तो शिकवून झाल्यावर मग त्याला गुंड ठरवायचे. यांस काय म्हणावे?

कायदेशीर प्रक्रिया, कायदा अस्तित्वात असताना एखाद्याचा खून करण्याचा अधिकार कुणास कसा काय मिळू शकतो? पण हे सारे प्रश्नच तसे व्यर्थ आहेत. तुम्ही हक्काची, स्वाभिमानाची, अस्मितेची भाषा करताय ना, मग तुम्हाला धडा हा शिकविलाच पाहिजे, या जातीय मानसिकतेने अक्षयचा बळी घेतला हेच काय ते खरे, असे म्हटले तर ते मग कसे काय चूक ठरू शकते?

**अक्षय दलित होता ना? मग पाहून घेतील दलित काय ते?**

अक्षयची हत्या होऊन आता महिना उलटून गेला आहे. पण सेक्युलर म्हणविणाऱ्या कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्याने अक्षयच्या निर्घृण हत्येचा निषेध वगैरे केलेला दिसत नाही. कुणा सेक्युलर नेत्याने बोंढार गावात जाऊन अक्षयच्या कुटुंबियांची भेट घेतलेली नाही. घेणार तरी कसे? त्यांना तसा वेळ तरी कुठे आहे? महाराष्ट्रातील साऱ्या सेक्युलर म्हणविणाऱ्या पक्षाच्या नेत्यांचा वेळ आज हिडीस राजकारण करण्यात व्यतीत होत आहे. एकमेकांना असभ्य भाषेत दुषणे देण्यात खर्ची पडत आहे. कोण बेईमान, कोण इमानदार, कुणाचे हिंदुत्व खरे-कुणाचे खोटे, कुणाचे सरकार कधी पडणार, कुणाचे सरकार कधी येणार, कुणी किती पैसे खाल्ले, कुणी किती भ्रष्टाचार केला याच्या सुरस कथा चघळण्यातच साऱ्यांना इतिकर्तव्यता वाटत आहे. समाजाचे प्रश्न, सामाजिक अभिसरण, उच्च कोटीची राजकीय-सामाजिक मूल्ये याचा विसर पडून साऱ्यांचा जीव सत्तेत रमत आहे. राज्यात सध्या सत्तास्पर्धेचा घृणास्पद खेळ सुरू आहे. द्वेषाचे गलिच्छ राजकारण होत आहे. सभ्य, सुसंस्कृत, शालीन महाराष्ट्राची परंपरा गाडून टाकून सारा उबग आणणारा राजकीय सत्तास्पर्धेचा घाणेरडा खेळ पाहणे महाराष्ट्राच्या नशिबी आले आहे. अशा स्थितीत अक्षय भालेरावावर जो खुनी अत्याचार झाला त्याकडे पाहायला कुणाला वेळ तरी कसा असणार? बहुसंख्याक समाजाचा तर प्रश्नच नाही. अक्षय दलित होता ना? मग पाहून घेतील दलित काय ते? आपल्याला त्याच्याशी घेणे-देणे काय? आणि मूळ मुद्दा असा, की अक्षयला अस्मितादर्शक भीमजयंती साजरी करण्याची गरजच काय होती? केली ना भीमजयंती साजरी? मग भोगा आपल्या कर्माची फळे.

**...तर गांधीवादी कार्यकर्ते तिथे धाऊन जायचे**

थोडक्यात, अत्याचार कुणावर झाला, तो कुणी कुणावर केला हे आधी पाहून घडलेल्या घटनेची निंदा करायची का नाही, हेच जर ठरत असेल व हेच जर आपले कटू वास्तव समाजजीवन असेल, तर समाजाने अक्षयच्या हत्येची दखल तरी का घ्यावी? हळहळ तरी का व्यक्त करावी? कारण दलित हे अत्याचार करण्यासाठीच असतात. परंपरा तेच सांगते. तेव्हा एखाद्या अक्षयचा निर्घृण बळी गेला असेल, तर समाजाने का बरे अस्वस्थ व्हावे? एक काळ होता, मराठवाड्यात दलित समाजावर कुठेही अत्याचार झाले तर गांधीवादी कार्यकर्ते तिथे धाऊन जायचे. पुरोगामी मंडळी चौकशी करायची. अन्याय-अत्याचाराचा निषेध करायची. पण ना आज कुणी प्रामाणिक गांधीवादी शिल्लक आहेत, ना सामाजिक परिवर्तनाच्या पुरोगामी चळवळी शाबूत आहेत. बाकी सर्व राजकारण्यांचा जीव सत्तेत रमत आहे. अशा राजकीय नि सामाजिक माहोलात अक्षय भालेरावची हत्या उपेक्षेने जर दुर्लक्षिली जात असेल, तर आश्चर्य ते कोणते?

**१९७० च्या दशकात दलित पँथर या लढाऊ संघटनेचा जन्म**

अक्षयच्या निर्घृण हत्येनंतर दलित समाज अस्वस्थ होणे, संतापणे स्वाभाविक आहे. तसा तो संतापलासुद्धा! अक्षयच्या हत्येचा तीव्र निषेध करून अक्षयच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी यासाठी मराठवाड्यात व अन्यत्र आंदोलनेसुद्धा झाली, होत आहेत. पण अन्याय-अत्याचारविरोधी महाराष्ट्र ढवळून काढणारी आंदोलने मात्र होताना दिसत नाहीत. दलित पँथरचा सुवर्णमहोत्सव नुकताच महाराष्ट्रात साजरा झाला. १९७० च्या दशकात महाराष्ट्रात नि मराठवाड्यात दलित अत्याचारांना असाच ऊत आला होता. देशभरही दलित अत्याचारात वाढ झाली होती. तेव्हा दलित युवकांतील चीड जागी होऊन दलित युवकांनी अत्याचाराचा मुकाबला करण्यासाठी दलित पँथर या लढाऊ संघटनेला जन्म दिला. दलित पँथरने तेव्हा अत्याचारविरोधी एल्गार पुकारून अत्याचार करणाऱ्यांच्या उरात धडकी भरविली होती. तशी ती दलित युवकांची चीड, दलित युवकांचा संताप आता मात्र प्रकट होताना फारसा दिसत नाही. दलित अत्याचाराचा एकजुटीने व संघटितपणे प्रतिकार होतानाही दिसत नाही. आपणात असंख्य गट आहेत. गटबाजीमुळे आपल्या समाजकारणातही एक मरगळ आली आहे. ती संपवून एकजुटीने अत्याचाराचा प्रतिकार करण्याची गरज आता पुन्हा नव्याने एकदा निर्माण झाली आहे. एकमेकांवर टीका करणे, एकमेकांच दोष काढणे आता थांबले पाहिजे.

अशाने चळवळ मागे जाते हे सर्वांनीच लक्षात घेतले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली तर ती गैर ठरू नये.

दलित समाजावर होणाऱ्या अत्याचारामुळे आपणाला कितीही राग आला, तरी तो शांततामय पद्धतीनेच व्यक्त करताना दलित-दलितेतर संवाद साधण्याचेही प्रयत्न झाले पाहिजेत आणि दलित समाजाच्या माना-सन्मानाचा, त्यांना प्रतिष्ठेने जगण्याचा हक्क हा बहुसंख्याक समाजानेही मान्य करण्याची गरज आहे. कारण दलितांचा प्रश्न हा केवळ दलित समाजापुरता मर्यादित नसून तो राष्ट्रीय प्रश्न आहे, हेसुद्धा येथील व्यवस्थेने समजून घेण्याची गरज आहे.

...तर ती अनाठायी वा अप्रस्तुत ठरू नये

राज्यकर्ते व राजकीय नेत्यांना सध्या त्यांच्या सत्तास्पर्धेच्या राजकारणामुळे अक्षयच्या हत्येकडे व एकूणच दलित समाजाच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला वेळ नाही. राजकीय नेते आता लोकसभेच्या व महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका आल्यावर दलितहिताची भाषा जरूर करतील. तोंडाला फेस येईपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जयजयकार करतील. पण हे काही खरे नाही. हे सारे सत्तास्पर्धेचे राजकारण आहे. अशा स्थितीत पोलिस यंत्रणेने अक्षयच्या मारेकऱ्यांना कठोरातील कठोर शिक्षा होईल या दिशेने कारवाई करावी, अशी अपेक्षा आहे. पोलिस यंत्रणा आपले कर्तव्य पार पाडेल, किमान पार पाडावे अशी अपेक्षा व्यक्त केली, तर ती अनाठायी वा अप्रस्तुत ठरू नये.

शेवटी एक. मराठवाडा ही संतांची भूमी म्हटली जाते. अशा या संतांच्या भूमीत सैतानालाही लाजविणारे अत्याचार दलित समाजावर आपण अजून किती काळ करणार आहोत, याचाही मराठवाड्यातील सूज्ञ जनतेने अंमळ शांत चित्ताने सहिष्णूभावाने विचार करण्याची वेळ आता आली आहे. मराठवाडा मुक्तीचा अमृतमहोत्सव साजरा करीत असताना मराठवाड्यात दलितांचे स्थान काय आहे, या अनुषंगानेही विचारमंथन व्हावे, अशी रास्त अपेक्षा व्यक्त केली तर ती गैर ठरू नये. दुसरे काय? •••

(लेखक आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)

# अँटीमुस्लिम बहुजन

(पान ५ वरून) होते. परवाच्या तणावावेळी या इमारतीवर दगडफेक करण्यात आली. जात्यंध झालेल्यांना आपण काय करतो आहोत, ते कळलेच नाही.

**राज्याभिषेकासारखी हास्यास्पद; पण सनातनी परंपरेची चाल**

हा सारा उत्पात घडवणारे बहुजन युवक होते. त्या जमावात ब्राह्मणही थोडेफार असतील. पण बहुजनांची साथ असल्याशिवाय महाराष्ट्रात काय सफल होते? काही नाही. म्हणून शाहू महाराजांच्या मृत्यूला शंभर वर्षे पूर्ण झाल्या झाल्या त्यांचे विचार उद्ध्वस्त करण्याचा बेत आखला गेलेला दिसतोय. शाहू महाराज ब्राह्मणांच्या मक्तेदारीविरुद्ध लढले. त्यांची चातुर्वर्ण्य, जातिप्रथा, भेदभाव, विषमता यांची परंपरा शाहूंनी मोडून काढली. आज देशात पुनरुज्जीवनवादी विचार सत्तेत आलेलाय. खुद्द पंतप्रधानांनी देवब्राह्मणांच्या आशीर्वादाने अन् उपस्थितीत राज्याभिषेकासारखी हास्यास्पद; पण सनातनी परंपरेची चाल आपण पाळतो हे दाखवून दिले.

शाहू महाराज व त्यांच्या आश्रयाखाली आलेली सत्यशोधक समाजाची चळवळ हिंदू धर्मातल्या तमाम दोषांना, दुर्गुणांना जबाबदार म्हणून ब्राह्मणांना अपराधी ठरवत होती. परिणामतः अस्पृश्यता, जातिभेद, विषमता पुष्कळ कमी झाली. ब्राह्मणांना व त्यांनी जोपासलेल्या सनातन धर्माला असे काही तडाखे बसले, की समता, न्याय, बंधुता यांची कड त्यांना घ्यावीच लागली. नाईलाज म्हणा, चळवळीचा दबाव म्हणा, त्यावेळी माघारलेला सनातन धर्म आज सत्तेत बसून राजरोस मनुस्मृती आणि सनातन धर्माची बात करू लागलाय. १९२२ साली शाहू महाराजांचं निधन झालं. १९२३ साली सावरकर यांचे 'हिंदुत्व' हे पुस्तक आले. १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन झाला. हिंदू राष्ट्र स्थापन करण्यासाठी कटिबद्ध झालेले त्यांचे विचार अचानक मुसलमान, ख्रिश्चन, कम्युनिस्ट यांना शत्रू मानतात आणि हा देश फक्त हिंदूंचाच आहे असे बजावू लागतात. या प्रचाराला त्या काळी फार लोक भुलले नाहीत. कारण ब्राह्मणेतर चळवळ जोमात होती. राज्यघटना आणि स्वातंत्र्य यामुळे यापुढे अशा चळवळींची गरज उरली नाही; परंतु हिंदू राष्ट्रवादी ब्राह्मणी पुनरुज्जीवनवादी टपून बसले होते. २०१४ साली त्यांनी संधी मिळवली. ब्राह्मणांचा सारा रोष व रोख त्यांनी मुसलमान, ख्रिश्चन, डावे यांच्याकडे वळवला. ब्राह्मणांच्या आहारी गेलेल्या बहुजनांना त्यांनी फितवले. त्याचीच परिणती कोल्हापुरातल्या 'औरंगजेब' कारस्थानात झालीय.

**मुसलमान कशाचे प्रतीक आहेत?**

जो बहुजन शेठजी-भटजी यांची समाजावरची पकड उद्ध्वस्त करायला निघाला होता, तो चक्क शेठजी-भटजी यांच्या हातातले खेळणे बनलाय. त्यांच्या व्हॉट्सॲप विद्यापीठाचा विद्यार्थी व चळवळ्या बनलाय. धर्माचा आडोसा घेऊन शेठजी-भटजी आपल्या कब्जात पुन्हा हा देश घेऊ पाहत आहेत. सत्ता, प्रसार माध्यमे, धाक-दहशत आणि आमिषे, प्रलोभने यांच्या बळावर शेठजी-भटजी यांच्या जागी समाजाचे शत्रू मुसलमान होतात म्हणजे काय? शेठजी-भटजी शोषण व जुलूम यांची प्रतीके होते. मुसलमान कशाचे प्रतीक आहेत? ते शोषक आहेत की अत्याचारी?

भाजपच्या खासदारांत, आमदारांत आणि मंत्रिमंडळात देशात एकही मुसलमान नाही. मोगल राजवटीचा इतिहास भाजप अभ्यासक्रमातून वगळत निघालाय. दर निवडणुकीत धार्मिक द्वेष फैलावून मतदारांत दुफळी माजवायची, नोकरभरतीत मुसलमान डावलायचे हे तर नेहमीचेच झालेय. मग कोण्या मुसलमानाशी लढायला बहुजन युवक सरसावलाय? त्याच्यासारखाच बेकार, सुशिक्षित, गरीब, महागाईमुळे ग्रस्त आणि श्रमिक मुसलमानाविरुद्ध? अरेरे...! •••

**(लेखक ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ आहेत.)**

# प्रवेशपरिक्षा की छळ परिक्षा...



प्रा. दिलीप चव्हाण

**बहुतेक सर्व परीक्षांचे स्वरूप हे आता स्पर्धात्मक बनलेले आहे. या प्रवेश परीक्षांचा अतिशय विपरित असा परिणाम या विद्यार्थ्यांवर आणि सामाजिक व्यवस्थांवर होत असतो. जगभर अशा प्रकारच्या प्रवेश परीक्षांविषयी चिंता व्यक्त करण्यात आलेली आहे. प्रवेश परीक्षा उच्च आणि मध्यमवर्गातील विद्यार्थ्यांना लाभदायक ठरतात, हे याचं कारण आहे. प्रवेश परीक्षांमधून विद्यार्थ्यांवर अकारण ताण तयार होतो तो भाग वेगळाच. म्हणून प्रवेश परीक्षांच्या तणावातून विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर आत्महत्यादेखील करताहेत, असं दिसलं.**

आपल्या देशामध्ये कुठेही प्रवेश घ्यायचा असेल तर प्रवेश परीक्षेचे (entrance examination) स्तोम माजविण्यात आलेले आहे. काही वर्षांपूर्वी विधी पदवी (एल.एल.बी.) या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी बारावीनंतर किंवा पदवीनंतर सहज प्रवेश घेऊ शकत असत. आता तसे नाही. आता अगदी दुर्गम भागातील एखाद्या विधी महाविद्यालयाला एल.एल.बी.च्या पहिल्या वर्षाला प्रवेश घ्यायचा असेल, तर सी.ई.टी ही परीक्षा उत्तीर्ण होणे किंवा किमान ती परीक्षा देणे बंधनकारक आहे. पूर्वी विद्यार्थी बारावीनंतर किंवा पदवीनंतर सहजपणे असे प्रवेश घेत असत आणि अभ्यासक्रम पूर्ण करत असत. आता अशा प्रकारची प्रवेश परीक्षा आल्यानंतर सर्व पैलू बदलले. या परीक्षांसाठीचे गाईड्स बाजारात आली. त्यासाठीचे नवीन शिकवणी उद्योग सुरू झाले. या परीक्षांमुळे प्रवेशाच्या प्रक्रियेमधील गुंता वाढला, प्रवेशाचा कालावधी वाढला, महाविद्यालयांचं शैक्षणिक वर्षाचं नियोजन बिघडलं आणि बऱ्याच महाविद्यालयांमध्ये काही वर्षे तर प्रवेशाच्या मर्यादेपेक्षा कमी विद्यार्थी प्रवेशित झाले. यातून शहरी, उच्च व मध्यमवर्गीय आणि सुशिक्षित विद्यार्थ्यांना लाभ मिळाला आणि बरेच ग्रामीण बहुजन गरीब विद्यार्थी भरडले गेले.





एस. अनिथा

असे सगळे घडत असताना या संदर्भामधला चिकित्सक विचार फारसा केला गेला नाही. विद्यार्थ्यांनी किंवा प्राध्यापकांनी किंवा पालकांनी विधी पदवी अभ्यासक्रमासाठी अशा प्रकारची सी.ई.टी आयोजित करावी अशी मागणी केलेली नसताना, सरकारने विधी अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा सक्तीची केली.

**'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' संस्थेची स्थापना**

आपल्या देशामध्ये प्रवेश परीक्षेविषयी मोठ्या प्रमाणावर अधिमान्यता आणि भक्तीभाव दिसतो. आता एम.बी.बी.एस किंवा बी.एड. व्हायचं असेल, तर कुठली तरी प्रवेश परीक्षा ही द्यावी लागते आणि प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून न्यायपूर्ण अशा प्रवेशाची हमी मिळवली जाते, असे मोठ्या प्रमाणावर मानले जाते. या प्रवेश परीक्षा राष्ट्रीय अथवा राज्य स्तरावर घेतल्या जातात, या परीक्षांबाबत मोठी गुप्तता बाळगली जाते आणि सर्वांना एकाच परीक्षेच्या माध्यमातून निवडले जात असल्यामुळे त्यामध्ये दुजाभाव होत नाही, असेही समजले जाते.

वस्तुत: अशा प्रकारचे सर्व दावे हे शंकास्पद बनतात. आपल्याकडे अगदी सुरुवातीपासून अशा प्रकारच्या प्रवेश परीक्षा नव्हत्या. २००५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एक निवाडा दिला. त्यानुसार भारतामध्ये एम.बी.बी.एस. आणि इंजिनिअरिंग अशा अभ्यासक्रमांसाठी राष्ट्रीय स्तरावरच्या प्रवेश परीक्षांचा निर्णय घेण्यात आला. पुढे चालून 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' या संस्थेची स्थापना केली गेली. पुढे राष्ट्रीय शिक्षण धोरणाने राज्य विद्यापीठे, केंद्रीय विद्यापीठे, विविध संशोधन संस्था आणि विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा या राष्ट्रीय स्तरावरून घेण्यात येतील, अशी भूमिका घेतली.

बहुतेक सर्व परीक्षांचे स्वरूप हे आता स्पर्धात्मक बनलेले आहे. या प्रवेश परीक्षांचा अतिशय विपरित असा परिणाम या विद्यार्थ्यांवर आणि सामाजिक व्यवस्थांवर होत असतो. जगभर अशा प्रकारच्या प्रवेश परीक्षांविषयी चिंता व्यक्त करण्यात आलेली आहे. प्रवेश परीक्षा उच्च आणि मध्यमवर्गातील विद्यार्थ्यांना लाभदायक ठरतात,

हे याचं कारण आहे. प्रवेश परीक्षांमधून विद्यार्थ्यांवर अकारण ताण तयार होतो तो भाग वेगळाच. म्हणून प्रवेश परीक्षांच्या तणावातून विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर आत्महत्यादेखील करताहेत, असं दिसलं. चीनमध्ये गाओकाओ नावाची एक नऊ तासांची प्रवेश परीक्षा घेतली जाते. ही चीनमधील उच्च शिक्षण संस्थांमधील परीक्षेसाठी आयोजित केली जाते. या परीक्षेतून निर्माण झालेल्या अनंत अशा प्रश्नांनी सध्या चीनी उच्च शिक्षणक्षेत्र गांजलेले आहे. अशा परीक्षांना 'प्रेशर कुकर'ची उपमा देण्यात येते. दक्षिण कोरियामध्येसुद्धा प्रवेश परीक्षेच्या माध्यमातून वाढत जाणाऱ्या ताणाची चर्चा करण्यात आलेली आहे आणि यातून खूप मोठ्या प्रमाणावर आत्महत्येचं प्रमाण वाढलेलं आहे. मध्यंतरी हाँगकाँगमध्ये अशा प्रकारच्या अधिक काठिण्यपातळी असणाऱ्या परीक्षांच्या विरोधात चाळीस हजार पालकांनी एका फेसबुक पेटीशनवर सह्या केल्या होत्या.

**नामुष्कीचा किंवा न्यूनगंडाचा अनुभव घेऊन विद्यार्थी नाउमेद होतात**

असं जगभर सुरू आहे. असं का सुरू आहे? याचा थोडा तपशिलात जाऊन विचार करायला हवा. भारत हा या संदर्भात अतिशय वाईट स्थितीमध्ये आहे. भारतीय उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेचे यापूर्वीच वाभाडे निघालेले आहेत आणि असे असताना विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या प्रवेश परीक्षा देण्यासाठी तयार करण्यातून नवनव्या समस्या भारतामध्ये तयार झालेल्या आहेत. यामधून सर्वात मोठी समस्या तयार झालेली आहे ती प्रचलित शैक्षणिक संस्था बेदखल होण्याची. यापूर्वी सरकारी प्रक्रियेतून आणि आर्थिक दातृत्वातून प्रस्थापित झालेल्या शाळा आणि महाविद्यालय यांना या प्रवेश परीक्षा बेदखल करत. आज महाराष्ट्रातील विज्ञान कनिष्ठ महाविद्यालये ही केवळ सांगाडे बनली आहेत. उदाहरणार्थ, जर आपण 'नीट' ही परीक्षा राज्याच्या बारावीच्या अभ्यासक्रमावर आधारलेली नसते असे दिसते. त्यामुळे शालेय स्तरावर विद्यार्थी जे ज्ञान घेतात ते या प्रवेश परीक्षांमध्ये तपासले जात नाही. विद्यार्थ्यांची संख्या जसजशी वाढत जाते, तसतसे प्रवेश परीक्षांची काठिण्यपातळी वाढत जाते. अधिकाधिक विद्यार्थ्यांना अपात्र ठरविण्याच्या प्रक्रियेमध्ये ही काठिण्यपातळी हेतुत: वाढविली जाते आणि अभ्यासक्रमाबाहेरचे प्रश्न प्रवेश परीक्षांमध्ये विचारले जातात. यामुळे बरेच विद्यार्थी अशा परीक्षांमधून बाद केले जातात आणि नामुष्कीचा किंवा न्यूनगंडाचा अनुभव घेऊन हे विद्यार्थी नाउमेद होतात.

**अशा अनेक वैगुण्यांनी भारतातील प्रवेश परीक्षा ग्रस्त**

वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न-उत्तरांवर आधारलेल्या या परीक्षा पाठांतराला बळ देतात. भारतामध्ये एक वैदिक ब्राह्मणी शिक्षणप्रणाली पाठांतरावर आधारलेली होती. उच्चजातीय मुलं हे पाठांतर या प्रक्रियेवर सरावलेले असतात. त्यांच्या जीवनातील यांत्रिकता त्यांना पाठांतर करून अधिक गुण मिळविण्यासाठी उपयुक्त ठरते. बहुजन कष्टकरी समाजातील विद्यार्थी हे ज्ञान व्यवहाराशी ताडून पाहण्यामध्ये अधिक रुची दाखवतात. कारण, उत्पादनाच्या प्रक्रियेशी ते खूप जवळून जुळलेले असतात. त्यामुळे अशा प्रकारच्या यांत्रिक पाठांतराच्या प्रक्रियेमध्ये असे विद्यार्थी टिकू शकत नाहीत. त्यांची कौटुंबिक परिस्थिती, घरातील वातावरण, सामाजिक




पार्श्वभूमी ही पाठांतरासारख्या यांत्रिक अशा प्रक्रियेला पूरक नसते. त्यामुळे हे विद्यार्थी अशा प्रक्रियेमधून बाद होतात. शिकवणी उद्योग हे पाठांतरावर भर देतात. परीक्षा पद्धती ही बहुपर्यायी वस्तुनिष्ठ असल्यामुळे तिचा प्रत्यक्ष ज्ञान व्यवहाराशी संबंध तुटतो. यातला आणखी एक धोका असा, की अकरावी-बारावीच्या पातळीवर पूर्वी महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा असत. त्या प्रयोगशाळांमध्ये प्रयोग करून दाखवले जात असत आणि विद्यार्थीदेखील ते प्रयोग करीत असत. आताचे जे विद्यार्थी आहेत ते कोणत्याही प्रकारच्या प्रयोगाशिवाय मेडिकलला आणि इंजिनिअरिंगला पात्र ठरतात. याचा दुष्परिणाम असा झाला, की पाठांतरावर आधारलेल्या अशा प्रवेश परीक्षांमुळे भारतीय आय.आय.टी.मधून किंवा इतर उच्च शिक्षण संस्थांमधून जगामधील नामांकित वैज्ञानिक आपल्याला तयार करता आले नाहीत, अशी टीका ज्येष्ठ वैज्ञानिक जयंत नारळीकर यांनी 'द टाइम्स ऑफ इंडिया'मध्ये लेख लिहून केलेली होती. अशा अनेक वैगुण्यांनी भारतातील प्रवेश परीक्षा ग्रस्त आहेत.

भारतामध्ये मध्यंतरी केंद्रीय विद्यापीठांच्या प्रवेशाच्या संदर्भात सर्व केंद्रीय विद्यापीठांची एकच प्रवेश परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. वस्तुत:, प्रत्येक विद्यापीठाचं एक स्वतंत्र असं स्वरूप असतं, अभ्यासक्रमांचीपण एक वैशिष्ट्यपूर्णता असते. त्यानुसार प्रवेश परीक्षा किंवा विद्यार्थ्यांची निवड ही केली जाते. असे राष्ट्रीय पातळीवरील प्रवेश परीक्षांमधून करता येणार नाही. यातून एक प्रकारचं केंद्रीकरण होईल आणि उच्च शिक्षणातून होत असलेले अवाजवी केंद्रीकरण हे गरीब कष्टकरी विद्यार्थ्यांच्या हिताचे अजिबात असू शकत नाही. यातून विविध राज्ये आणि विविध परीक्षांचं संचालन करणारे राज्यस्तरावरील मंडळं यांना बेदखल करण्यात आलेलं आहे. हा मुद्दा भारताच्या संघराज्य प्रणालीला आणि उच्च शिक्षणाच्या किंवा माध्यमिक शिक्षणाच्या स्तरावरील राज्यांनी सुरू केलेल्या विविध प्रक्रियांना बेदखल करणारा ठरतो. यातून भारतामध्ये नवनव्या समस्या तयार झालेल्या आहेत.

**'नीट' परीक्षेची बळी**

तामिळनाडू राज्याने 'नीट' या परीक्षेला विरोध केलेला आहे. तामिळनाडूतील एस. अनिथा या सतरा वर्षीय विद्यार्थिनीने 'नीट' परीक्षेबाबतच्या अतिकेंद्रीकरणामुळे २०१७ मध्ये आत्महत्या केली

होती. या विद्यार्थिनीला राज्याच्या बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेत १,२०० पैकी १,१७६ गुण मिळाले होते, तर नीट परीक्षेत तिला ७२० पैकी ८६ गुण (१२.३३ %) मिळाले होते. भौतिकशास्त्र आणि गणितात १०० पैकी १०० गुण मिळवून ती राज्यात अव्वल होती. अनिथा ही 'नीट' परीक्षेची बळी होती.




भौगोलिकदृष्ट्या अनिथा एका खेड्यातील व्यक्ती होती. ती गरीब कुटुंबातील मुलगी होती. तसेच ती दलित कुटुंबात जन्मलेली मुलगी होती. तिची आई तिच्या लहापणीच मृत्यू पावली होती. तिच्या घरात शौचालयदेखील नव्हते. ती तमिळ माध्यमाच्या शाळेतून शिकली होती. मधल्या काळात केंद्र सरकार विरुद्ध तामिळनाडू सरकार असा वाद सर्वोच्च न्यायालयात सुरू होता. या वादाचा निकाल केंद्राच्या बाजूने लागला. सध्याच्या सरकारने 'नीट'च्या बाजूने कौल टाकून शैक्षणिक निर्णय प्रक्रियेचे अधिक कठोरपणे केंद्रीकरण करण्याचे संकेत दिले.

**विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षा लाभदायक**

प्रवेश परीक्षांशी संबंधित आणखी एक समस्या ही खासगी शिकवणीची आहे. जेव्हा प्रवेश परीक्षेचा विचार केला जातो म्हणजे त्याचा अवलंब केला जातो, तेव्हा या प्रवेश परीक्षांशी शिकवणी उद्योग जुळलेले असतात. जिथे जिथे प्रवेश परीक्षा आहे, तिथे तिथे शिकवणी उद्योग येतात. भारतामध्ये उदारीकरणाच्या धोरणाच्या प्रभावामध्ये खूप मोठे शिकवणी उद्योग आकाराला आलेले आहेत आणि या उद्योगाने प्रवेश परीक्षांच्या धोरणाला पाठिंबा दिलेला आहे. किंबहुना, हा उद्योग या धोरणावरती आधारलेला आहे. यातून कोणत्याही देशामध्ये सामाजिक आणि आर्थिक विषमता वाढीला लागते. शिकवणी उद्योग आल्याबरोबर जे लोक शिकवणी घेऊ शकतात आणि जे शिकवणी घेऊ शकत नाहीत अशी एक विभागणी तयार होते. त्यामुळे कुठल्याही प्रकारची प्रवेश प्रक्रिया ही गरीब विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित ठेवण्यासाठी उपकारक ठरते. म्हणजेच श्रीमंत विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षा लाभदायक ठरतात.

राज्यांनी घेतलेल्या बोर्ड परीक्षांमधील गुणांना अगदीच बेदखल करणारी 'नीट' ही परीक्षा प्रत्यक्षात शिकवणी उद्योगाच्या (कोचिंग क्लासेस) बाजारावर उभी आहे, हे सिद्ध करण्याची आवश्यकता नाही. या शिकवणी उद्योगाने भारतीय शिक्षण व्यवस्थेला ग्रासून टाकलेले आहे. एका आंतरराष्ट्रीय अहवालानुसार, भारतामध्ये जगातले सर्वाधिक विद्यार्थी हे खासगी शिकवणी घेतात, असे दिसून आले. एका पाहणीनुसार भारतातील खासगी शिकवणी किंवा प्रशिक्षण कोचिंग उद्योगातील उलाढाल ही ५८,००० कोटी रुपये आहे आणि २०२३ मध्ये भारतातील खासगी शिकवणी उद्योग हा १,३३,९९५ कोटी रुपयांची उलाढाल असणारा उद्योग बनणार आहे.

शिकवणी उद्योग हे समाजामध्ये आर्थिक विषमता आणतात आणि विद्यार्थ्यांवरती अकारण मानसिक ताण निर्माण करतात. अशा प्रकारची भूमिका चीनमध्ये मांडण्यात आली आणि त्यातून या उद्योगावर बंदी आणण्याचा निर्णय पुढे आला. कोरिया, जपान, थायलंड अशा अनेक देशांमध्ये शिकवणी उद्योगामुळे विद्यार्थ्यांवरती कसा ताण वाढतो, त्यातून विषमता कशी वाढते याविषयीची चर्चा सुरू आहे. पण भारत याला अपवाद आहे. कारण भरतातील व्यापारी वर्ग, उच्चजातीय अभिजन, सरकार आणि माध्यमे यांची एकजूट ही या शिकवणी उद्योगाला खतपाणी घालत आहे. यातूनच भारतामध्ये एक सर्वाधिक अधिमान्य विचार हा प्रवेश परीक्षांचा विकास पावला. त्याच्याप्रती मोठी अधिमान्यता भक्तीभाव हा समाजामध्ये दिसून येतो. प्रवेश परीक्षेतूनच न्यायपूर्ण अशा प्रवेशाची शक्यता असते, असे सवर्णापासून ते कनिष्ठ जातीयांपर्यंत सर्वांनीच स्वीकारलेले आहे आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणाने या प्रवेश परीक्षांच्या विचाराला बळ दिलेले आहे, असे दिसून येते. याचं मुख्य कारण असं आहे, की शिकवणी उद्योगाच्या माध्यमातून समाजातील वर्गभेद हे जोपासता येतात. जे विद्यार्थी हे श्रीमंत कुटुंबात जन्मतात, त्यांना उच्च दर्जाच्या शिकवणी वर्गाला पाठवता येऊ शकतं आणि त्यातून शिक्षणाच्या द्वारे समाजातून मिळू शकणाऱ्या विविध लाभांवरती दावा करता येऊ शकतो.

या शिकवणी उद्योगापासून भारताच्या शिक्षणव्यवस्थेची जर सुटका करायची असेल, तर विविध राज्यस्तरावरील बोर्डाच्या परीक्षा आणि वस्तुनिष्ठ अशा बहुपर्यायी परीक्षांऐवजी जुन्या पद्धतीने बारावीच्या ज्या परीक्षा घेतल्या जातात त्या परीक्षांच्या निकालाला अमान्य न करण्याची भूमिका सरकारला घ्यावी लागेल. सध्याचे राष्ट्रीय शिक्षण धोरण मात्र प्रवेश परीक्षांचा गौरव करणारे आणि पर्यायाने शिकवणी उद्योगाला बळ पुरविणारे आहे. प्रवेश परीक्षेवर आधारलेल्या शिकवणी उद्योगाच्या विरोधात आणि त्याला बळ देणाऱ्या या धोरणाविरोधात विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांनी एकत्रितपणे आवाज उठविणे गरजेचे आहे. •••

**(लेखक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात इंग्रजीचे प्राध्यापक आहेत.)**

# अजस्त्र मनुष्यबळ : संधी की संकट

**जगातील विरोधाभासाचे चित्र पाहिल्यानंतर शिरगणतीतील भारताची ही मुसंडी आपत्ती की संधी, सध्याच्या लोकसंख्यात्मक मनुष्यबळाचा कुशलतेने वापर करून भारत मनुष्यशक्तीच्या बळावर प्रगतीची विकासाची शिखरे उल्लंघून अव्वल अर्थव्यवस्था होईल का, की त्याच्या ओझ्याखाली दबून नवनव्या आपत्तींना जन्माला घालेल, असे प्रश्न जगभर विचारले जात आहेत.**

**भास्कर नाशिककर**

सर्व प्रकारच्या अंदाजांना फोल ठरवत अखेर लोकसंख्येबाबत चीनला मागे टाकत भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश बनल्याचे संयुक्त राष्ट्राने जाहीर केले. याआधी २०२५, त्याआधी २०२८ मध्ये भारत लोकसंख्येबाबत चीनला मागे टाकून अव्वल ठरेल, अशी भाकितं केली होती. स्टेट ऑफ द वर्ल्ड पॉप्युलेशन रिपोर्ट २०२३ नुसार, भारताची लोकसंख्या १४२ कोटी ८० लाख तर चीनची १४२ कोटी ५० लाख झाली आहे. एकट्या युरोप खंडाची लोकसंख्या ७५ कोटी तर अमेरिका खंडाची मिळून एक अब्ज आहे. भूतलावर एकूण आठ अब्ज माणसं अस्तित्वात आहेत. भारताची लोकसंख्या २०६४ मध्ये शिगेला पोहोचून १७० कोटींवर जाईल. एखादेवेळी हीच लोकसंख्या दोन अब्जालाही टेकू शकते. भारतातील ४० टक्के लोकसंख्या पंचवीस वयाखालील असेल. सरासरी वय २८ आहे, हेच वय अमेरिकेचे ३८, तर चीनचे ३९ आहे. ६५ वयावरील भारतीय सात टक्के, तर चीन आणि अमेरिकेत अनुक्रमे १४ व १८ टक्के आहेत. आजच्या घडीला जपान, युरोपीय देश यांच्यात ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत असून, तरूणांची वाणवा आहे. फ्रान्समधील सरकारने त्यामुळे सेवानिवृत्तीची वयोमर्यादा वाढवली आहे. त्याच्या निषेधार्थ तेथील नागरिक रस्त्यावर उतरत आहेत. जगातील १९७ देशांपैकी ६९ देश जननदर घटवण्याच्या चिंतेत आहेत, तर चीनसह ७४ देश तो वाढवण्यावर भर देऊ लागले आहेत. ऐंशीच्या दशकात एक दाम्पत्य एक मूल धोरण कठोरपणे राबवणाऱ्या चीनने २०१६ मध्ये एक दाम्पत्य दोन मुले आणि २०२१ मध्ये एक दाम्पत्य तीन किंवा अधिक मुले असे धोरण स्वीकारले. मात्र त्याला तेथील जनतेतून प्रतिसाद मिळत नाही.



### कुशल मनुष्यबळाची ताकद

जगातील हे विरोधाभासाचे चित्र पाहिल्यानंतर शिरगणतीतील आपली ही मुसंडी आपत्ती की संधी, सध्याच्या लोकसंख्यात्मक मनुष्यबळाचा कुशलतेने वापर करून भारत मनुष्यशक्तीच्या बळावर प्रगतीची विकासाची शिखरे उल्लंघून अव्वल अर्थव्यवस्था होईल का, की त्याच्या ओझ्याखाली दबून नवनव्या आपत्तींना जन्माला घालेल, असे प्रश्न जगभर विचारले जात आहेत. जर्मनीतील दर स्पिगेल दैनिकातील व्यंगचित्राने भारत आणि चीन यांच्यातील लोकसंख्यावाढ आणि प्रगतीची तुलनात्मक स्थिती दर्शवली आहे. भारत सरकारने त्याच्यावर टीका केली आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने भारताची संख्यात्मक वाढ झाली, पण गुणात्मक (क्वलिटेटिव्ह) वाढीचे काय, उच्चकोटीचे जीवनमान जनतेला मिळत आहे का, अशी शालजोडी दिली आहे. मात्र, शेजाऱ्याने कितीही निंदा-नालस्ती केली तरी, त्याला पुरून उरत कर्तृत्व दाखवणे यातच पौरूषत्व असते. चीन असूदे नाही तर जर्मनी, सर्वाधिक तरूणांचा असलेला भारत लोकसंख्येच्या बळावर कर्तृत्वाची नवी कमान उभारेल, असा आशावाद ठेवतच पुढील पन्नास-शंभर वर्षांच्या वाटचालीचे राज्यकर्त्यांनी नियोजन केले पाहिजे. अन्यथा, लोकसंख्येचा हा बॉम्ब विनाशाकडे नेऊ शकतो, हेही आतापासूनच ध्यानात घेतले पाहिजे.

### आंबेडकर, कर्व्यांचा द्रष्टेपणा

ब्रिटिशांशी स्वातंत्र्यासाठी लढत असतानाच देशातील द्रष्ट्या सुधारकांनी भारतातील लोकसंख्यावाढीच्या गंभीर समस्येकडे लक्षवेध केला होता. रघुनाथराव धोंडो कर्वे यांनी संततीनियमन आणि कुटुंबनियोजन काळाची गरज आहे. वाढत्या कुटुंबविस्ताराने स्त्री-पुरूषांवर होणारे सामाजिक परिणाम विषद केले होते. समाजस्वास्थ्य नावाच्या नियतकालिकातून कुटुंबनियोजन, संततीनियमन साधनातील सुधारणा, महिलांचे आरोग्य, बालकांची खुरटणारी वाढ याकडे लक्ष वेधले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कुटुंबनियोजनासाठी वैधानिक पावले उचलण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात बिल तयार केले होते. तथापि, त्यांच्या प्रकृती अस्वस्थतेमुळे त्यांनी बनवलेले बिल पीजे रोहन यांनी सभागृहात मांडले होते.

### धोरणात्मक उपाययोजनांचे अपयश

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५१मध्ये जनगणना झाली, त्याच्या पुढच्या वर्षीच, १९५२ मध्ये कुटुंबनियोजनविषयक धोरणात्मक पाऊल सरकारने उचलले. त्यावेळी देशाची लोकसंख्या छत्तीस कोटीपेक्षा अधिक होती. आता ती १४२ कोटींवर पोहोचल्याने या धोरणातील आणि कार्यवाहीतील फोलपणा उघड झाला आहे. १९६८ मध्ये हम दो, हमारे दोचा नारा दिला गेला, तरीही त्याचे गांभीर्य ना राज्यकर्त्यांना, ना जनतेला वाटले. अखेर, आणीबाणीच्या काळात, १९७६ मध्ये ४२ वी घटनादुरुस्तीद्वारे लोकसंख्या नियंत्रण व कुटुंबनियोजनावर भर दिला गेला. पुरूष नसबंदीचा अतिरेक, सक्तीने नसबंदी, विविध कर्मचाऱ्यांना नसबंदीची दिलेली उद्दिष्ट्ये यामुळे

देशभर संतापाची लाट पसरली होती. मात्र त्या काळात लोकसंख्या नियंत्रणाला मदत झाली होती, हेही वास्तव आहे. याबद्दल त्या काळी काँग्रेस नेते संजय गांधींवर सडकून टीका झाली होती. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी वीस कलमी कार्यक्रमातही या उपक्रमावर भर दिला होता. मात्र, आणीबाणीतील आततायीपणे राबवलेल्या कुटुंबनियोजनाच्या प्रक्रियेला नंतर काहीशी खीळ बसली. दोन दशके त्याविषयी ब्रदेखील काढला गेला नाही. १९९१ मध्ये देशात सत्तेवर आलेल्या पीव्ही नरसिंहराव सरकारने पुन्हा या विषयाला हात घातला. नंतर जनतेतूनच उत्सफूर्तपणे कुटुंबनियोजनाला प्रतिसाद वाढत गेला. या सगळ्या प्रयत्नाचा परिणाम म्हणून १९५० मध्ये असलेला जननदर सहावरून नंतर चार, तीन आणि आता दोनवर स्थिरावला आहे. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन अशा सगळ्या धर्मातील जननदर घटलेला आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. देशाच्या दक्षिणेतील राज्यात दोनच्याखाली तर उत्तरेतील राज्यात दोन ते तीन दरम्यान जननदर आहे. जननदर म्हणजे एका महिलेने जन्माला घातलेली बाळे. अलीकडच्या आकडेवारीनुसार, ग्रामीण आणि शहरी भागात हा दर २.१ आणि १.५ अनुक्रमे आहे. वीस वर्षांपूर्वी तो ३.७ आणि २.७ अनुक्रमे होता.

**का वाढतो जननदर**

खरे तर शैक्षणिक उन्नती, आर्थिक स्तर, सामाजिक पुढारलेपण, महिलांचे सक्षमीकरण, सशक्तीकरण यांचा आणि लोकसंख्या वाढ यांचा अन्योन्य संबंध आहे. त्याबरोबरच लोकसंख्या नियंत्रणाचे पटलेले महत्त्व, त्याची उपयुक्तता, कुटुंबनियोजनात असलेली आघाडी, संततीनियमनाच्या साधनांचा वापर, त्यात पुरूषाबरोबरच महिलेला असलेले स्वातंत्र्य आणि त्याचा आदर यात ज्यांनी आघाडी घेतली ते जननदर घटवण्यात आघाडीवर आहेत. उदा. दक्षिणेतील केरळ, तमिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र या राज्यात शैक्षणिक आणि सामाजिक प्रगती झाली, त्याद्वारे आर्थिक स्तर उंचावला गेला. देशाच्या तुलनेने बालविवाहाचे प्रमाण कमी झाले आणि स्वाभाविकच जननदर घटलेला दिसतो. कुठल्याही शहरी भागात लोकसंख्या नियंत्रणात आघाडी दिसते. त्या तुलनेत बिहार, झारखंड, राजस्थान, उत्तर प्रदेश या राज्यात शिक्षणाचा अभाव, मोठ्या प्रमाणात गरिबी, महिलांचे शैक्षणिक आणि रोजगार याबाबतचे मागासलेपण यामुळे तेथे जननदर आजही अधिक आहे. त्यातही समाजातील मागास जाती, दलित, आदिवासी, अल्पशिक्षीत मुस्लिम समाज यामध्ये सरासरीपेक्षा अधिक जननदर आढळतो. याशिवाय, पारंपरिक, बुरसटलेली विचारसरणी, अंधश्रद्धा, धर्माच्या संख्यात्मकतेच्या अनाठायी भीतीपोटी जननदर वाढवण्यासाठी केली जाणारी आवाहने यामुळेही लोकसंख्यावाढ दिसते. एकमात्र खरे की, १९७१-१९९८ या कालावधीत लोकसंख्यावाढीचा वेग २४.७वरून २००१-२०११ या कालावधीत १७.७वर आलेला आढळतो. २०११मध्येच आपण लोकसंख्येबाबत एक अब्जचा टप्पा ओलांडला होता.

**भविष्यात काय करावे**

लोकसंख्येबाबत आपण आता जगात पहिल्या क्रमांकावर आहोत, हे वास्तव आता स्वीकारले पाहिजे. लोकसंख्या विस्फोट, ब्रेन ड्रेन अशा चर्चेत न अडकून पडता, या मनुष्यबळाचा खुबीने वापर करत देशाची आर्थिक प्रगती साधणे, त्याच्या बळावर वैश्विक शक्ती म्हणून देशाला नावारुपाला आणणे यावर धोरणकर्ते, राज्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील धुरिणांनी प्रयत्न केले पाहिजेत. त्यातील काही महत्त्वाच्या बाबी अशा –

**कौशल्यविकास** : नवे शैक्षणिक धोरण देशाने स्वीकारले आहे. त्यात अनुभवाधारित, प्रकल्पाधारित शिक्षण, थेट कामाचा अनुभव तसेच शिक्षण घेतानाच त्याच्या एकूण शिक्षणक्रमात लवचिकतेचे धोरण स्वीकारले आहे. युरोपीय देशांच्या तुलनेत श्रमशक्ती आणि श्रमसंस्कृतीचा आदर करण्यात आपला समाज मागे आहे. त्यामुळेच सरकारने काही वर्षांपूर्वी सुरू केलेल्या कौशल्याधारित शिक्षणाला हवा तितका प्रतिसाद मिळताना दिसत नाही. तथापि, कौशल्यविकासाशिवाय प्रगतीची धाव घेता येणार नाही, हे लक्षात घेऊन त्या दिशेने प्रयत्न केले पाहिजेत. विशेषतः युवकांमध्ये त्याविषयी गोडी निर्माण करणे, शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात त्यावर भर देणे, त्यासाठी प्रोत्साहनपर धोरण ठरवणे याकडे लक्ष दिले पाहिजे.

**शैक्षणिक विकास** : शैक्षणिक विकास आणि रोजगारातील सहभाग तसेच देशाचे अर्थकारण यांचा निकटचा संबंध आहे. जागतिक दर्जाच्या खासगी विद्यापीठांना दारे खुली करणाऱ्या भारतात शैक्षणिक वाटचालीच्या विविध टप्प्यांवर होणारी गळती, शिक्षण अर्धवट सुटणे, पदवी किंवा कौशल्याधारित अभ्यास पूर्ण न करणाऱ्यांची संख्या तुलनेने खूप मोठी आहे. शिवाय, शिक्षणाच्या खासगीकरणाने शैक्षणिक प्रगतीतील दरी अधिक रुंदावत आहे, विशेषतः सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या घटकात या बाबी प्रकर्षाने जाणवतात. परिणामी विविध प्रकारच्या स्पर्धात्मक बाबीत, रोजगार मिळवण्यात हे घटक पिछाडीवर राहतात. त्यातून सामाजिक आणि आर्थिक मागासलेपण अधिक उठावदार होते.

**रोजगारनिर्मिती आणि मनुष्यबळाचा पुरेपूर वापर** : या दोन्हीही एकमेकांत गुंतलेल्या बाबी आहेत. जगात सर्वाधिक तरूणांचा देश भारत आहे. काही दिवसांपूर्वी मुंबईतील आठ हजार जागांसाठी सहा लाखांवर अर्ज आले होते. कोरोनोत्तर काळात रोजगारनिर्मितीत आपण हवा तसा जोर पकडू शकलेलो नाही. सरकारने दहा लाख नोकऱ्या देण्याचे जाहीर करून रोजगार मेळा सुरू केले आहेत. मात्र, गेल्या काही वर्षांत सरकारी नोकऱ्या आक्रसत चालल्या आहेत. वाढत्या मनुष्यबळाला पुरेसे रोजगार त्यातून मिळणार नाही. वार्धक्याकडे लोकसंख्या झुकलेल्या युरोप, अमेरिका खंडात तसेच जपानसारख्या आशियाई देशात कुशल मनुष्यबळाची वाणवा आहे. त्याची जागा भारतीय युवक घेऊ शकतो, तथापि त्यासाठी कुशल, कौशल्यसंपन्न हवा आहे. प्रगतीची शिखरे गाठणारा चीन असो किंवा तैवान, कोरिया त्यांनी निर्मिती क्षेत्रात केलेली प्रगती आर्थिक संपन्नतेकडे न्यायला कारणीभूत ठरली आहे. त्याबाबत आपण कोरोनानंतरच्या काळात हवी तशी झेप घेऊ शकलेलो नाही. त्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. देशातील निम्मा रोजगार शेती आणि पूरक उद्योगामधून येतो. त्यामुळे रोजगारक्षम निर्मिती उद्योगांकडे प्राधान्याने लक्ष द्यावे. सेवा क्षेत्राचा विस्तारणारा परिघ हे आशादायी चित्र आहे.

**महिला सक्षमीकरण, सबलीकरण** : कुटुंबनियोजन आणि संततीनियमन या दोन्हीही बाबतीत प्रगती ही केवळ महिला

सक्षमीकरण, सबलीकरण आणि तिच्या शैक्षणिक विकासात सामावलेली आहे. ज्या घरात महिला शिकली, कमावू लागली आणि सक्षम व सबल झाली त्या घरात पाळणा लांबला किंवा थांबला हे वास्तव आहे. त्यामुळे महिलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी असलेल्या योजना प्रभावीपणे राबवणे, बालविवाहासारख्या कुप्रथांना तिलांजली दिली पाहिजे. आज चीनमध्ये ४६ टक्क्यांवर महिला रोजगार मिळवतात, भारतात हेच प्रमाण २४ टक्के आहे. तसेच रोजगार आणि त्याचा मेहनताना देताना स्त्री-पुरूष भेद केला जातो. त्यामुळे देशाच्या आर्थिक वाटचालीत महिलांचा सहभाग वाढवणे आणि त्यासाठी त्यांचे सक्षमीकरण करणे अगत्याचे आहे.

**आरोग्य आणि कल्याणकारी योजना :** गरिबी, शैक्षणिक आणि सामाजिक मागासलेपण हे लोकसंख्या नियंत्रणातील अडथळे आहेत. त्यामुळे सरकारने कल्याणकारी योजनांची प्रभावी आखणी करणे, त्यांची तितकीच काटेकोरपणे अंमलबजावणी करणे यावर भर दिला पाहिजे. विशेषतः वाढलेल्या लोकसंख्येला दर्जेदार आरोग्यविषयक सुविधा पुरवून ती अधिक कार्यक्षम राहणे, तिच्या क्षमतांचा पुरेपूर वापर करून आर्थिक उन्नती साधणे, औद्योगिकरणाची चाके गतीमान करून अधिकाधिक उत्पादकता वाढवणे यावर भर दिला पाहिजे. त्यासाठी या पिढीच्या सर्वांगिण आरोग्याकडे विशेष लक्ष पुरवले पाहिजे. माता, बालकांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.

**सामाजिक सुरक्षेचा परीघ विस्तारावा :** देशात संघटीत क्षेत्रापेक्षा असंघटीत क्षेत्रात रोजगार मोठ्या प्रमाणात आहे. गेल्या काही वर्षांत गीग इकॉनॉमी झपाट्याने वाढत आहे. देशातील जनतेचे जीवनमान उंचावणे, त्यांना संपन्न आरोग्य लाभणे हेदेखील देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने नितांत गरजेचे आहे. ज्या जनतेत अनारोग्य त्या देशाचा विकासाचा आलेख खुंटला हे वास्तव आहे. हे लक्षात घेऊन अधिकाधिक घटकांना सामाजिक सुरक्षेचे कवच कशा प्रकारे देता येईल, त्यासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन तो कार्यवाहीत आणला पाहिजे. आरोग्याची हमी देण्यासाठी राजस्थान सरकारने उचललेले पाऊल किंवा केंद्र आणि राज्याच्या मदतीने आरोग्याच्या खर्चाची होणारी तरतूद हे त्याचे उदाहरण आहे.

**लैंगिक गुणोत्तर, विवाहेच्छुकांचे प्रश्न :** स्त्रीभ्रूण हत्या आणि मुलगी म्हणजे जोखीम, जबाबदारी, तसेच वंशाचा दिवा म्हणजे मुलगा या मानसिकतेतून समाजाला बाहेर काढले पाहिजे. पुरूषांच्या तुलनेत काही भागात, समाजात आणि घटकात महिलांचे प्रमाण कमी आहे, ही चिंतेची बाब आहे. काही दिवसांपूर्वी विवाह ठरत नाहीत, मुली मिळत नाही म्हणून लग्नाळू पुरूषांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे नेऊन या गंभीर समस्येकडे लक्ष वेधून घेतले होते. त्यामुळे या गंभीर समस्येवर तोडगा निघण्यासाठी अधिक कठोर पावले उचलली पाहिजेत. सरकारने मुलींचे शिक्षण, त्यांच्या वयाच्या विविध टप्प्यांवर आर्थिक आणि साधनांची मदत अशा उपाययोजना केल्या आहेत. तथापि, सामाजिक प्रबोधन आणि समाजाला अधिकाधिक त्याबाबत प्रवृत्त करणे हाच यावर उपाय आहे.

**शहरीकरण, सुविधांवर ताण :** महाराष्ट्रातील ४५ टक्के नागरी जीवन जगत आहे. ग्रामीण भागातील घटता रोजगार शैक्षणिक व आर्थिक जीवनमान उंचावण्याची आस आणि त्यामुळे वाढणारे स्थलांतर यामुळे नागरीकरणाचा वेग वाढत आहे. परिणामी, शहरांचे बकालीकरण, झोपडपट्ट्यांची संख्या वाढत आहे. स्वाभाविकच पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, वाहतूक, मूलभूत पायाभूत सुविधांची उपलब्धता, आरोग्य व शैक्षणिक सुविधा अशा सगळ्यांवर ताण येत आहे. त्याची पुरेपूर आणि गुणवत्तपूर्ण उपलब्धता करून देताना नियोजनकर्ते, सरकारी यंत्रणा आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांची तारांबळ उडते. त्यामुळे शहरीकरणाचा रेटा रोखायचा असेल, तर ग्रामीण आणि निमशहरी भागात जीवनावश्यक मूलभूत सुविधा दर्जेदार स्वरुपात उपलब्ध करून देण्यावर कटाक्ष हवा.

**पर्यावरण, शेती, अन्नधान्याचे प्रश्न आणि जंगल :** लोकसंख्यावाढीचा ताण अन्नधान्यापासून ते सर्व मूलभूत सोयी-सुविधांवर ताण येत असतो. परिणामी, जंगलाखालील क्षेत्र घटणे, शेतीखालील जमीन वाढणे, अन्नधान्याचे पुरेसे उत्पादनासाठी नवनवीन वाण, जाती विकसीत करणे, त्यासाठी रासायनिक किटकनाशके, खते यांचा वापर वाढतो. हे आव्हानही पेलण्यासाठी आपल्याला सज्ज राहावे लागेल.

**लोकसंख्या नियंत्रणाचे आव्हान :** आपले जीवनमान उंचवावे, पुढच्या पिढीचे भवितव्य अधिक उज्ज्वल असावे, असे वाटणे स्वाभाविक आहे. त्यासाठी कुटुंबनियोजन आणि संततीनियमन हेच उपाय आहेत. आजही आपल्या समाजात लैंगिकतेच्या मुद्दावरून चर्चा करणे, संततीनियमनाची साधने वापरणे, बाजारातून ती खरेदी करणे याबाबत भिडस्तपणा किंवा टाबू आढळतो. रघुनाथराव कर्वे नी ते लक्षात घेऊनच संततीनियमनाबाबत जागृतीवर भर दिला होता. लैंगिक समस्यांवर खुली चर्चा त्यांच्या नियतकालिकातून घडवून आणत होते. शंभर वर्षांपूर्वी त्यांनी दाखवलेला द्रष्टेपणा आजही नितांत गरजेचा आहे. कुटुंबनियोजनाच्या शस्त्रक्रिया करून घेणे ही महिलेची जबाबदारी आहे, या मानसिकतेतून पुरूष मंडळी बाहेर पडली पाहिजे. त्यांचा टक्का वाढला पाहिजे. संततीनियमनाच्या साधनांची पुरेपूर आणि रास्त दरात उपलब्धता, ती वापरण्यास प्रवृत्त करणे यावर भर दिला पाहिजे.

लोकसंख्येचा आणि त्यातही तरूण लोकसंख्येचा फायदा उठवत देशाला आर्थिक, सामाजिक प्रगती साधत जगात मुसंडी मारण्याची संधी निर्माण झालेली आहे. व्यापारी दृष्टीकोनातून पाहता भारत ही जगातील तमाम उत्पादकांसाठी खूपच मोठी बाजारपेठ आहे. त्यांनी जगाच्या अन्य भागात उत्पादीत केलेला माल देशाच्या बाजारपेठ विकण्याऐवजी त्यांना भारतातच कारखाने सुरू करण्याला प्रवृत्त केले पाहिजे. इथल्या युवकांना रोजगाराच्या संधी त्यातून उपलब्ध होतील. त्यासाठी येथील युवक शैक्षणिक आणि कौशल्यविकासात आघाडीवर राहण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. अशा सगळ्या प्रयत्नांची सांगड घातली गेली तर भारत ही लोकसंख्येच्या बळावर महाशक्ती म्हणून उदयास येईल. मात्र याच प्रचंड लोकसंख्येचा गुणात्मक फायदा न उठवता संख्यात्मक शक्तीचा अपव्यय केला गेला, तर इतिहास आणि आगामी पिढ्यादेखील धोरणकर्ते, राज्यकर्ते आणि विद्यमान पिढीला माफ करणार नाही, हेही तितकेच खरे. ●●●

**(लेखक समकालीन विषयाचे अभ्यासक आहेत.)**

# निसर्गाचा विध्वंस थांबवा...



प्रा. एच.एम. देसरडा

**४६० कोटी वर्षे आयुर्मानाच्या या पृथ्वीग्रहावर मागील दीड-दोन शतकांत अशी स्थिती का ओढवली. खरं तर, आजवर अनेक स्थित्यंतरे झाली, युगे आली-गेली (हीम, तांब्र, लोह) मात्र उत्क्रांतीच्या क्रम व कालौघात जी जीवसृष्टी विकसित झाली त्या विलक्षण, वैविध्यपूर्ण जीवरुप व जीवनाला एवढे अस्तित्वसंकट कशामुळे ओढवले? जगभरच्या शास्त्रज्ञांनी निसर्ग व्यवस्थेतील अविवेकी, अनाठायी हस्तक्षेपाचा जो शोधबोध घेतला त्याद्वारे हे सिद्ध होते, की सध्याच्या मानव वर्चस्ववादी (अन्थ्रपोसिन) वृत्तीप्रवृतीचा हा प्रभाव आहे. दिशाहीन व भेदरहित वाढवृद्धीचा (ग्रोथ) हा परिपाक असून तंत्रज्ञानाचा कैफ चढवून निसर्गावर हुकूमत गाजवण्याचा हा अटळ परिणाम आहे.**



५ जून हा दिवस जगभर 'पर्यावरण दिन' म्हणून पाळण्यात येतो. या निमित्ताने संयुक्त राष्ट्र संघटना, देशोदेशींची सरकारे, शैक्षणिक, पर्यावरणीय व अन्य संस्था पर्यावरण रक्षण-संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करतात. पन्नास वर्षांहून अधिक काळ याविषयी जगभरचे शास्त्रज्ञ, समाजधुरीण, विचारवंत गांभीर्याने लिहीत व बोलत आहेत. कारण की ही गेली अनेक दशके जगाला भेडसावणारी अव्वल समस्या आहे. त्यामुळे जगातील सुज्ञ, संवेदनशील लोक याविषयी चिंतित असून आर्थिक वाढवृद्धी, विकास, तंत्रज्ञानाचा मुळातून फेरविचार करत आहेत. निसर्ग, मानव व समाजाचे परस्परावलंबन, संस्कृतीचे प्रयोजन याविषयी सखोल चिंतन, मनन, प्रयोग करत आहेत. खचितच हे अत्यंत प्रेरणादायी आहे.

**विसंगती, विरोधाभास :**

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या अफाट विस्तार, नवनवीन आविष्कारामुळे भौतिक वस्तू व सेवासुविधांचा पसारा अचाट वाढला असून मानवी जीवन अधिक सुखासीन, यंत्रप्रधान बनले आहे. गत शंभर सव्वाशे वर्षांत जेवढी यंत्रे, तंत्रज्ञान उपलब्ध झाले, ज्या खनिज अथवा जीवाश्म इंधनाधारित (कोळसा, तेल, वायू) ऊर्जा साधनांमुळे त्यास गती व व्याप्ती मिळाली, त्यातून पृथ्वीचे तापमान वाढून हवामानात लक्षणीय बदल होऊ लागला. याचा धोका स्पष्ट दिसत असला, तरी सुखसुविधांचे (स्पष्ट शब्दात चैनचंगळीचे) आकर्षण एवढे विलक्षण होते आणि आजही आहे. ज्या कुणाला सत्तासंपत्तीचे बळ आहे ते मोटारगाडी असो, की अन्य तंत्रसंरजाम तो सोडायला तयार नाही! परिणामी, जग हवामानबदल ते हवामान अरिष्ट कडेलोटावर येऊन ठेपले आहे. याचा प्रत्यय जगभर येत असून, येणारे प्रत्येक वर्ष अधिकाधिक उष्ण, अवकाळी, भीषण आपत्तीचे होत जीवसृष्टीला धोका आहे. अर्थात, करे कोई, भरे कोई!

**निसर्गावर हुकुमत गाजवण्याचा अहंकार :**

होय, एक फार मोठे कोडे आहे, की ४६० कोटी वर्ष आयुर्मानाच्या या पृथ्वीग्रहावर मागील दीड-दोन शतकांत अशी स्थिती का ओढवली. खरं तर, आजवर अनेक स्थित्यंतरे झाली, युगे आली गेली (हीम, तांब्र, लोह) मात्र उत्क्रांतीच्या क्रम व कालौघात जी जीवसृष्टी विकसित झाली त्या विलक्षण, वैविध्यपूर्ण जीवरुप व जीवनाला एवढे अस्तित्वसंकट कशामुळे ओढवले? जगभरच्या शास्त्रज्ञांनी निसर्ग व्यवस्थेतील अविवेकी, अनाठायी हस्तक्षेपाचा जो शोधबोध घेतला त्याद्वारे हे सिद्ध होते, की सध्याच्या मानव वर्चस्ववादी (अन्थ्रपोसिन) वृत्तीप्रवृतीचा हा प्रभाव आहे. दिशाहीन व भेदरहित वाढवृद्धीचा

(ग्रोथ) हा परिपाक असून तंत्रज्ञानाचा कैफ चढवून निसर्गावर हुकुमत गाजवण्याचा हा अटळ परिणाम आहे. कितीही अप्रिय वाटले, तरी हे कटू सत्य आहे. बुद्धांपासून गांधींपर्यंतच्या भारतीय तसेच रस्कीन, थोरो, टॉलस्टॉय या तत्त्वज्ञांनी मानवजातीला वेळोवेळी या धोक्याविषयी समज दिली; नि:संदिग्ध शब्दांत हावहव्यासाला मर्यादा घालण्याविषयी बजावले आहे. १९५० व ६० च्या दशकात राचेल कार्सन यांनी याविषयी रसायन व तंत्रज्ञानमस्त जगाच्या डोळ्यात अंजन घातले. त्यांना आधुनिक पर्यावरणीय चळवळीचे जनक, उद्गाता मानले जाते. सखोल वैज्ञानिक संशोधनाद्वारे त्यांनी मानवाला निसर्ग नियंत्रणाचा (कंट्रोलिंग, नेचर) वृथा दंभ सोडून निसर्गाचे मर्म, जीवनधर्म आत्मसात करण्याची शिकवण दिली. पर्यावरणाविषयी आस्था असणाऱ्या प्रत्येकाने त्यांचे अभिजात लिखाण, विशेषत: 'सायलेंट स्प्रिंग' हे पुस्तक वाचले पाहिजे. म्हणजे कळेल, की विज्ञान-तंत्रज्ञानाचा कैफ चढवून आपण निसर्गाचा विध्वंस करण्याला विकास मानतो!

**पर्यावरण दिनाचे बाष्कळ सोपस्कार :**

१९७२ साली इंदिरा गांधींनी स्टॉकहोम येथील जागतिक पर्यावरण परिषदेत केलेल्या भाषणाची जगाने नोंद घेतली. आपल्या देशात दरवर्षी सरकार दरबारी 'पर्यावरण दिन' हिरिरीने साजरा केला जातो. पर्यावरण विभाग प्रदूषण (नियंत्रण) मंडळ पानपानभर जाहिराती देऊन (प्रधानमंत्री, मुख्यमंत्री, सचिवांचे फोटो आदी) बाकीचे ३६४ दिवस अहोरात्र 'विकासप्रकल्प' (?) राबवण्याचे कार्य करत असतात. मोदीजी आंतरराष्ट्रीय परिषदांत पर्यावरणाचे पंचामृत वाटतात! तेथे असताना व परत येताना बुलेट ट्रेन, रिफायनरी, अणूऊर्जा, रासायनिक उद्योगाविषयीचे करारमदार पुरे करून येतात! एवढेच काय, अत्याधुनिक शस्त्रास्त्रे खरेदी करण्याचे गोपनीय करार करून येतात. महात्मा गांधींचा देश (भारत) जगातील सर्वाधिक शस्त्रास्त्रे खरेदी करणारा देश आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने सर्वात नामुष्कीची व हानीकारक बाब म्हणजे आपण दरवर्षी दहा ते बारा लाख कोटी रुपयांचे इंधनतेल आयात करतो. भरीस भर म्हणजे दरवर्षी हजारेक टन सोने आयात करतो. हाच का आत्मनिर्भर भारत?

**नैसर्गिक संसाधनांची धूळधाण :**

वसाहतिक काळापासून आमच्या वन व खनिज संपत्तीची लूट (गोंडस नाव निर्यात) व बरबादी केली जात होतीच. स्वांतत्र्योत्तर काळात त्यास उधाण आले. सांप्रती भारताची जमीन, वने, कुरणे, खनिजे यांची फार प्रचंड प्रमाणात वाताहत झाली. याखेरीज पर्वत, टेकड्या, नद्या व समुद्रकिनारे यांची कमालीची धूळधाण झाली आहे. भारताच्या एकूण भौगोलिक क्षेत्रफळापैकी सुपिक शेतजमीन, वनजमीन, कुरणक्षेत्र, वने, गायराने आदी निसर्गसंपदा अवनत, उद्ध्वस्त झाली आहे. चांगल्या घनतेचे वनक्षेत्र एकूण भौगोलिक क्षेत्राच्या दहा टक्केदेखील नाही, असे अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अहवालात मांडले गेले आहे. पर्यावरणीय संतुलनासाठी किमान एकतृतीयांश क्षेत्र चांगल्या वनाखाली असले पाहिजे! ही बाब सर्वश्रुत आहे, की वने, वृक्षाच्छादन म्हणजे प्राणवायूचा स्त्रोत, सोबतच ते कर्बोत्सर्जन शोषून घेण्याचे महत्त्वाचे साधनदेखील आहे. असे असताना भारतातील वनांची स्थिती इतकी दयनीय असणे नक्कीच



धोकादायक आहे. महाराष्ट्रात वनांची स्थिती यापेक्षा कितीतरी अधिक चिंतनीय आहे. गावोगावच्या डोंगरटेकड्या, सातपुडा, सह्याद्री ते पश्चिमघाट सर्वत्र वनांची, पहाडांची स्थिती अत्यंत विदारक आहे. मुख्य म्हणजे निसर्ग वने, झाडझाडोरा कुठेतरी पर्यटनस्थळी जाऊन अनुभवण्याची बाब नसून सर्वत्र निसर्ग-व्यवस्था जोपासली पाहिजे. तरच मानव व वसुंधरेचे जैवनाते कायम राहील.

**विश्लेषणातून कृतीकडे :**

प्रचलित वाढवृद्धीप्रवण चैनचंगळवादी विकासप्रक्रियेचा संचयी व चक्राकार परिणाम म्हणजे समस्त प्राणीमांत्रांच्या जीवनाचा मूलाधार असलेली नैसर्गिक संसाधने कमकुवत व बरबाद झाली आहेत. मुख्य म्हणजे, चरितार्थ, रोजगार व उत्पन्नाचे साधन असलेली जमीन, वने, जलस्त्रोत, कुरणे, पशूधन, वन्यजीव यांची संख्या व गुणवत्ता ढासळल्यामुळे शेतकरी, कोळी, वनात राहणारे यांची भरणपोषणाची स्थिती खालावली आहे. ते पर्यावरणाचे निर्वासित बनले असून स्थलांतर करण्यास मजबूर आहेत. परिसंस्थेवर अवलंबून असलेले हे जनसमुदाय देशोधडीला लागण्याचे मुख्य कारण त्यांच्या निसर्गव्यवस्थेची झालेली लूट व बरबादी हे आहे. परिणामी लाखो शेतकरी व श्रमजीवी लोकांवर आत्महत्या करण्याची नौबत आली.

आजमितीला तब्बल शंभर कोटी (एक अब्ज) भारतीय दैन्यावस्थेत आहेत. याचे मुख्य कारण त्यांच्या निसर्गाची, जीवनसाधनांची झालेली अक्षम्य लूट, हेळसांड, बरबादी हे आहे. तात्पर्य, त्यांच्या भरणपोषण व योगक्षेमासाठी त्यांच्या जल-जंगल-जमीन आणि जैवविविधता याचा ऱ्हास थांबवून त्याचे संवर्धन करण्यासाठी संसाधन, जोपासना व नवीनीकरण कार्यक्रम हाती घेतला जावा. मनरेगाद्वारे हे करण्याची संस्थात्मक कायदेशीर तरतूद, वित्तीय व प्रशासकीय व्यवस्था उपलब्ध आहे. कोविड महामारीनंतर गावी परत आलेल्या दोन कोटींहून अधिक मजुरांना या योजनेने आधार दिला. गेली काही वर्षे किमान दहा कोटी कुटुंबे या योजनेचा लाभ घेतात. अर्थात, योजनेचा रोजगार केवळ शंभर दिवस एवढा मर्यादित आहे. तो वर्षभर उपलब्ध करून लघु पाणलोटक्षेत्र विकासाशी त्याची सांगड घातल्यास भारतातील निसर्गव्यवस्था बळकट व संपन्न करता येईल. पर्यावरण दिनी याचा सर्वंकष विचार करून तो कार्यान्वित करणे संयुक्तिक होईल.

**विकासप्रणाली, जीवनशैलीत आमुलाग्र बदल :**

विकासाच्या ज्या पाश्चिमात्य प्रारुपाचे (युरोप-अमेरिकेचा बाजारवादी भांडवली असो, की रशिया-चीन राज्य भांडवली) जे अंधानूकरण भारत व तिसऱ्या जगातील इतर देश करत आहेत. ते विकास प्रारूप (ग्रोथ मॉडेल) निसर्गाला कच्चा मालाचे कोठार मानते. तंत्रज्ञानाच्या साह्याने ते ओरबाडणे हाच विकास, पुरूषार्थ! निसर्ग ही एक सजीव व्यवस्था असून ती केवळ एकट्या मानवासाठी नाही तर समस्त जीवसृष्टीसाठी आहे, अशी मानव वर्चस्ववादी (न्थ्रोपोसेंटरिक) भूमिका जगातील सत्ताधीश व धनदांडगे घेतात. निसर्गकेंद्री समाजव्यवस्थेत निसर्गाविषयी पूज्यभाव हेच जीवनाचे अधिष्टान मानले जाते. मात्र, बाजारव्यवस्थेने निसर्ग, नैसर्गिक संसाधने ही क्रयवस्तू बनवली. आम्ही कायदा, लोकशाही, संविधान मानणारे असल्यामुळे कुणाचीही जमीन विनामोबदला घेणार नाही. मुळातच व्यक्तिगत मालकी म्हणजे चोरीच आहे, असे प्लाटोपासून गांधी-विनोबांपर्यंत सर्वांचे मत आहे. या संदर्भात एका ऐतिहासिक उदाहरणाची प्रकर्षाने आठवणे होते. अमेरिकेच्या मूळ रहिवाशांच्या प्रमुखाने (चिफ सियाटल) 'मावेजा घेऊन जमिनी आम्हाला द्या' या अमेरिकन अध्यक्षाच्या प्रस्तावाची जी खिल्ली उडवली ते फार प्रगल्भ उदाहरण आहे. निसर्गसंपदा, सर्व जीवसृष्टी सामाईक धरोवर आहे. त्याऐवजी सध्याची जी संपत्तीमालकी धारणापद्धती आहे आणि तीच मूलत: कारणीभूत आहे सध्याच्या हवामान अरिष्टास. सबब, सध्याची विकासप्रणाली व जीवनशैली यात आमूलाग्र बदल, ही निसर्ग रक्षण व संवर्धनाची प्रमूख गरज आहे. वैश्विक सामाईक संसाधने (ग्लोबल कॉमन्स) ही संकल्पना तत्त्वत: आणि प्रत्यक्षात अमलात आल्याखेरीज तापमानवाढ १.५ अंश सेल्सियसच नाही, तर २.० अंशावरदेखील रोखणे सुतराम शक्य नाही. हे तापमानवाढीचा सध्याचा वेग स्पष्ट सांगते. म्हणून आता कालापव्यय न करता पर्यावरण रक्षण-संवर्धनाची कृती आता व येथे (नाऊ ॲन्ड हेयर) केल्याखेरीज गत्यंतर नाही.

**परिस्थितीकी पदचिन्ह नीतिमत्ता :**

जे लोक मोटारीसह सर्व आधुनिक संसाधने (मोबाईल फोन सोडून) त्यांनी आपले उत्सर्जन, परिस्थितीकी पदचिन्ह (इकॉलॉजिकल फुटप्रिंट) मोजणे, त्याच्या कमी करण्यासाठी प्रयत्न करणे हा २१ व्या शतकाचा युगधर्म आहे. पर्यावरणाशी इमान राखत प्रत्येकाने पृथ्वीकडून घेण्यादेण्याचा हिशेब संतुलित करावा. रसायनविरहीत (विषमुक्त) खाद्यान्नासाठी स्वत: जैवउत्पादन व अन्न श्रम (ब्रेडलेबर) करणे ही पर्यावरणीय लोकशाही (इकॉलॉजिकल डेमोक्रसी) आज काळाची आद्य गरज आहे. निसर्गाचे नाणे (चलन) पंचतत्त्व व श्रमआधारित आहे. विनोबा म्हणायचे 'पैसा लफंगा है'. तोच तर कारणीभूत आहे आजच्या भ्रष्ट राजकारण व अर्थकारणास. या विळख्यातून सुटकेसाठी निसर्गाचे रक्षण-संवर्धन हाच विकासाचा पाया मानून उत्पादन, उपभोग व विनिमयव्यवस्थेत मूलभूत परिवर्तन करणे नितांत गरजेचे आहे. फक्त पर्यावरण दिनीच नव्हे, तर ३६५ दिवस याची जाण बाळगावी. •••

**(लेखक विख्यात अर्थतज्ज्ञ असून महाराष्ट्र नियोजन मंडळाचे माजी सदस्य आहेत.)**

# असंविधानिकतेने 'संविधानिक' सरकार! आणि लोकनियुक्त सरकार

**(पान १८ वरून)**

दावं कसं आमच्याच हाती आहे, हे पुन्हा एकवार सिद्ध करून दाखवलं.

इतका धार्मिक, असंविधानिक उन्मादी उच्छाद घालूनही समाधान होईना तेव्हा काँग्रेसमध्ये कलागती लावण्याचा प्रयत्न झाला. राहुल विरूद्ध मोदी असा डाव रचण्याचा प्रयत्न झाला. पण पाच वर्षांतला ४०% कमिशनचा कारभार व पेसीएम हा विरोधकांचा प्रचार जनतेला पटत गेला व मतदानोत्तर चाचण्यांत चित्र स्पष्ट व्हायला लागले, तसे भाजपचे धाबे दणाणले. ते जेडीएसकडे आशेने पाहू लागले. पण सारे व्यर्थ. पंतप्रधानांनी तळ ठोकूनही अनपेक्षित दारूण पराभव पत्करावा लागला. 'ऑपरेशन लोटस' वगैरे पुढील पाच वर्षांसाठीही विसरा असाच कौल आला!

भारत जोडो यात्रा मतात परिवर्तीत होईल काय, या खोचक प्रश्नाचे उत्तर जनतेने परस्पर दिले. यात्रा हा एकच निकष नव्हे, तर बोकाळलेला भ्रष्टाचार, धार्मिक ध्रुवीकरण, दुधाच्या व्यापाराचेही राजकारण आणि काँग्रेस सत्तेत आली तर दंगली घडतील, मुसलमानांना आरक्षण मिळेल हे केंद्रीय गृहमंत्र्यांचे इशारे दुर्लक्षित करत कर्नाटकच्या हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन धर्मियांनी व ब्राह्मणांसह लिंगायत, वोक्कलिगा, दलित जाती व मुख्यत: स्त्रियांनी भाजपला चांगलाच धडा शिकवला!

मल्लिकार्जून खरगे पक्षाध्यक्ष झाल्यावर हिमाचलनंतरची काँग्रेसची ही दुसरी घरवापसी. त्यात कर्नाटक ही खरगेंची जन्म व कर्मभूमी. त्यांनी उमेदवार निवड, प्रचार, प्रसार याचे कसोशीने नियंत्रण केले. त्यांच्या 'विषा'वरील विधानाचा विषप्रयोग भाजपने करून पाहिला. पण खरगेंनी जालिम उतारा देत विजयपश्चात सरकार स्थापनेतील तिढा गांधी कुटुंबाला आवश्यक तितकाच सहभाग घेऊ देत स्वत:च त्यातून मार्ग काढला. खरगेंचे हे गृहराज्यातील पक्षांतर्गत यश त्यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदात आणखी एका यशाचा तुरा खोवून गेले.

सत्तेत येताच पहिली पाच आश्वासने पूर्ण करत काँग्रेसने सुरुवात चांगली केलीय. पुढे लोकसभा निवडणुकीपर्यंत जनतेचा हा विश्वास वाढवत लोक विधानसभेचा व लोकसभेचा स्वतंत्र विचार करतात या अलिखित गृहीतकास खोटे ठरविण्याची संधी काँग्रेसला मिळालीय. कर्नाटकसह आगामी विधानसभा निवडणुका होणारी राज्ये व त्यापाठोपाठच्या लोकसभा निवडणुकांत ही संधी साधून मागील आठ-दहा वर्षांत सुरू असलेला असंविधानिक, लोकशाहीविरोधी उन्मादाचा राजकीय पराभव करून देशाला अरिष्टातून वाचवावे, हीच प्रामाणिक मतदारांची अपेक्षा आहे. •••

**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**

# असहमतीचे रंग : तिसरा डोळा असलेल्या कवीची कविता



डॉ. सूर्यनारायण रणसुभे

**संत तुकारामदेखील याच शस्त्राने व्यवस्थेशी झगडत होते. या व्यवस्थेचे जे जे पाश आहेत, जी जी चुंबकीय क्षेत्रे आहेत ज्यामुळे सामान्य माणूस फसतो; त्यास शोधून, त्याचे खरे रूप उलगडून दाखवत त्याबद्दलची आपली असहमती व्यक्त करीत जाणे, त्यांच्या षड्यंत्राना उघड करीत जाणे ही संवेदनशील कवीची नैतिक जबाबदारी असते. अर्थात, अशाच संवेदनशील कवींची, ज्यांची बांधिलकी सामान्य माणसांच्या व्यथा-कथांशी असते. या अंगाने पळवेकरांनी आपली ही भूमिका येथे प्रामाणिकपणे पार पाडलेली आहे.**

'साहित्य' या संकल्पनेसंबंधी आपल्याकडे एक मतप्रवाह असा आहे, की साहित्य ही एक स्वायत्त अशी धारणा आहे. तिच्या स्वायत्ततेत कसल्याही प्रकारची ढवळाढवळ करता कामा नये. कारण ती एका व्यक्तीच्या अभिव्यक्तीशी संबंधित आहे आणि व्यक्तीची ही अभिव्यक्ती स्वायत्त व स्वतंत्र अशीच असते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे साहित्य ही वैयक्तिक अशी बाब आहे. समाज-व्यवस्था, सत्ता आदींशी तिचा कसलाच संबंध नसतो. साहित्याच्या स्वायत्ततेसंबंधी बरेच वादविवाद असले तरी ही वस्तुस्थिती आहे, की जगातील कोणताही माणूस हा कधीच स्वायत्त नसतो! कारण तो ज्या व्यवस्थेत जन्म घेत असतो, त्या व्यवस्थेशी त्याची नाळ घट्टपणे बांधली गेलेली असते. जन्मानंतर ती जरी तोडण्यात आलेली असली, तरी मुला-मुलीत जसे आई-वडिलांचे जीन्स येतात अगदी त्याचप्रमाणे त्याच्या अभिव्यक्तीत 'व्यवस्था' प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे येतच असते. जाण-ते-अजाणतेपणाने का होईना, ती तेथे येतेच. अभिव्यक्ती कितीही काल्पनिक जरी असली, तरी त्या कल्पनेच्या दुनियेचा त्याच्या समकालाशी संबंध असतोच. हा संबंध सहमतीचा की असमतीचा, हा कळीचा प्रश्न आहे. हे सर्व आठवण्याचे कारण म्हणजे, अशोक नामदेव पळवेकरांच्या 'असहमतीचे रंग' या काव्यसंग्रहातील १०० कविता. या कविता ३०-३२ अशा वेगवेगळ्या आशयाशी संबंधित आहेत.




कवीने संग्रहाच्या अगदी सुरुवातीला जगप्रसिद्ध इतिहासकार रोमिला थापर यांचे एक वाक्य उद्धृत केलेले आहे. 'असहमती ही काही आधुनिक काळातील संकल्पना नाही; परंतु असहमतीचे विविध आकृतिबंध ओळखणे ही गोष्ट मात्र या काळासाठी नवीन आहे'. विशेष म्हणजे, पळवेकरांनी या असहमतीचे विविध आकृतिबंध बरोबर ओळखलेले आहेत आणि त्यामुळे त्यांच्या या संग्रहातील जवळपास ८० कविता या असहमतीचे विविध आकृतिबंध व्यक्त करतात.

असहमतीचे हे वेगवेगळे रंग कशासाठी? ते कोणासाठी? या असहमतीची गरज काय? तर त्याचे उत्तर असे, की ज्यावेळी कोणत्याही देशा-तील सामाजिक व आर्थिक व्यवस्था ही सामान्य माणसाचे जगणे अवघड करून टाकते, त्याला देशोधडीला लावते, त्यावेळी त्या व्यवस्थेविरुद्ध संवेदनशील कवी आपली अस्वस्थता ही कवितेतून व्यक्त करीत असतो. कारण त्याच्याजवळ शब्द हेच शस्त्र असतात.

संत तुकारामदेखील याच शस्त्राने व्यवस्थेशी झगडत होते. या व्यवस्थेचे जे जे पाश आहेत, जी जी चुंबकीय क्षेत्रे आहेत ज्यामुळे सामान्य माणूस फसतो; त्यास शोधून, त्याचे खरे रूप उलगडून दाखवत त्याबद्दलची आपली असहमती व्यक्त करीत जाणे, त्यांच्या षड्यंत्राना उघड करीत जाणे ही संवेदनशील कवीची नैतिक जबाबदारी असते. अर्थात, अशाच संवेदनशील कवींची, ज्यांची बांधिलकी सामान्य माणसांच्या व्यथा-कथांशी असते. या अंगाने पळवेकरांनी आपली ही भूमिका येथे प्रामाणिकपणे पार पाडलेली आहे.

प्रस्थापित व्यवस्था ही सर्वसामान्य माणसांच्या हितासाठी काम करीत नाही. विशेषत: या देशात २०१४ नंतर ज्या विचारधारेची मंडळी सत्तेत आलेली आहेत, त्या मंडळीच्या कटकारस्थानाची इत्थंभूत माहिती हा कवी देत जातो. त्याच्यावर भाळलेल्या सर्वांना भविष्यातील धोक्याचा इशारा करीत जातो. सर्वसामान्यांना मूर्ख बनवण्यासाठी ही मंडळी धर्माचा, ईश्वराचा वापर आपल्या कुटील राजकारणासाठी करीत आहेत. त्यामुळे धर्म आणि ईश्वर यांना बऱ्याच वेळा नाकारणे अपरिहार्य होऊन जाते.

या काव्यसंग्रहातील कविता विभिन्न अशा आशयाशी संबंधित आहेत; पण या सर्व आशयाच्या मुळात कवी पळवेकर ज्या व्यवस्थेत, ज्या समकालात जगत आहेत त्याच्याशी संबंधित आहेत. एक संवेदनशील माणूस म्हणून ते आपल्या समकालाबद्दल विलक्षण

अस्वस्थ आहेत. या व्यवस्थेत सामान्य माणसाला जे भोगावे लागत आहे, त्याबद्दलची चीड त्यांच्या मनात आहे. जी व्यवस्था आहे तिच्याशी ते पूर्णपणे असहमत आहेत. या असहमतीच्या विविध अशा ३०-३२ रंगाची उधळण त्यांनी येथे केलेली आहे.

या देशातीलच नव्हे, तर जागतिक पातळीवरील ज्या-ज्या महत्त्वाकांक्षी कवींनी, लेखकांनी, कार्यकर्त्यांनी आपापल्या समकालाबद्दल जी असहमती त्या-त्या काळी व्यक्त केलेली आहे, त्यांच्याशी या कवीचे घट्ट असे नाते आहे. त्यामुळे शंभरपैकी २३ कविता या महामानवांशी, लेखक, कवींशी व कार्यकर्त्यांशी संबंधित आहेत. त्यापैकी गौतम बुद्ध, कबीर, फुले, महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर, रमाई, डॉ. माईसाहेब आंबेडकर, विद्या बाळ, ब्रेख्त आणि पाब्लो नेरूदा ही काही महत्त्वाची व्यक्तित्वे. या मंडळींनी त्यावेळच्या आपल्या व्यवस्थेबद्दल केवळ असहमतीच व्यक्त केली नाही, तर व्यवस्था कशी असावी याचे दिशानिर्देशही दिलेले आहेत. या व्यक्तींशिवाय वर्ण व वंश श्रेष्ठत्त्वाचे तत्त्वज्ञान मांडून लक्षावधी नव्हे, कोट्यवधी लोकांना नरकयातना भोगावयास लावल्या, अशा माणुसकीला काळीमा फासणाऱ्या दोन व्यक्तींबद्दल आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाबद्दलही आपली असहमती तेवढ्याच तीव्र शब्दांत कवीने व्यक्त केली आहे. या दोन व्यक्ती म्हणजे एक : मनू आणि दुसरा : हिटलर होय. यावरून कवीच्या विचाराची व तत्त्वचिंतनाची नेमकी दिशा स्पष्ट होते.

या व्यवस्थेत व्यक्तीची जी गोची होत आहे, त्यासंबंधीच्या चार कविता १९, ९१, ९२, ९९ येथे आहेत. राजकारणातील भयावह वास्तवाबद्दल येथे नऊ कविता आहेत. (१६, १९, २०, २१, ३०, ४०, ४१ व ७२) यात नोटाबंदी व त्यामुळे सामान्य माणसाच्या जीवनाची जी होरपळ झाली त्याच्याशी संबंधित दोन कवितादेखील आहेत. सत्ता आणि माणूस, सत्ता आणि उपेक्षित घटक, मध्यमवर्ग, सत्य आणि असत्य, मॉब लिंचिंग, धर्माच्या नावावर चाललेले राजकारण, बौद्ध तत्त्वज्ञान, मतदार, अतिरेकी, मीडिया, न्यायदेवता, जातिव्यवस्था, लोकमानस, दलित प्रश्न, देश-प्रदेश, भूक, प्राणीपातळीवरचे लोक, स्त्रीमन, कविता, मृत्यू असा, हा या कवितेचा आशयात्मक अवकाश आहे. या सर्व कविता मुक्तछंदात जरी असल्या, तरी क्रमांक ३४, ३८ व ८३ या तीन छंदोबद्ध कविता आहेत, त्या अतिशय अप्रतिम अशा आहेत. या १०० कवितांमध्ये विषयाचे वैविध्य असले तरी या सर्व कविता आपल्या वर्तमानावर, समकालावर भाष्य करतात. भाष्य म्हणण्यापेक्षा व्यवस्था आणि ही व्यवस्था जे सत्ताधारी निर्माण करीत आहेत, ते किती संवेदनशून्य आणि माणूसघाणे आहेत, हेच या कवितेतून जागोजागी स्पष्ट होत जाते. या कविता माणसासाठी, माणसाला व माणसाकडून लिहिल्या गेल्या आहेत. इतर सामान्यजनांपेक्षा जीवनाकडे पाहण्याचा एक तिसरा डोळा या कवीकडे आहे. हा डोळा माणूसपणाचा आहे. माणुसकीला आवाहन करणारा व माणुसकीस उद्ध्वस्त करणाऱ्या व्यवस्थेबद्दलची आपली असहमती व्यक्त करणारा आहे. म्हणूनच आपल्या समकालीन सामाजिक-राजकीय वास्तवाचे डोळस भान या कवितेत आहे. हे सर्वकाही असले, तरी या कवितेच्या काही मर्यादादेखील आहेत. येथे कविता सूक्ष्म अशा केवळ संवेदनेतून वा केवळ अनुभूतीतून निर्माण झालेली नसून तत्त्वविचारांच्या संवेदनशील जाणिवेतून आणि स्वातंत्र्य-समता व बंधुभाव या मूल्यत्रयींतून निर्माण झालेली आहे. त्यामुळे वर्तमानाचे येथे केवळच सूक्ष्म किंवा प्रतिकात्मक चित्रण नसून जे आहे आणि जसे आहे, ते नेमक्या शब्दांतून प्रभावीपणे व्यक्त झालेले आहे. त्यातून पुन्हा पुन्हा व्यवस्थेस व सत्ताधाऱ्यांच्या ढोंगीपणास उघडून दाखवण्यात आलेले आहे. ही राजकीय भानाची कविता आहे. त्यामुळे विषय एकच आहे. त्यात सूत्रात्मकता आहे. मात्र, अनुभूतीचे वैविध्य नाही. या कवितेत व्यवस्थेचा एक विद्रूप चेहरा आहे. हा जो विद्रूप चेहरा आहे, त्याच्या मुळाशी बौद्ध तत्त्वज्ञानाच्या अष्टांगमार्गाची अवहेलना आहे. बुद्धांनी पुन्हा पुन्हा सम्यक आचरणाची अपेक्षा केलेली आहे; पण अलीकडे भारतीय माणसे या सम्यक आचरणापासून खूप दूर गेलेली आहेत.

कवी पळवेकर यांनी इंग्रजी व मराठी साहित्यात एम. ए. केलेले आहे. काही काळ ते इंग्रजीचे प्राध्यापकदेखील होते. त्यामुळे त्यांच्या या कवितेतून इंग्रजी साहित्याचे अनेक संदर्भ येतात. हे संदर्भ इंग्रजी साहित्याचा ज्याला परिचय आहे, तोच समजू शकतो. ज्याला याची जाण नाही त्याच्या आकलनास मर्यादा येतात. त्यामुळे त्यांनी जर कवितेखाली त्या शब्दांचा किंवा त्या ओळींचा मराठी अर्थ दिला असता, तर ते अधिक व्यवहार्य ठरले असते. केवळ इंग्रजीच नव्हे, तर काही व्यक्तिनामांच्या संदर्भातदेखील वाचकाला हीच अडचण जाणवते. उदाहरणार्थ- संजली गौतम (पान १२२) कोण? हिचा संदर्भ काय? कुक्कुस कोण? धर्मा मांगा पाटील कोण? कवितेच्या खाली जर त्यांच्यासंबंधीची माहिती दोन-चार वाक्यात देण्यात आली असती, तर फार सोईचे झाले असते. या १०० कवितांपैकी इंग्रजीशिवाय अनेक कवितांतून हिंदी भाषेचा वापरदेखील अत्यंत सहजपणे आणि अप्रतिम असा झालेला आहे. त्यासाठी त्यांचे अभिनंदनच करावे लागेल.

पळवेकरांच्या या संग्रहातील बऱ्याच कविता या 'विचारकविता' या प्रकारात मोडतात.अनुभूती व विचाराचा सुरेख संगम झाला, की विचारकविता ही अधिक प्रभावपूर्ण होत असते. श्रेष्ठ हिंदी कवी गजानन माधव मुक्तिबोध यांनी यासाठी 'ज्ञानात्मक संवेदना' या संकल्पनेचा वापर केलेला आहे. येथेही ज्ञानात्मक संवेदनाच केंद्रस्थानी आहे. त्यामुळे समकाळातील वेगवेगळ्या व विपुल संदर्भांच्या अनुषंगाने या संग्रहाच्या काही मर्यादा जाणवत असल्या, तरी आपल्या समकालाशी प्रामाणिक राहून कवीला जे जाणवले ते त्याने प्रामाणिकपणे व्यक्त केलेले आहे, हे मात्र कुणालाही नाकारता येत नाही. या कविता वाचकांना आपल्या समकालासंबंधी अधिक विचार करण्यास प्रवृत्त करतात. जे चाललेले आहे, त्याबद्दल आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त करतात. जी व्यवस्था सर्वसामान्य माणसाच्या जीवावर उठलेली आहे, ती व्यवस्था फेकून देण्यासाठी त्यास प्रवृत्त करतात. हीच या कवितेची सर्वात मोठी ताकद आहे. ●●●

**(लेखक हिंदी साहित्यिक आहेत.)**

- **कवितासंग्रह : असहमतीचे रंग**
- **कवी : अशोक नामदेव पळवेकर**
- **प्रथम आवृत्ती : २६ जानेवारी २०२२**
- **पुनर्मुद्रण : १२ जून २०२२**
- **प्रकाशक : प्रशांत पब्लिकेशन, जळगाव**
- **पृष्ठे : १९२ / मूल्य ३९५/-**

# शेण खाऊन शेण थुंकणाऱ्यांनी सावित्रीबाईंची केली बदनामी



'इंडिक टेल' आणि 'हिंदू पोस्ट' या कडव्या हिंदुत्ववाद्यांनी आपल्या पोर्टलच्या माध्यमातून देशातील आद्य शिक्षिका, समाज परिवर्तनासाठी आपले उभे आयुष्य समर्पित करणारी महा क्रांतीनायिका, आपले पती महात्मा जोतिराव फुले यांचा श्वास बनून आणि असंख्य संकटे झेलून मुलींसाठी पहिली मुलींची शाळा सुरू करणाऱ्या सावित्रीबाई फुले म्हणजे एका अर्थाने राष्ट्रमाता आहेत. कोट्यवधी महिलांचे प्रेरणास्थान आहेत. अशा महिलेच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवत आणि नीच पातळीवर जाऊन टीका करण्याचे काम केले आहे. गेल्या काही वर्षांत सावरकरांनी माफी मागितली असे विधान केले, की हिंदुत्ववादी सरकार एखाद्याविरुद्ध पाच-पन्नास ठिकाणी खटले भरते, एखाद्याला अटक होते, एखाद्याची खासदारकी रद्द होते, एखाद्यावर राष्ट्रद्रोहाचा शिक्का बसतो. गोडसे खुनी आहे आणि गाय प्राणी आहे, असे विधान केले तरी याच गोष्टींना सामोरे जावे लागते आणि इथे ज्ञानाचे डोळे देणाऱ्या सावित्रीबाईंविषयी आक्षेपार्ह लेखन केल्यानंतर चिडीचूप होते. हे लक्षण कशाचे आहे. इथे किरकोळ गोष्टींवरून मोर्चे निघतात, अनेकदा रक्ताची शाई करून पत्रे पाठवली जातात, नेता आत गेला किंवा बाहेर गेला तरी हजारोंची गर्दी होते, बांग की आरती यावरून मोर्चे निघतात, मराठी-अमराठीवरून मोर्चे निघतात, एखाद्या शब्दाचा वापर करून खटले भरले जातात आणि सावित्रीबाईवरून हे गोठलेपण का तयार होते याचा विचार केला नाही, तर देशाला लाभलेल्या परिवर्तनाचा, सामाजिक क्रांतीचा वसा आणि वारसा गमावून बसण्यासारखे आहे. आपल्या क्रांतिकारी विचारांच्या परंपरा कुरूप बनवणारे हे हरामखोर कोण आहेत, असे विचार संपवण्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांना कुणी दिले, विचारांची, व्यक्तींची बदनामी करण्याची मस्ती यांना कोठून येते, असे अनेक प्रश्न निर्माण होतात आणि त्याचे एकमेव उत्तर आहे हिंदुत्व. गेल्या काही वर्षांपासून हिंदुत्वाला आव्हान देणाऱ्या विचारपरंपरा या नालायकांना अडचणीच्या वाटत आहेत. फुले, शाहू, आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांना डिवचण्याचा प्रयत्न मुद्दाम होतो. लोक चिडले की माफी मागितली जाते. हे सारे अनवधानाने कोणी करत नाही. यामागे एक षड्यंत्र असते. ज्या विचारांनी सामाजिक क्रांत्या केल्या, ते विचार आणि त्यांचे वारसदार आज नेमके कोठे आहेत, हे चाचपडण्याचा प्रयत्न असतो. खडा मारण्याचा प्रयत्न असतो. इतके घाणेरडे लेखन करून काहीच सामाजिक प्रतिक्रिया आली नाही, तर मग दुसरे विचार कुरूप करण्याचा, महापुरुषांचे चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न होतो. आजकाल नेहरू, गांधी, राज्यघटना आणि धर्मनिरपेक्षता आदींबाबत असेच केले जाते. संविधानाची पूजाही होते आणि जयपूरच्या उच्च न्यायालयासमोर मनुचा पुतळाही उभा राहतो. एका मोठ्या पेचप्रसंगातून सारा समाज पुढे जातो आहे.

सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली आणि सर्व जाती-धर्मांच्या मुलींना ज्ञानाचे क्षेत्र प्रथमच खुले झाले. पण हे सहजासहजी घडणारे नव्हते. व्यवस्था मुलींना घराबाहेर पडूच देत नव्हती. अनेक पालक आपल्या छोट्या पोरींना पोत्यात गुंडाळून आणि पोते खांद्यावर घेऊन शाळेपर्यंत जायचे. घर ते शाळा या मार्गावर सावित्रीबाईंवर दगडफेक, शेणफेक व्हायची. शाळेत चांगली साडी असावी म्हणून रोज त्या दोन साड्या शाळेत घेऊन जायच्या. एक शेण झेलण्यासाठी आणि दुसरी शाळेत गेल्यावर नेसण्यासाठी. याच शाळेत अतिशय हुशार अशी मुक्ता साळवे नावाची मातंग समाजातील विद्यार्थिनी त्यांना लाभली. फातिमा शेख नावाची सहकारी लाभली. शिवाय 'विद्येविना मती गेली' असा क्रांतीमंत्र लिहिणारे म. फुलेही होते. बहुजन समाजाला ज्ञानाचे हत्यार देऊन सामाजिक क्रांती घडवण्याचा इतिहासातील पहिला प्रयत्न झाला तो फुले दांपत्यामुळे. इतिहासाची पाने आणि त्यावरील लेखन ताजे टवटवीत असताना, कोट्यवधी लाभार्थी आजुबाजूला असताना या दोन हरामखोर, नालायक आणि मातेला माता न म्हणणाऱ्या पोर्टलनी सावित्रीबाई फुले या शाळेतील मुली इंग्रजांना पुरवत होत्या, असा आरोप केला आहे. खरे तर, असा आरोप करणाऱ्यांची एक दीर्घ परंपरा आहे. भारतात येणाऱ्या प्रत्येक परकीय सत्तेसमोर तीच प्रथम लोटांगण घालत होती. अशा वृत्तीला फार तर भाडखाऊ म्हणता येईल. गंमत म्हणजे, इतिहासभर भाड खाण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या या प्रवृत्तीने चारित्र्याचे प्रश्न उपस्थित करावेत हे आणखी वेदनादायक आहे. म्हणजे नंग्यांनी कपड्यावर भाषण करण्यासारखे आहे. घटकंचकीचा खेळ चालवणाऱ्यांनी मूल्यांवर बोलावे असे आहे. सत्तेवर कोण येतो, यावरून त्याची संस्कृती तयार होते. 'घूस के मारेंगे' म्हणणारे अशावेळी व्यक्तीची नव्हे, तर राष्ट्राची बदनामी होत असताना कुठे शेपूट घालून बसलेले असतात आणि कोणत्या मनात शिरत असतात, हाही एक प्रश्नच आहे. काळ मागे घेऊन जाणाऱ्या, गुहेत राहू पाहणाऱ्या या सर्व वृत्ती आहेत. पंधरा कोटींची लोकसंख्या वाहून नेणाऱ्या महाराष्ट्रात यामुळे

कुणाला खोलवर जखम होऊ नये, फुले, शाहू, आंबेडकरांच्या नावाने जोगवा मागत सत्तास्थाने उबवणाऱ्यांना खोल जखमा होऊ नयेत, हेही संतापजनक आहे. रिडल्स आणि 'सोबत'मध्ये फुल्यांची बदनामी होत असताना निघालेले मोर्चे आता कुठे गेले आहेत, महापुरुषांची स्मारके आणि पुतळ्यात धन्यता मानणारे आता कुठे गेले आहेत? खरे तर, हाही एक स्वार्थी आणि राजकारणी वर्ग असतो. आपला स्वार्थ पूर्ण झाला, की किंवा स्वार्थासाठी तो भाजप-शिवसेनेच्या गळ्यात गळा घालण्यास तयार असतो. यांना ना लाज असते, ना शरम. नाव महापुरुषांचे आणि कृती प्रतिगाम्यांबरोबर असा हा व्यवहार चालू असतो. समाजाची दिशाभूल करत, त्याना मुर्ख बनवत तो चालू असतो. खरंच महाराष्ट्रात कोणता पक्ष फुले, शाहू आणि आंबेडकरवादी आहे, असा प्रश्न निर्माण झाल्यावर उत्तर काय येईल. ईडीने एक आरोळी ठोकली, की अनेक जण घरोबा बदलतात. खांद्यावरचा झेंडा बदलतात. विवस्त्र लोकांचे राजकारण असेच असते आणि जेव्हा असे घडते, तेव्हाच कोणी तरी पाळीव कुत्र्यासारखे व्यवहार करणारे पोर्टल क्रांतिज्योतीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवण्याचा प्रयत्न करत असतात आणि या विचारांचे काही वारसदार कुणाच्या तरी हातात एखादा कागद देऊन आपण आपले कर्तव्य बजावतो असा आनंद घेतात. ज्या राज्य शासनाने सावित्रीबाईंच्या नावाने शासकीय पुरस्कार सुरू केले, उशिरा का होईना सावित्रीबाईंचा धडा अभ्यासक्रमात आणला. पुरस्कार देणारे आणि स्वीकारणारे, धडा तयार करणारे आणि तो शिकवणारे, आम्ही सावित्रीबाईची लेकरं असे सांगणारे आणि सरस्वतीनं नव्हे, तर सावित्रीबाईंनी आमचा उद्धार केला असं गौरवानं बोलणारे आणि सावित्रीबाईंच्या नावानं संस्था काढणारे, हे सारे मौन का पाळताहेत? निदान मोबाईल नावाच्या डबड्यातून तरी आपली नाराजी व्यक्त करावी. यामागचे साधे सरळ कारण आहे, की जो समाज आपले पुरोगामी विचार गमावतो, महापुरुषांच्या चारित्र्यावर शिंपडली जाणारी घाण मख्खपणे पाहतो, अशा समाजाला ना भविष्य असते ना वर्तमान! एक माणूस असे काही लिहितो आणि आपण अरेरे म्हणत स्तब्ध राहतो. शेण खाऊन लेखन करणाऱ्यांना इतके बळ आताच कोठून आले आहे, हेही समजून घ्यायला हवे. कोणत्या प्रयोगशाळेतून प्रोटिन्स मिळते, हेही शोधायला हवे. पुरोगामी परंपरांची बदनामी करण्यामुळे नेमकी काय प्रतिक्रिया उमटते, हे पाहण्याचा हा नालायकांचा प्रयत्न होता. ज्या सावित्रीबाईंच्या लाभार्थी वरच्या वर्गातील महिला सर्वाधिक आहेत आणि मुंडन, लैंगिक छळाला त्याच बळी पडल्या होत्या, हेही कुणी समजून घ्यायला तयार नाही. समस्त महिलांच्या उद्धारक ठरलेल्या विचारांची बदनामी केली, की मनुचा मार्ग आणखी मोकळा होतो अशी या षड्यंत्रामागे धारणा असते. सावित्रीबाईंच्या काळातील शेण हातात घेऊन फेकायचे आणि आताचे शेण खाऊन शेण थुंकायला लागले आहेत. असे प्रयत्न कधी यशस्वी होत नसतात हे इतिहासात सिद्ध झाले आहे. आताही तसेच आहे. मानवी जीवनात सत्य, सुंदर आणणारे विचार कधी संपत नसतात. कारण ते समाजमनावर खोलवर कोरलेले असतात. कुत्र्यासारखे हाड चघळणाऱ्यांना ते पुन्हापुन्हा सांगण्याची आवश्यकता असते.

# कोण हा ब्रिजभूषण? ज्याच्यासाठी कायदा शेपूट घालून पहडतोय...

गेल्या काही वर्षांत कायद्याच्या रक्षणासाठी किती घोषणा झाल्या थोडं आठवा... कायद्यासमोर सारे समान, कानून के हात लंबे होते है... ना खाने दुंगा ना खाऊंगा, काळा पैसा हुडकून काढू... इत्यादी त्या घोषणा होत्या. आणखी काही सांगता येतील. या घोषणांचे काही होत नाही.. त्या निवडणुकीच्या मोसमात येतात आणि मोसम संपला की मतांची गाठोडी खांद्यावर घेऊन जातात. मुळातच मल्ल असलेल्या आणि पुढे भारतीय मल्लांच्या संघाचा अध्यक्ष झालेल्या, गुंडगिरी पार्श्वभूमी पुसत धर्मवीर बनलेल्या ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या बाबतीत किंवा त्यांना संरक्षण देण्यासाठी जे काही घडते आहे, त्यावरून पुन्हा कायद्यावरील विश्वास हळूहळू कमी व्हायला लागतो. कायद्याचे हात लांब न होता झडायला लागतात की काय, अशी शंका यायला लागते. तर हा सिंह उत्तर प्रदेशच्या राजकारणातील एक बलदंड माणूस आहे. तसे उत्तर प्रदेशातील राजकारण बलदंडांच्या हातातच असते. कोणताही पक्ष येवो यांचे राजकारणातील स्थान अबाधित राहत असते. एका-दुसऱ्या चकमकीत कोणी तरी ठार होतो. बाकीचे तसेच छाती फुगवून मिरवत असतात. ते आमदार-खासदार होतात, मोठ्या पदापर्यंत पोहोचतात. ब्रिजभूषणने स्वतःच एकदा सांगितलं होतं, की लोक काहीही म्हणोत; पण माझ्या हातून एक हत्या झाली आहे.



त्याच्याविरुद्ध खुनाचा खटलाही चालला. त्यातून तो निर्दोषही सुटला. पण एवढा एकच गुन्हा अद्याप त्याच्या नावावर नव्हता. मोटरसायकलीची चोरी, दारू अड्ड्यांवर लूट असे अनेक आरोप होते आणि तरी पैलवान असलेल्या ब्रिजभूषणने त्यांना एक लांगी डावावर चितपट करून टाकले. सुमारे सव्वा दोन दशके राजकारणातील त्याची चढती कमान कायम राहिली. आमदार-खासदार अशी पदे त्याने सहज मिळवली. संसदेचा खासदार, भारतीय मल्ल संघटनेचा अध्यक्ष आणि धर्मवीर अशी बिरुदावली त्याला चिकटलेली आहे. 'हम करे सो कायदा' याप्रमाणे वागणाऱ्या आणि राज ठाकरेंना अयोध्याबंदी करणाऱ्या या मल्लाचाही घडा भरण्याची वेळ आलीय. सात महिला कुस्तीगिरांनी त्याच्यावर लैंगिक छळाचा आरोप केला. जगातले सारे क्रीडाक्षेत्र हादरले. पण ब्रिजभूषण हादरला नाही. एक तर कायद्याचे चिलखत त्याच्याकडे आहे आणि कुस्तीतले काही डावही त्याच्याकडे आहेत. आपली तक्रार दाखल करून घ्यावी, एवढीच मागणी या महिला करत होत्या. दिल्लीत आंदोलन करत होत्या. त्यांच्या आंदोलनाला कोणी जुमानलेच नाही. तक्रारीचा एक कागद घ्यायला कोणी पोलिस पुढे आला नाही. 'बेटी बचाव, बेटी पढाव' अशा घोषणा देशभर चालू असताना, नव्या संसदेचे उद्घाटन होत असताना या साऱ्या गोष्टी घडत राहिल्या. महिलांच्या आंदोलनाला बदनाम करण्यात आले. आंदोलनाला प्रायोजित

ठरवण्यात आले. एक महाबलदंड नेता आणि काही महिला, अशी ही लढाई चालू राहिली. पुढे या महिलांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी देशातील विवेकी संस्था, संघटना आणि व्यक्ती पुढे येऊ लागल्या. तरीही पोलिस तक्रार घेत नव्हते. शेवटी प्रकरण कोर्टात गेले आणि त्याच्या आदेशानुसार तक्रार घेण्यात आली. तक्रारीचा कागद तसाच टेबलाला चिकटून राहिला. तो हलेना, बोलेना. तसाच पडून राहिलाय. आता त्याला बोलते करावे म्हणून आंदोलन सुरू झाले. संसद इमारतीच्या उद्‌घाटनावेळी आंदोलनाची दृष्ट लागू नये म्हणून आंदोलकांना ओढून, उचलून दूर फेकण्यात आले. जागतिक पातळीवर महापराक्रम करून मिळवलेली सोनेरी पदके गंगेत अर्पण करण्यासाठी महिला मल्ल निघाल्या. हताश होऊन आणि कायदा काय करू शकत नाही, न्याय मिळू शकत नाही या हताश भावनेतून त्या या कृत्य करणार होत्या. टिकैत यांच्या किसान संघटनेनं त्यांना रोखलं आणि खाप पंचायत भरवून त्यांच्याबरोबर लढण्याचे ठरवले. एरव्ही चांदीच्या गदा जिंकणारे या महिलांच्या मदतीसाठी का जाऊ शकले नाहीत, हा प्रश्नही कुस्तीच्या आखाड्याभोवती उभारण्यात येणाऱ्या कंपाऊन्डसारखा पडून राहिला आहे. सरकारने अजून ब्र काढलेला नाही. 'सरकार मौनात म्हणजे कायदा मौनात' हे वेगळे सांगण्याचे कारण नाही. एक आरपार लढाई चालू होणार आहे. पंगू बनवलेल्या कायद्याला पाय मिळावेत आणि डोळ्यावर पट्टी लावून घेतलेल्या कायद्याला डोळे मिळावेत यासाठी ही लढाई आहे. तसं क्रीडापटू महिलांचे लैंगिक शोषण ही काही नवी गोष्ट नाही. बहुतेक वेळा अशा गोष्टी दाबून टाकल्या जातात. पण प्रथमच या सात बहादूर महिलांनी व्यवस्थेच्या चेहऱ्यावरचा बुरखा फाडला.

ब्रिजभूषण काही गप्प बसणार नाही तर त्याने देवाचा अंश मानल्या जाणाऱ्या साधू-संतांचा मोर्चा राजधानीत नेण्याचे ठरवले आहे. साधूंची ही भली-मोठी फौज 'पोक्सो' कायद्यात सुधारणा करण्याची आणि ब्रिजभूषणला निर्दोष ठरवण्याची मागणी करणार आहे. तसे बहुतेक धर्म महिलांच्या विरोधीच असतात. मनुस्मृतीही महिलांच्या विरोधीच असते. साधूंचे तसेच आहे. ब्रिजभूषण नुसताच बलवान नाही तर तो धनवान आहे. त्याच्या सुमारे पन्नास शिक्षण संस्था आणि दोन विमाने आहेत. विद्यार्थी संघटनेचा अध्यक्ष ते पैलवानाचा अध्यक्ष असा त्याचा प्रवास. मध्ये मध्ये गुंडगिरीची स्टेशने तो पार करायचा. साधूंच्या सेवेसाठी त्याला भाजपच्या तिकिटावर काशीतून लोकसभा निवडणूक लढायची आहे. 'पोक्सो' कायद्यानुसार कुणीही तक्रार केली, की संबंधित व्यक्तीला सर्वप्रथम अटक करावी लागते. इथे अटक तर दूरच, तक्रारच दाखल करून घ्यायला कुणी तयार नव्हते. साधू सरकारला पत्र लिहून कायदा बदलायला सांगणार आहेत. अजूनपर्यंत तरी सरकार मौनात आहे. ते कधी तोंड उघडणार आणि काय बोलणार हे गुलदस्त्यातच आहे. ही सारी घटना म्हणजे लोकशाही, कायदा आणि न्याय आदींना दोन पावले मागे जाण्यास लावणारी आहे. स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण करणाऱ्या समाजाला ती परवडणार नाही आणि कोणत्या सरकारलाही नाही. सरकार कदाचित हे समजून घेणार नाही; पण समाजाने मात्र समजून घ्यायलाच हवे.

•••

**– तात्या विंचू**


**समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी**

पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट



डिजीटल स्वरुपात !

www.peoplespost.in

**नवे लेख, नवी सदरे, नवा अंक याशिवाय दैनंदिन विषयांवर नामवंत साहित्यिक, लेखक, विचारवंत यांचे भाष्य!**

# आपल्यातच बुद्ध पाहू या...



अखंड मौनात बुडून
साधूत्वाकडे झुकलेल्या
पिंपळवृक्षाला
शीळ घालत आलेल्या गार वाऱ्यानं
स्पर्श केला तेव्हा,
पिंपळवृक्षानंही बुद्धाप्रमाणेच
हळुवार उघडले डोळे...
तसा वारा म्हणाला,
'बोलायचं का थोडं मित्रा?
मी खूप वार्ता घेऊन आलोय...'
पिंपळ पुटपुटल्याप्रमाणे
पण गंभीर होत म्हणाला,
'नको
बुद्ध मला पाठ टेकवून
ध्यानाला बसलाय...'
यावर शीळ थांबवत वारा म्हणाला,
'आश्चर्यच आहे !
बुद्ध नाहीये तिथं !!
मी माझ्या हजार डोळ्यांनी बघितलंय...'
थोडसं हादरून
आणि चिंतायुक्त होऊन
पिंपळ विचारता झाला,
'मग गेला कुठं'
माझ्या पानांचेही
हजार डोळे त्याला बघत होते...
वारा म्हणाला,
'तसा तो नाही गेला कुठं
आणि
दिसायला तो माणूस थोडाच राहिला?
तो तर आता झाड बनलाय
वारा बनलाय
आणि
झालंच तर निसर्ग बनलाय.
चला,
आपणच आपल्यातला बुद्ध पाहू या
आपणच आपल्यातला बुद्ध पाहू या...'

**– उत्तम कांबळे**

# त्या भवनातील गीत पुराणे

त्या भवनातील गीत पुराणे
लोक पुराणे
तेथील तेव्हाचे
सूर तेथले वैविध्याचे
जाऊ द्या आज तिथूनही दूर
नकोत हळवे
नको मवाळ
नकोत रंगीबेरंगी
सुरात एका गा रे गाणे
केवळ एकच रंगी
नको मुळी ती भावूक गाथा
करा पराभूत, नमवा माथा,
त्या राज्याच्या नको खुणा,
नको खुणा त्या इतिहासाच्या
हव्या नव्या या नवभवनाच्या
नव सोनेरी या दंडाच्या
त्या भवनातील गीत पुराणे
जाऊ द्या आज तिथूनही दूर
नवमस्तीच्या
एकाच गीताचा
येऊ द्या सर्वदूर
हा पूर
त्या भवनातील
गीत पुराणे
जाऊ द्या आज
तिथूनही दूर

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2022-2024
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

